


# माणूस











जानेवारी ६२
५० न.पै.

-- अभिराष्ट्रेण वर्धताम् --

# माणूस

संपादक – श्री. ग. माजगांवकर

माणूस, ४१९ नारायण, पुणें २ ] वर्ष १ लें [ जानेवारी १९६२ : अंक ८ वा

## शंभुराजा पहा, मुक्त गोमन्तक

मुक्त गोमन्तका, सिद्ध तव स्वागता
बांधवांचा जथा, आज सरली व्यथा
मुक्त गोमन्तका, मुक्त गोमन्तका।

आजवरि सोसले क्रूर आघात तूं
मुक्त दुसरे जरि, बद्ध बेडींत तूं
शृंखला ही तुटे, पारणें रे फिटे
सांग दिसतो कुठे तुज फिरंगा ॥ १ ॥

मुक्त हांसे पहा आज 'मंगेश' तो
ताठ राही उभा आज 'गोमन्त' तो
दाट तम हें विरे, आज नभ हांसरे
वायुवरि फडफडे बघ तिरंगा ॥ २ ॥

शंभुराजा पहा, मुक्त गोमन्तक
परशुरामा तुझी भूमि ही तारक
धन्य बलिदान तें, ज्यांतुनी लाभतें
अतुल सामर्थ्य जनि राव रंका ॥ ३ ॥

मुक्त गोमन्तका ! मुक्त गोमन्तका

--श्रीराम आठवले

**— वर्गणी संबंधीं —**

मासिकाची वार्षिक वर्गणी: रु. ५.

किरकोळ अंक: ५० न. पै.

पत्ता बदलावयाचा असल्यास नव्या पत्त्या-सोबत जुना पत्ताहि लिहावा.

• • •

**– पत्रव्यवहाराचा पत्ता –**

संपादक : व्यवस्थापक
'माणूस,' मराठी मासिकपत्र,
४१९ नारायण पेठ, पुणें २.

**लेखकांसाठी सूचना**

( १ ) साहित्य पाठवितांना कागदाच्या एका बाजूस सुवाच्य अक्षरांत मजकूर लिहिलेला असावा.

( २ ) साहित्याच्या स्वीकृतीबाबत साधारणत: १ महिन्यांत निर्णय कळविला जातो.

( ३ ) पुरेसें पोस्टेज सोबत नसल्यास नापसंत साहित्य लगेच निकालांत काढलें जातें.

( ४ ) प्रकाशित लेख, चित्रें इत्यादि बाबतचे सर्व हक्क स्वाधीन.

★

★

★

★

## –: या अंकांत :–


★ एक उपक्रमशील खेडें : पुसेगांव — वि. भ. मोंडकर
★ कम्युनिस्ट चळवळींतील अंतर्गत संघर्ष — के. एन्. फडके
★ दिवाळी अंकांतील व्यक्तिचित्रें — सौ. सरिता पदकी
★ स्वरसम्राट कुमार गंधर्व — सुधीर दामले
★ काव्य-कुंज
★ अवघाची संसार
★ आपली चित्रपटसृष्टि
★ वार्ता आणि विचार
★ नवें वाचन


**मुखपृष्ठ :**

दिल्ली येथील प्रजासत्ताक दिनांतील कांही दृष्यें

या मासिकांत व्यक्त झालेलीं मतें, 'माणूस' मासिकपत्रांच्या चालकांचीं अधिकृत मतें असतातच असें नाही.

● सहकार हेंच जीवन ●

|| एकमेकां साहाय्य करूं । अवघे धरूं सुपंथ ||

ही संत तुकारामाची वाणी सार्थ करीत असलेला, ग्रामीण विभागाची औद्योगिक व आर्थिक भरभराट करण्यासाठी झटणारा व लहान लहान शेतकरी देखील एक यशस्वी कारखाना चालवूं शकतात हें दाखवून देणारा अहमदनगर जिल्ह्यांतील सहकारी

# ★ गणेश सहकारी साखर कारखाना लि. ★

## ● गणेशनगर, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर ●

★ दाणेदार पांढरी शुभ्र साखर हेंच आमच्या कारखान्याचें वैशिष्टय ★

आतापर्यंन्त चार गळित हंगाम खालीलप्रमाणे पूर्ण होऊन आता पांचवा गळित हंगाम यशस्वीरित्या चालू आहे.

| हंगाम | | गळित टन | | उत्पादन पोतीं |
|---|---|---|---|---|
| सन १९५७–५८ | ... | १,०६,४४२ | ... | १,०७,५६५. |
| सन १९५८–५९ | ... | १,१८,९५१ | ... | १,३९,१२८. |
| सन १९५९–६० | ... | १,३७,१९७ | ... | १,५७,४०० |
| सन १९६०–६१ | .. | १,८५,७२४ | ... | २,१५,००१. |
| सन १९६१–६२ (अपेक्षित) | | २,००,००० | ... | २,३०,०००. |

★ मॅनेजिंग डायरेक्टर ★

एस. के. कर.

★ चेअरमन ★

ह. त्र्यं. शेळके पाटील

● आमच्या असंख्य ग्राहकांना व हितचिंतकांना- हें नवीन वर्ष सुख समृद्धीचें जावो ●

संपादकीय

# तयास देखतां दुर्जन धाके

श्रीसमर्थ

गोवा मुक्तिलढ्यांतील एक अनपेक्षित घटना म्हणजे पोर्तुगीज सैन्याची शरणागति. भारतीय सैन्याच्या मार्गावर पेरून ठेवलेले सुरुंग व वाटेंतील पुलांची उडवाउडवी एवढाच काय तो विरोध पोर्तुगिजांकडून झाला. दीव-दमण या वसाहतींत तर एवढ्या-पर्यंतहि मजल गेली नाही. भारतीय सैन्य सीमेवर येतांच या ठिकाणच्या पोर्तुगीज अधिकाऱ्यांनी शरणागतीचे पांढरे झेंडे दाखवून मुलुख भारताच्या ताब्यांत देऊन टाकला. लढ्यांतील मृतांची संख्या अवघी आठ असून यांपैकी चार खलाशी तर अल्बुकर्क जहाजावरील अनपेक्षित गोळीबाराने विनाकारणच दगावलेले आहेत.

वास्तविक पोर्तुगिजांची ही शरणागति आजवरच्या त्यांच्या इतिहासवैशिष्ट्याला सोडून आहे. शिवाजी, संभाजी, पेशवे या सर्वांनी पोर्तुगीज सत्ता उखडून टाकण्यासाठीं शर्थ केली. परंतु पोर्तुगिजांच्या चिवट व दमदार प्रतिकारापुढे या सर्वांना हात टेकावे लागले. अत्यंत नाइलाज झाला व कमालीचा ताण पडला तरच पोर्तुगीज नामोहरम होतो असा आजवरचा त्याचा सर्वत्र लौकिक आहे. मग गोवा एवढें बिन–बोभाटपणें भारतीय सैन्याच्या ताब्यांत देऊन पोर्तुगिजांनी आपला कारभार आटोपला, तो कां ?

गोव्यांतील पोर्तुगीजसत्ता लष्कराच्या बंडखोरीमुळे व सार्वत्रिक असंतोषामुळे ऐन वेळीं कोलमडून पडली, बाहेरून कोठूनहि मदत येण्याची शक्यता नव्हती, जागतिक राजकारणांत पोर्तुगाल एकाकी पडला यामुळे पोर्तुगिजांना गोव्यांतून जावें लागलें, अशी एक भूमिका मांडली जाते. या भूमिकेंत सत्याचा कांही अंश असला तरी ती सर्वस्वी बरोबर वाटत नाही.

१) गोव्यांतील सैन्याच्या व शासनाच्या असंतोषाचा उद्रेक व्हायला भारतीय सैन्य प्रत्यक्ष गोव्यांत येईपर्यंत वाट पाहण्याची काय गरज होती ? गेल्या चौदा वर्षांत किंवा भारतीय सैन्य अगदी सरहद्दीवर खडे असतांनाहि पोर्तुगिजांकडून असंतोषात्मक अशा कोणत्याच हालचाली घडल्या नाहीत, तें कां ? २) निदान गोव्यांतील गोरें पोर्तुगिज सैन्य तरी अखेरपर्यंत प्रामाणिक होतें. ही सैन्यसंख्या दोन ते तीन हजाराच्या आसपास होती व एवढ्या सैन्यबळावर दग्धभू धोरण स्वीकारणें, भारतीय प्रदेशांवर बॉंबफेक करून त्यांची शक्य तेवढी नासधूस करणें पोर्तुगिजांना अगदी शक्य होतें. हीं रानटी कृत्यें पोर्तुगिजांच्या आजवरच्या परंपरेला शोभूनच दिसलीं असतीं. मग हें कां घडलें नाही ? ३) आपली गोव्यांतील शासनव्यवस्था कोलमडली आहे, ही गोष्ट भारतीय फौजा गोव्यांत घुसल्यावरच गोव्याच्या वरिष्ठ पोर्तुगीज अधिकाऱ्यांच्या ध्यानांत यावी, त्याआधी भारतीय फौजा गोव्याच्या सीमेवर आठआठ दिवस आधी तळ ठोकून असतां ही गोष्ट त्यांना समजूं नये हेंहि असंभवनीय वाटतें. फौजा सीमेवर खोळंबून ठेवण्यांत भारताचा उद्देश हाच होता, की पोर्तुगालने अद्यापहि शांततामय मार्गानें गोवा भारताच्या स्वाधीन करण्यास तयार व्हावें. हें दडपण पडावें एवढ्यासाठीच तर गरजेपेक्षा कितीतरी अधिक सैन्यबळ भारताने सीमेवर गोठवलें. परंतु या पूर्वसूचनेला किंवा दडपणाला पोर्तुगालने भीक घातली नाही; उलट याच सुमारास 'दोन सार्वभौम शेजारी राष्ट्रांतील मतभेद मिटविण्याच्या दृष्टीने फार तर भारताशी कांही प्रश्नांबाबत वाटाघाटी करूं' अशी उद्दाम घोषणा करून भारताच्या शांतिप्रयत्नांचा धिःकारच केला. ४) ऐनवेळीं गोव्याची शासनव्यवस्था कोलमडली असें म्हणावें तर महत्वाचे कागदपत्र जाळून टाकणें, जडजवाहीर, बायकामुलें स्वगृहीं धाडून देणें हे उपाय पोर्तुगीज गव्हर्नराने आधीपासूनच कां अंमलांत आणावेत ? ५) आंतरराष्ट्रीय राजकारणांत पोर्तुगाल अचानकपणे एकाकी पडला हें समजणेंहि चूक आहे. सिलोन, अरब प्रजासत्ताक हीं दळणवळणाच्या दृष्टीने मोक्याच्या ठिकाणीं असणारीं राष्ट्रें किंवा जागतिक सामर्थ्याच्या दृष्टीने वजनदार असणारा रशिया गोव्याबाबत भारतालाच पाठिंबा देणार ही गोष्ट १९५५–५६ सालीच जाहीर झालेली होती. आपलें जहाज सुवेज कॅनॉलवर आडवलें जाईल याची पोर्तुगालला कल्पना नसणें अगदीच असंभवनीय वाटते.

## भारताच्या बदनामीचा कुटिल डाव

यावरून दिसतें तें असें, की गोवा सोडण्याचा पोर्तुगालचा विचार निश्चित झाला होता; कारण अंगोला, मोझांबिक या वसाहतींप्रमाणे गोवा ही वसाहत पोर्तुगालला किफायतशीर होत नव्हती; उलट आजवर ती एक खर्चाचीच बाब होती. ही वसाहत सोडून देणें पोर्तुगालच्या दृष्टीने अजिबात नुकसानीचें नव्हतें. पण भारताला गोव्याचा प्रश्न शांततेने सोडवल्याचें भूषण लाभूं देणें हेंहि पोर्तुगालला मान्य नव्हतें. पोर्तुगालच्या या भूमिकेला ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका हीं पाश्चात्य राष्ट्रेंहि पाठिंबा देऊन होती. पं. नेहरूंच्या शांतिकार्याला व शांतिदूताच्या त्यांच्या वैयक्तिक यशकीर्तीला धक्का लागावा एवढीच पोर्तुगालची व या त्रिकुटाची खटपट होती. नाहीतर सीमेवर भारतीय सैन्य खडें असतां प्रतिकाराची उद्दाम भाषा व सैन्य आंत प्रवेश करतांच शरणागति या एकाच आठवड्यांत घडलेल्या पोर्तुगालच्या विसंगत वागणुकीचा खुलासाच होत नाही. पं. नेहरूंना शस्त्रबळाचा वापर करावयास लावण्याचें भाग पाडून त्यांची राज-

# वैसवी प्रचीतीचे तडाखे

रामदास

नीति आपल्याप्रमाणेच स्वार्थांध युद्धखोरपणाची कशी आहे हें जगाच्या चव्हाट्यावर उघड करणें, एवढाच दुष्ट खोडसाळपणा पोर्तुगालच्या व त्याच्या पाठिशी असणाऱ्या पाश्चात्य राष्ट्रांच्या गोव्यासंबंधीच्या धोरणाबाबत दिसून येतो. आणि गोव्याबाबत पाश्चिमात्य जगांतील वृत्तपत्रांतून पं. नेहरूंवर व भारतावर टीकेची व बदनामीची जी झोड उठवण्यांत आली त्यावरून पाश्चात्यगटाच्या या खोडसाळ धोरणाला बऱ्याच प्रमाणांत यश आलें ही गोष्ट नाकारण्यांत अर्थ नाही.

## पंडितजींची मुसद्देगिरी

अर्थात् पं. नेहरूंना या संभाव्य परिणामांची कल्पना अगोदर असलीच पाहिजे. पाश्चात्यांच्या या कारवाईवर रशियाचा तोडगा यासाठीच त्यांनी वेळेवर हजर ठेवला होता. अध्यक्ष ब्रेझनॉव्ह यांचें भारतांत आगमन, भारताच्या भूमिकेला त्यांनीं व्यक्त केलेला निःसंदिग्ध पाठिंबा व त्याच वेळी भारतीय सैन्याचा गोवा-प्रवेश या सर्व गोष्टी कांही योगायोगाने जुळून आलेल्या नाहीत. जागतिक पाठिंब्याचें आपलें पारडें हलकें होऊं नये यासाठी पं. नेहरूंनी केलेली ही खास व्यवस्था होती.

आणि हा सर्व बनाव आपल्या सार्वत्रिक निवडणुकांच्या ऐन तोंडावर घडवून आणण्यांत पंडितजींनी आपल्या राजनैतिक मुत्सद्देगिरीचा कळसच गांठला हें कोण नाकारूं शकेल ? कारण गोव्याचा प्रश्न ५५–६६ साली जेवढा चिघळला होता तेवढा तो आता मुळीच नव्हता. पोर्तुगिजांच्या अत्याचारांची संख्या अचानक वाढली नव्हती, चोरटा व्यापार एकदम तापदायक ठरण्याचें कांही कारण नव्हते किंवा पाश्चात्य राष्ट्रांचे सैनिकी तळ येथे एकाएकी उभारले जात नव्हते. सार्वत्रिक असंतोषाचा डोंब उसळला असतां, गोव्यांतील शासनव्यवस्था व लष्कर बेसावध असतां त्या वेळी पं. नेहरूंनी हात उगारला नाही आणि आज एकदम फौजा घुसवून प्रश्न निकालांत काढला या विसंगतिमागे निवडणुकांचा दृष्टिकोन—विशेषतः मेनन यांची मुंबईतील उमेदवारी—नाही हें पंडितजींनी जाहीर केलें तरी त्यावर लोकांचा विश्वास बसणें कठिण आहे. अर्थात् हें एकमेव कारण नसेलहि. जागतिक वसाहतवादावर प्रहार करण्याची वेळ आली आहे हें जाणून त्याबाबत पहिलें क्रांतिकारक पाऊल आपणच टाकावें हाहि गोव्याच्या कारवाईमागील पंडितजींचा हेतु असण्याचा संभव आहे. एका दगडानें दोनच काय, अनेक पक्षी मारण्यांतच राजनीतिज्ञाचें खरें कौशल्य नाही काय ?

आंतरहेतु कोणताहि असो. गोवामुक्तीचें राष्ट्रीय मोल फार मोठें आहे ही गोष्ट निर्विवाद. पाश्चिमात्य गोटांतील आपल्या प्रतिष्ठेची थोडीफार हानी सोसूनहि पंडितजींनी हें ऐतिहासिक कार्य या वेळीं तडीस नेलें याबद्दल प्रत्येक भारतीयाचें अंतःकरण त्यांच्याविषयीच्या प्रेमादराने व अभिमानाने कसें फुलून गेलें आहे ? गेल्या चौदा वर्षांत एवढी धन्यता आम्हाला केव्हाहि वाटली नव्हती. ही धन्यता, हा निर्भेळ आनंद आम्हाला कां वाटत आहे ? 'आम्हीहि कांही करूं शकतों या प्रचीतीचा तो स्वयंस्फूर्त आविष्कार आहे. गेल्या चौदा वर्षांत एवढें भरीव व दृश्य स्वरूपाचें कार्य आमच्या डोळ्यासमोर उभें नव्हतें. अनेक राष्ट्रीय समस्या आमच्यासमोर होत्या व आहेतहि. परंतु समस्यांना तोंड देण्याऐवजी कांहीतरी घेडगुजरी व तत्त्वशून्य समझोते करणें, दिरंगाई व भ्रष्टाचार यांना वाव देणें हेंच आमचें पडखाऊ धोरण जेथेतेथे व्यक्त होत होतें. यामुळे राष्ट्रीय कर्तृत्वशक्तीवर निराशेची एक दाट मरगळ पसरली होती. परंतु राज्यकर्त्यांनी गोव्याप्रमाणे हरएक क्षेत्रांत धडाडीचें धोरण ठेवलें, लहानमोठें कोणतेंहि कार्य अखेरपर्यंत तडीस नेण्याचा कांही एक हट्ट धरला तर जनतेच्या कार्यप्रेरणाहि जागृत होतील आणि राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचें पंडितजींचें स्वप्न त्यांच्या डोळ्यादेखत साकार होईल. " तयास देखतां दुर्जन धाके ! वैसवी प्रचीतीचे तडाखे ! बंड पाषांडाचे वाखे ! सहजची होती." असे राज्यकर्ते असले म्हणजे प्रजाहि त्यांच्या आवाहनांना योग्य तो साद दिल्याखेरीज कशी राहील ?

# ★ कम्युनिस्ट चळवळींतील अंतर्गत संघर्ष ★

के. एन्. फडके

' चीनचें आक्रमण हा भारताला दीर्घकाल संत्रस्त करणारा अतिमह ाचा प्रश्न आहे ' असे खेदपूर्ण उद्‌गार आपल्या पंत प्रधानांनी नुकतेच लोकसभेंत परराष्ट्रीय धोरणाच्या चर्चेच्या वेळीं काढले.

या आक्रमणामागील वैचारिक प्रेरणा कोणत्या ? या वैचारिक प्रेरणेचा प्रतिकार कसा व कोणत्या भूमिकेवरून होणें अगत्याचे आहे ?

श्री. के. एन्. फडके यांचें यासंबंधीचें विवेचन जाणकारांनी ध्यानीं घ्यावें असें आहे.

## स्टॅलीनच्या शवपीटिकेची शोकांतिका

सोव्हिएत युनियनच्या बाविसाव्या कॉंग्रेसचें अधिवेशन ऑक्टोबर महिन्याच्या उत्तरार्धांत मॉस्को येथे भरलें होतें. पक्षाच्या कार्यक्रमपत्रिकेवर मुख्य दोन कार्यें होतीं. एक सोव्हिएत रशियाच्या विशवार्षिक कार्यक्रमावर शिक्कामोर्तब करणें आणि दुसरें पक्षाच्या नव्या घटनेला मान्यता देणें.

ह्या विशवार्षिक योजनेची तपशिलवार माहिती नुसत्या सारांशानेहि देणें शक्य नाही. सोव्हिएत रशियाला पुढील वीस वर्षें शांततेची गेल्यास ह्या योजनेतील स्वीकृत कार्यें सोव्हिएत युनियन बहुतांशी पार पाडूं शकेल ह्याबद्दल शंका बाळगण्याचें कारण नाही.

पक्षाच्या नव्या घटनेच्या चर्चेच्या वेळीं स्टॅलिनच्या राजवटीमधील विभूति-संप्रदायावर पुन्हा एकदा जोरदार हल्ला चढविण्यांत आला आणि स्टॅलिनने व्होरोशिलॉव्ह, कॅगॅनोव्हिच, मोलोटोव्ह इत्यादि सहकाऱ्यांच्या साहाय्याने पक्षांतील व पक्षाबाहेरील सहस्रो लोकांच्या केलेल्या शिरकाणाचा पाढा कॉंग्रेसपुढे नव्यानें वाचण्यांत आला आहे. मात्र कम्युनिस्ट पक्षाच्या विद्यमान विभूतीनें तोंड उघडेपर्यंत गेल्या ६।७ वर्षांत व्होरोसिलाव्हविरुद्ध कोणताहि आरोप करण्यास सोव्हिएत कम्युनिस्ट पक्षाच्या लक्षावधि सभासदांपैकी किंवा सोव्हिएत जनतेपैकी कोणाहि व्यक्तीची जिव्हा धजावूं शकली नाही हेंहि तितकेंच खरें. पक्षाच्या संघटनेंत नवें रक्त आणण्याची, सत्तेचें विकेन्द्रीकरण करण्याची व कोणाहि व्यक्तीला अवतारपदापर्यंत पोहचूं न देण्याची सावधगिरी व दक्षता नव्या घटनेच्या तरतुदींत करण्यांत आलेली आहे.

परंतु पक्षाची घटना कितीहि निर्दोष असली तरी घटनेची अंमलबजावणी माणसांच्या हातूनच व्हावयाची असते. त्या माणसांच्या मनाची घडण घटनेचें भवितव्य ठरवीत असते. स्टॅलिनच्या मृत्युनंतर सोव्हिएत कम्युनिस्ट पक्षाच्या शुद्धिकरणांच्या मोहिमेंतील अनेक घटना ज्या पद्धतीनें घडत आल्या त्यावरून सोव्हिएत कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यपद्धतींत फार मोठा मौलिक बदल घडून येईल असें आज तरी वाटत नाही.

सध्याच्या सोव्हिएत नेत्यांची वाढच अशा वातावरणांत झालेली आहे की, त्यांना लोकशाही जीवनाच्या निष्ठांच्या स्वरूपाचा व मानवी जीवनाच्या घडणीत त्या निष्ठांचा कार्यभाग काय असतो याचा बोध होणेंच शक्य नाही. विचार स्वातंत्र्य विचारविनिमयाच्या द्वारां आपल्या विचारांची सत्यता पडताळून पाहण्याचें अथवा ती सत्यता दुसऱ्या व्यक्तीला पटवून देण्याचें स्वातंत्र्य ज्या समाजव्यवस्थेंत नाही त्या समाजव्यवस्थेंत लोकशाही जीवननिष्ठा व जीवनमूल्यें यांची तोंडओळख होणेंहि शक्य नाही. अशा समाजाची धारणा व्यक्तिमहात्म्यानेंच होऊं शकते. म्हणूनच अशा समाजाची व्यक्तिमहात्म्याच्या शापांतून मुक्तता होणें शक्य नाही.

मालव्होएन जिलास ह्या युगोस्लाव्ह कम्युनिस्ट पक्षांती लनेत्याने ' न्यू क्लास ' ह्या आपल्या ग्रंथांत कम्युनिस्ट पक्षातील लोकशाहीच्या बाह्य सजावटीवर व अंतरंगावर विदारक प्रकाश टाकलेला आहे. माझी तक्रार त्या ग्रंथाच्या नांवासंबधीं आहे. त्या ग्रंथाला ' न्यू कास्ट' हें नांव अधिक शोभून दिसलें असतें. वर्ग वर्चस्वाखाली समजांत बहुसंख्यांक व्यक्तींची भौतिक व शारीरिक पिळवणूक आणि सांस्कृतिक उपासमार होत असते. परंतु जातीय वर्चस्वाखाली मनुष्यांची मनें मारलीं जातात, सत्यनिष्ठा थिजून जाते आणि सदसद्विवेक बुद्धिची ग्रहणक्षमताच नष्ट होते.

जगांतील लोकशाही क्रान्त्या भांडवलदार वर्गाच्या नेतृत्वाखाली झालेल्या असतील. परंतु व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही निष्ठा व लोकशाही मूल्यें ह्यांना भांडवलदारव र्गाच्या सत्तान्धतेपासून, स्वार्थापासून व व्यभिचारापासून जतन करण्यांत सहस्रावधि श्रमजीवी मानवांनीं हौतात्म्य पत्करलेलें आहे, हें ऐतिहासिक सत्य विसरून चालणार नाही. पोलादी शिस्तीच्या सोज्वळ नांवाखाली वरील मूल्यें व निष्ठा सदासर्वदा पायदळीं तुडविल्या जातील तर इतिहास त्याचा सूड घेतल्यावांचून राहणार नाही. स्टॅलिनच्या शवपीटिकेच्या शोकान्तिका म्हणजे समाजवादी राष्ट्रांमधील आगामी संघर्षाची नांदीच होय.

० ० ०

## चीन–रशिया मतभेद कां ?

सोव्हिएत कम्युनिस्ट पक्षाच्या बाविसाव्या कॉंग्रेसकडे जगाचें लक्ष दुसऱ्या एका महत्त्वाच्या कारणानें वेधलें गेलें. कॉंग्रेसमध्ये सोव्हिएट कम्युनिस्ट पक्ष व चिनी कम्युनिस्ट पक्ष ह्यांच्यामधील संघर्षाला उघडपणें तोंड लागलें असें म्हणावयास हरकत नाही.

चिनी कम्युनिस्ट पक्षाची वाढ इतक्या स्वतंत्रपणें झालेली आहे की, त्या पक्षाला स्टॅलिनवादी पक्ष म्हणणें हें वैचारिकदृष्टया बरोबर होणार नाही. मात्र पक्षांतर्गत व शासकीय संघटनेच्या बाबतींत चिनी कम्युनिस्ट पक्ष स्टॅलिनशाहीचा पुरस्कर्ता आहे असें म्हणण्यास हरकत नाही. क्रुश्चेव्हने स्टॅलिनच्या विभूतिमत्वाविरुद्ध उभारलेल्या मोहिमेस चिनी कम्युनिस्ट नेत्यांनी कधीच पाठिंबा दिला नाही.

परंतु सोव्हिएत कम्युनिस्ट पक्ष व चिनी कम्युनिस्ट पक्ष ह्यांच्यामधील संघर्ष हा साम्राज्यशाही राष्ट्रांचें सामर्थ्य व समाजवादी राष्ट्रांचें सामर्थ्य ह्यांचें मल्यमापन व त्या मूल्यमापनानुसार अंगिकारावयाचें क्रांतिकारक धोरण ह्या दोन प्रश्नांवर केन्द्रित झालेला आहे.

जोंपर्यंत जगांत साम्राज्यशाही राष्ट्रें आस्तित्वांत आहेत तोंपर्यंत जागतिक महायुद्धाचा धोका नेहमी रहाणार ह्याविषयीं सोव्हिएत व चीन ह्या दोन्ही राष्ट्रांच्या नेत्यांमध्ये एकमत आहे. तथापि सोव्हिएत नेत्यांच्या मतें शांततामय सहजीवन व रचनात्मक स्पर्धा ह्या मार्गाने समाजवादी राष्ट्रांच्या सामर्थ्यांत उत्तरोत्तर निश्चितपणें भर पडत जाणार आहे. आणि ह्या रचनात्मक स्पर्धेच्या मार्गानेच नवस्वतंत्र राष्ट्रें समाजवादाच्या दिशेने आकर्षिलीं जाण्याची शक्यता उत्तरोत्तर वाढत जाणार आहे. उलट चिनी कम्युनिस्ट नेत्यांच्या मतें तथाकथित नवस्वतंत्रराष्ट्रें हीं साम्राज्यशाही राष्ट्रांच्या पकडींतून अजून खऱ्या अर्थानें मुक्त झालेलीं नाहीत. ह्या नवस्वतंत्र राष्ट्रांत खरी सत्ता ही तेथील कमकुवत भांडवलदार वर्गाच्या हातीं केन्द्रित झालेली असल्याने त्या राष्ट्रांतील सत्ताधारी वर्गाकडून उपक्रमशीलतेची अपेक्षा करणें व्यर्थ आहे. केवळ शांततामय स्पर्धेवर व नवस्वतंत्र राष्ट्रांमधील लोकशाही शासनाच्या तटस्थपणाच्या धोरणावर विश्वासून राहिल्यास ही नवस्वतंत्र राष्ट्रें अल्प काळांतच सयाम, फिलिपाईन्स दक्षिण व्हिएतनाम ह्यांच्या दावणीला जखडलीं जाण्याचा संभव अधिक आहे. सोव्हिएत नेत्यांच्या मतें नवस्वतंत्र राष्ट्रांची तटस्थतेची धोरणें कितीहि डळमळीत असलीं तरी तीं धोरणें त्या त्या राष्ट्रांतील राष्ट्रीय भांडवलदार वर्गाच्या हितसंबंधावर आधारलेलीं आहेत.

नवस्वतंत्र राष्ट्रांत झालेली मिरासदार भांडवलदारीची वाढ अजून मर्यादित असल्याने शांततामय व रचनात्मक स्पर्धेच्या मार्गाने नवस्वतंत्र राष्ट्रांना साम्राज्यशाही गटाच्या आहारीं जाऊं न देतां समाजवादी ध्येयाच्या दिशेने प्रगति करण्यास समर्थ करणें समाजवादी राष्ट्रांना आज शक्य आहे. व ही शक्यता समाजवादी राष्ट्रांच्या आर्थिक व उत्पादन–सामर्थ्याचा वाढीबरोबर वाढत जाणार आहे.

### लष्करी विचारसरणींतील भेद

साम्राज्यशाही राष्ट्रें व साम्राज्यवादी राष्ट्रें ह्यांच्यामधील लष्करी सामर्थ्याचें समतोलन हा चीनी व सोव्हिएत नेत्यांमधील मतभेदाचा दुसरा महत्त्वाचा मुद्दा होय. साम्राज्यवादी राष्ट्रांचें लष्करी सामर्थ्य ही आज जागतिक राजकारणांतील निर्णायक शक्ति राहिलेली नाही. तरी सोव्हिएत नेत्यांच्या मतें साम्राज्यशाही राष्ट्राच्या लष्करी सामर्थ्याची उपेक्षा करून चालणार नाही. जागतिक महायुद्धांतून उद्‌भवणाऱ्या संहाराची भीति समाजवादी राष्ट्रांप्रमाणे साम्राज्यशाही राष्ट्रांनादेखील वाटत आहे. परंतु तेवढ्यावरून मर्यादित क्षेत्रांतदेखील आक्रमक धोरणाचा अंगिकार करणें सोव्हिएत नेत्यांच्या मतें धोक्याचें ठरणार आहे. कारण, आजच्या तणातणीच्या वातावरणांत मर्यादित क्षेत्रांतील लष्करी कारवायांतून जागतिक युद्धाचा भडका उडण्याचा संभव आहे. बर्लिनप्रश्नाबाबत क्रुश्चेव्हने स्वीकारलेली सबुरीची भूमिका सोव्हिएत् नेत्यांच्या लष्करी विचारसरणीची द्योतक आहे.

चीनच्या नेत्यांचा वरील धोरणाला विरोध आहे. त्यांच्या मतें जागतिक महायुद्ध साम्राज्यशाही राष्ट्रांनाच अधिक मारक ठरेल ही गोष्ट दोन महायुद्धांच्या पूर्वानुभवावरून सिद्ध झालेली आहे. तेव्हा मर्यादित क्षेत्रांत आक्रमक धोरणाचा स्वीकार करून दक्षिण व्हिएत्‌नाम, लाओ इत्यादि क्रांतिकारक युद्धांच्या आघाड्यांवर क्रमाक्रमाने आगेकूच करणें साम्राज्यवादी राष्ट्रांना अगदी शक्य आहे. उलट केवळ शांततामय सहजीवनाच्या अथवा शीतयुद्धाच्या धोरणाला चिकटून राहिल्यास नवस्वतंत्र देशांतील समाजवादी शक्तींचा दीर्घ काळ कोंडमार होण्याचा अगर त्यांची कोंडी होण्याचा धोका पत्करावा लागेल.


● जय सहकार ●

महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रांत भर घालणारा, अहमदनगर जिल्ह्यांतील १२ वा आणि कोपरगांव तालुक्यांतील ६ वा साखर कारखाना.

# दि संजीवनी (टाकळी)

## ★ सहकारी साखर कारखाना ★

कोपरगांव, जि. अहमदनगर

शेतकऱ्यांचें शेअर भांडवल ३५,००,०००

महाराष्ट्र सरकारनें गुंतविलेलें १५,००,०००.

० अद्यावत मशिनरीची उभारणी ०

० सुखसोयींनी युक्त असणारी वसाहत ०

डिसेंबर १९६२ अखेर पूर्ण होत आहे.

चेअरमन : शंकरराव कोल्हे

धोका पत्करल्यास लष्करी सामर्थ्याच्या समतोलनाचा काटा साम्राज्यशाही गटाकडे झुकण्याचा संभव अधिक आहे. इराक, तुर्कस्तान, सिरीया इत्यादि देशांमधील गेल्या २–३ वर्षांच्या वर्गलढ्याच्या फलश्रुतीवरून, तसेंच दक्षिण व्हिएत् नाम, लाओस इत्यादि आघाड्यांवर क्रांतिकारक वर्गलढ्यांच्या होत असलेल्या प्रगतीवरून ही गोष्ट स्पष्ट होते.

चीनने भारताविरुद्ध उघडलेल्या आक्रमक अघाडीचा उद्देश भारत पादाक्रांत करण्याचा आहे असा समज करून घेणें म्हणूनच घाबरटपणाचें आहे. ह्या धोरणामागें चीनचा खरा उद्देश आशिया व आफ्रिका खंडामधील नवस्वतंत्र राष्ट्रांचें नेतृत्व भारताकडे जाऊं नये, उलट त्या राष्ट्रामध्ये भारताला आज प्रतिष्ठा आहे त्या प्रतिष्ठेला ओहोटी लागावी आणि नेहरूंच्या तटस्थतेच्या धोरणाचा बुरखा पांघरलेल्या पैथील वर्गीय सत्तेचें वास्तविक स्वरूप उघड करावें हा आहे. भारतामधील सत्तेच्या वर्गीय स्वरूपावाबत व भारताच्या तटस्थतेच्या धोरणाबाबत व हें धोरण पेलण्याच्या भारताच्या कुवतीबाबत सोव्हिएत व चीनी नेत्यांचे तीव्र मतभेद आहेत. चिनी कम्युनिस्ट नेत्यांच्या मतें मिरासदार भांडवलदार गट हाच भारतांतील सत्ताधारी वर्ग आहे. भारतांतील सत्ताधारी पक्षाचें म्हणजे काँग्रेसपक्षाचें नेतृत्व आजला प्रत्यक्षपणें त्या वर्गाच्या प्रतिनिधींच्या हातीं नसलें तरी त्या पक्षावर मिरासदार भांडवलदार गटाचीच पकड आहे. भारतांतील ह्या मिरासदार भांडवलदार वर्गाला स्वातंत्र्य संग्रामाच्या पुण्याईची पार्श्वभूमि नसल्याकारणाने पंडित नेहरूंसारख्या पुढाऱ्याच्या नेतृत्वाला सरळसरळ आव्हान देण्याची कुवत त्या गटांत नाही. परंतु तेवढ्यावरून नेहरूंच्या नेतृत्वाला अवास्तव महत्त्व देणें म्हणजे समाजवादी राष्ट्रगटाने स्वतःची वंचना करून घेणें होय असें चिनी नेत्यांचें मत आहे.

भारतांतील राजकीय सत्ता मिरासदार अथवा सट्टेबाज भांडवलदार वर्गाच्या हातीं केंद्रित झालेली आहे असें त्यांचें निदान असल्यानें नेहरूंचें व्यक्तिमत्व किंवा भारताचें तटस्थतेचें धोरण यावर चिनी कम्युनिस्ट नेत्यांचा विश्वास पूर्वी कधी फारसा नव्हता व यापुढे बसणें शक्य नाही.

१९५४साली इण्डोचीनमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी जिनिव्हा येथे भरलेल्या परिषदेंत व चीनला स्थान मिळवून देण्यांत नेहरूंचें प्रयत्न बऱ्याच अंशी कारणीभूत झाले होते. त्या परिषदेच्या निमित्तान यूनोचे सभासद नसलेल्या चीनला जागतिक राजकारणांत मान्यता व स्थान प्राप्त झालें. दिल्ली येथे नेहरूंबरोबर पंचशील तत्त्वाचा उद्घोष करण्यांत चौ. एन्. लाय यांचा हेतू तें स्थान व ती मान्यता अधिक सुदृढ करणें एवढाच होता. यापेक्षा चिनी नेत्यांच्या पंचशीलजपाला अधिक महत्त्व देणें म्हणजे स्वतःची निखालस फसवणूक करून घेणें होय.

★ ★ ★

## हिंदी कम्युनिस्टांचें वैचारिक दारिद्र्य

चीनने भारताच्या भूप्रदेशावर आक्रमण केलें आहे किंवा नाही तसेंच, चीनने भारतावाबत अवलंबिलेलें धोरण आक्रमक अथवा युद्धखोरपणाचें आहे किवा नाही ह्या प्रश्नावर हिन्दी कम्युनिस्ट पक्षाने अजूनहि जितकी स्पष्ट भूमिका घ्यावयास पाहिजे तेवढी घेतलेली नाही. हिंदी कम्युनिस्ट पक्षामध्ये चीनच्या सीमाविषयक धोरणासंबंधी माजून राहिलेला हा गोंधळ पक्षनेत्यांनी ह्या प्रश्नाचा विचार केवळ राजकीय सोयीच्या अथवा संधिसाधूपणाच्या भूमिकेवरून केल्यामुळें उत्पन्न झालेला आहे. एक मार्क्सवादी पक्ष ह्या नात्याने त्या पक्षाने चीनच्या सीमाविषयक धोरणाचा विचार जागतिक राजकारणामधील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर करणें जरूर होते. एखाद्या राष्ट्रांचें धोरण अथवा कृत्य आक्रमक आहे किंवा नाही हें ठरवितांना पहिल्याने कुरापत कोणी केली, कोणी कोणाचा किती चौरस मैल प्रदेश व्यापला व्यापलेल्या प्रदेशांत गवताची काडी उगवते किंवा नाही हे मुद्दे साक्षेपतः गौण होत. निदान मार्क्सवाद्यांच्या राजकीय हिशेबांत ते असावयास पाहिजेत.

आज "युद्ध कीं शांतता" ही जागतिक राजकारणांतील प्रमुख समस्या आहे. जगांतील मागासलेलीं राष्ट्रें आर्थिक प्रगतीसाठी व आपलें सार्वभौमत्त्व टिकवून ती प्रगति घडवून आणण्यासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत झगडत आहेत. तीं राष्ट्रें ह्या लढ्यांत यशस्वी होणार की लॅटिन अमेरिकेंतील राष्ट्रांप्रमाणे नव्या वसाहतवादाच्या आहारीं जाणार ही जागतिक राजकारणांतील दुसरी पण तितक्याच महत्त्वाची समस्या आहे. ह्या दोन्ही समस्यांचें अवधान ठेवून गेलीं १५ वर्षें पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांनी भारताचें परराष्ट्रीय धोरण 'पंचशील' तत्त्वावर आधारलें आहे. भारत आणि चीन ह्या दोन राष्ट्रांत सीमेवरील कांही प्रदेशावावत प्रामाणिक मतभेदास

( पान ४२ वर )




भारत सरकारकडून रजिस्टर केलेलें

**पांढरे डाग**

सन १९३६ सालापासून प्रसिद्ध व हजारोंनी प्रशंसापत्रें पाठविलेलें शरीरावरील पांढ्या कोडाचें अजब गुणकारी औषध.

किंमत ५ रु. पो. ख. १। रु.

माहिती मोफत मागवा.

# अधशाचि ईश्वर...

* नवा शेजार * लेकुरवाळी रंभा
* संक्रांत * बुद्धिबळाच्या पटावर
* आपले एंजिन

## नवा शेजार

### दि. बा. मोकाशी

चांगला शेजारी मिळायला गेल्या जन्मीं पुण्य केलेलें असावें लागतें. बरींच वर्षें आम्हाला शेजार चांगला मिळाला असल्याकारणानं या पुण्याचा आपला साठा बराच आहे असं समजून मी निश्चित होतों. पण अचानक एक दिवस हा साठा संपल्याची सूचना आली.

आमच्या शेजारच्या घरांत नवें बिऱ्हाड आलें. या दिवसांत न घडणारी घटना घडली. या बिऱ्हाडांतील गृहिणीशी आमच्या गृहिणीची मैत्री जुळली. त्यालाहि माझी हरकत नव्हती. पण हळूहळू माझ्यापुढे दुरुस्तीसाठी बायकोनं आणून टाकलेल्या घरगुती वस्तूंत अनोळखी वस्तू दिसूं लागल्या. भांडीं धरण्याचें गाव्यांचें सैल झालेलें रिबेट, मोडलेलीं खेळणीं, इलेक्ट्रिकच्या प्लगपिना, खुर्च्यांच्या सैल पडलेल्या पाठी, या नि असल्या अनेक वस्तू सकाळी मी कामावर जाण्यापूर्वी किंवा कामावरून आल्यावर माझ्यासमोर येऊन पडूं लागल्या.

घरगुती वस्तू दुरुस्त करण्याचा नाद मला असल्यामुळे बऱ्याच तऱ्हेचीं हत्यारं, तारा, खिळे स्क्रूहि मीं जमवून ठेवली आहेत. मला वाटतं भोंवतालच्या शंभर दोनशे घरांत माझ्याकडेच असल्या वस्तू असाव्यात. कारण वेळोवेळीं या हत्यारांना येणारी मागणी याच परिसरांतून येत असते.

माझी यालाहि हरकत नव्हती. पण हत्यारें तुमच्याकडे आहेतच, तुमचं काम तुम्ही करतांच त्यांत आमचं एवढं सहज करतां येईल, ही जी प्रवृत्ती मला या नव्या बिऱ्हाडाची आढळली तिचा मला राग आला. पण बायकोपुढे बरेच दिवस कांही चाललें नाहीं. एवढीशी गोष्ट शेजाऱ्याकरिता तुम्हाला करायला काय हरकत आहे, असं ती म्हणाली की माझा नाइलाज होई.

म्हणूनच संध्याकाळीं दमून आल्यावरहि एक दोन वेळां कुठे स्विच लागत नाहीं, कुठे दिवा बसत नाहीं, कुठे दिवा लागत नाहीं अशासाठी मला त्यांचेकडे जावें लागलें. मी गेलों की, घरांतील दोन तरुण मुलं नि एक मुलगी–रेडिओवर अर्थातच सिलोन लागलेलें असल्याने–तीं सारीं तंद्रींत असायचीं. मधूनच त्या शास्त्रांतलीं कांही गहन वाक्यें तीं एकमेकांशीं बोलायचीं. मी कशाला आलों आहें, मीं काय केलं याचा त्यांना मी जाईपर्यंत पत्ता नसायचा.

त्या रात्रीं साडे–आठला त्यांच्याकडे बराच गोंधळ झाला असावा हें आरडाओरडीनं आम्हाला कळलं. बायकोनं आमच्या घरांतून डोकावून पाहिलं. शेजाऱ्यांच्या घरांत गुडूप अंधार झाला होता. तेवढ्यांत घाईघाईने त्यांची गृहिणी आमच्याकड येतांना दिसली. पुढचें सगळें डोळ्यापुढे येऊन माझ्या मनांत एकदा झटदिशीं बाहेर कुठेतरी निघून जावें असेंहि आलें. पण त्याच वेळीं आमच्या नात्यांतला एक मुलगा आमचेकडे येऊन बसला होता. तो नुकताच पावरहाऊसमध्ये नोकरीला लागला होता व तेंच सांगण्यासाठी तो आला होता त्याला एकटा सोडून मला जातां येईना.

तेवढ्यांत माझी बायको दरवाजांत येऊन म्हणाली,––

"जरा पहाता का शेजारी काय झालंय ! त्यांची वीजच गेली. फ्यूज गेला असेल."

मी मुकाट्यानं स्क्रू-ड्रायव्हर नि फ्यूजची तार घेतली नि निघालों. फ्यूज गेला होता तो घातला व बटण दिलें. एक क्षण वीज चमकली नि दुसऱ्याक्षणीं अंधार झाला.

मीं ओळखलें की, कुठेंतरी शॉर्ट वायर झाली आहे पण खालच्या चार नि वरच्या तीन, सात खोल्यांत कुठं काय झालं असेल तें शोधून काढण्याच्या कल्पनेनेंच तोंडावरचा घाम पुसला.

मग मेणबत्ती लावून घेऊन प्रथम एकेक दिवा काढून दर वेळेस फ्यूज घालून बटण देण्यास सुरवात केली. कारण दिव्याचें फिलॅमिंट तुटून शॉर्ट झालें असलें तर त्यांतून कळेल आणि एकेक खोलींत दोष नाहीं हेंहि समजेल ही माझी कल्पना होती. पण दरवेळेस एकेक दिवा काढतांना नि दर वेळेस फ्यूज बसवतांना नि स्टुलावरून चढतां उतरतांना मी थकून गेलों. शेवटीं एक हत्यार आणतो असं सांगून मी घरीं आलों.

घरीं येऊन घाम पुशीत खुर्चीत अंग टाकलें. पण मी पुन्हा येईन की नाही या संशयाने आमचे शेजारी माझ्या मागोमाग समोर खुर्चीत येऊन बसले. माझी हताश नि थकलेली अवस्था पाहून नि

माझ्या हातांतील गळणारे स्क्रूड्रायव्हर पाहून आमच्याकडे आलेल्या नातलग मुलानं 'काय बिघडलय' अशी चौकशी केली. आमच्या शेजाऱ्यानं फ्यूज जातो वगैरे सगळें सांगून बोलतां बोलतां जाणत्याकडून असलीं कामें करायला हवींत असा शेरा मारला.

तारुण्यांत उत्साह असतो त्या उत्साहानं आमच्या नातलगाने 'फ्यूजच जाते ना' असें म्हणून माझ्या हातांतील स्क्रूड्रायव्हर काढून घेतला. त्याच्याबरोबर आमचे शेजारीहि उठले मीहि मागोमाग निघणार होतों. पण बेत रहित केला.

त्यानंतर तासभर गेला असेल. त्या तासांत मी पडल्या पडल्याच शेजारीं काय चाललें असेल याची कल्पना करीत बसलों. मेणबत्ती घेऊन उजेड दाखवीत घरमालकीण किंवा मालक आमच्या तरुणपोराच्या मागोमाग हिंडत असतील. माझ्याच सारखा तो वरून खालती नि खालून वर जिने चढत असेल. रेडिओच्या खोलींत खुर्च्यांवर मी मेणबत्तीच्या उजेडांत पाहिलेली त्या घरांतील तरुण मंडळी तशीच तिथे बसलेली असतील. त्यांच्या तोंडावर एकंदर जगाविषयींची उद्विग्नता आलेली असेल (रेडिओ थांबल्याने!) आपले आई वडील अंधारांतून मेणबत्ती घेऊन धडपडत हिंडत असतांना तेव्हाहि एकजण उठला नव्हता. आताहि उठला नसेल. आणि हें काम अंगावर घेतल्याबद्दल आमचा नातलग स्वतःला शिव्या देत असेल.

तास झाला नि माझ्याच सारखा घामाघूम होऊन आमचा नातलग परत आला. खाली बसत तो म्हणाला,—

"सापडला बुवा फॉल्ट."

आता झालेला त्रास मीहि चटकन् विसरलों आणि माझ्यांतला दोषशोधक मेकॅनिक जागा झाला. आपल्याला जो दोष सापडला नाही तो याला सापडला! मला नकळतच वैषम्य वाटलें. शर्यतींत पराभव व्हावा तसा मला खेद झाला. मी विचारलं,—

"काय दोष होता रे?"

तो हसला. तें हसणें मी अनेकदा हसलों असल्याने माझ्या चांगलें परिचयाचें होतें. एखादा दोष बराच वेळ सापडत नाही. मग कुठेंतरी अगदी साध्या गोष्टींत तो सापडला की हसूं येतं. तसें तें हसूं होतं. हसून तो म्हणाला,—

"नाना! सुरवातीला सगळ्या खोल्यांतील वरचे दिवे मी चेक केले. निदान बारा वेळा फ्यूज उडाला नि मी बसवला. शेवटी माडीवरील एकाच खोलींतला दिवा लागला कीं फ्यूज जातो हें लक्षांत आलं,—

मी मधेंच म्हटलं,—

"मला तोच संशय होता."

माझ्याकडे लक्ष न देतां तो पुढे म्हणाला,—

"मी त्या खोलीत गेलों. वरचा दिवा मालवलेला ठेवून फ्यूज गेला. मग टेबलवरचा दिवा मालवून ठेवला तरी फ्यूज गेला.

"मग मात्र पंचाईत आली. सगळें भिंतीवरचें वायरींग नजर टाकून पाहिलें. टेबलावरच्या दिव्याची पीन उघडून पाहिली. ती व्यवस्थित होती. आंतील स्क्रूमधल्या अडकवलेल्या तारा जागीं होत्या. मग पीन काढलेली ठेऊन मी कमरेवर हात देऊन हतबुद्ध होऊन उभा राहिलों. आणि अशाच मनःस्थितींत माझी नजर टेबललॅंपकड भिंतीवरील खिळ्यांवरून नेलेल्या टेबललॅंपच्या तारेकडे गेली. भिंतीच्या प्लगपासून टेबललॅंप ठेवलेल्या टेबलाचें अंतर पंधरा फूट तरी असावे. त्या तारेवरून नजर टाकतांना मी एकदम उडी मारली.

कारण टेबल लॅंपची मूळची तार कमी पडल्यामुळे कुणीतरी आणखी तारेचा जोड त्याला दिला होता. असा जोड देतांना जोड दिल्यावर जोडाच्या उघड्या तारांवर टेप गुंडाळावा लागतो तो कुणी गुंडाळला नव्हता आणि तारेचे दोन सांधे एकमेकाला लागून सर्क्यूट (मंडल) शॉर्ट होऊन फ्यूज जात होती. मी टेप काढून दोन्ही सांध्यावर गुंडाळला. फ्यूज पुन्हा घातली नि दिवे लागले ते विझले नाहीत."

मी उगीचच म्हटलं,—

"मला तोच संशय होता."

माझ्याकडे पुन्हा लक्ष न देतां तो म्हणाला—

"त्यांच्याकडे कोण मुलगी आहे?"

मी म्हटलं,—

"त्यांचीच मुलगी आहे ती. कां?"

"ती दरवाजाशीं येऊन अगदी थॅंक्स देऊन गेली मला."

मी म्हटलं,—

"मला तोच संशय होता."

आणि मी जीभ दाबली.

● ● ●


★ विना सहकार नहि उद्धार ★

कीडनाशक औषधें, शेतकी अवजारें, पेंड आणि मिश्रखतें पुरवून शेतकऱ्यांची उन्नति साधणारी 'अ' वर्गातील...

# राहाता विविध कार्यकारी

## ★ सेवा सहकारी सोसायटी लि. ★

● सभासद ३२५ ● शेअर भांडवल २,१२,६३० ● रिझर्व फंड ३१,००० ● खेळतें भांडवल १३,००,००० ● एकूण उलाढाल ४२,४५,०००

– चेअरमन –
प्रभाकर सदाफळ

– व्हा. चेअरमन –
नाना भाऊराव जेजूरकर

– सेक्रेटरी –
बी. बी. वाघचौरे

# केळीं

## लेकुरवाळी रंभा

एस्. वाय्. जोशी,
पुणें.

### केळ्यांचे खाद्य पदार्थ

केळें हें फळ महाराष्ट्रांत सर्वांच्या परिचयाचें आहे. केळें हें रुचीला मधुर व बल वाढविणारें आहे. कफ प्रकृतीच्या लोकांनीं तें खाऊं नये. कच्च्या केळ्यांची भाजी चांगली होते. सामान्य माणसांच्या संसारांत, केळ्यांची शिकरण हें पक्वान्नच समजलें जातें. पिकलेल्या केळ्यांची दह्यांतली कोशिंबीर रुचकर बनते. केळ्यांचीं भजीं होतात. उपवासाला केळ्यांच्या पिठाची लापशी चालते. पाहुण्यांचा सत्कार चहा देऊन करण्याची प्रथा मोडली व त्याऐवजीं केळें देण्याचा प्रघात पडला तर तो काटकसरीचा व स्त्रियांचा वेळ वांचविणारा म्हणून इष्टच ठरेल. सत्यनारायणाच्या प्रसादांत व घरगुती चांगल्या शिऱ्यांत केळें पौष्टिक व मधुर म्हणूनच त्याचे काप घालतात. मध्यमवर्गीयांच्या आहारांतून दूध, तूप, लोणी हे स्निग्ध पदार्थ जवळजवळ नाहींसेच झाले आहेत. शेंगदाणे खाणें परवडत नाहीं. त्याच्या तेलाचा भाव अडीच रुपये किलो आहे. या स्निग्ध पदार्थांची उणीव केळीं थोड्याफार प्रमाणांत भरून काढतील.

### पुण्यांतील आवक

पुण्यांत रोज ८।१० मालट्रक्स भरून केळीं येतात. तो माल सरासरी ८०० मण असतो. तो आल्यावर येथे अनेक गोडाऊन्समध्ये भरून त्याची अढी लावतात. ७–८ दिवसांत तो तयार होऊन बाहेर काढतात. तो सर्व माल मोठ्या शहरांतून विकण्याचें काम दुकानदारांप्रमाणे २००–२२५ हातगाडीवालेहि करीत असतात. हा माल आळें–बेल्हे –खानदेश–जळगांव–गुजराथ मधून येतो. वसई, पापडी, नालासोपारा, आगाशी येथला सर्व माल मुंबईंत खपतो. वखारवाले हातगाडीवाल्यांना परवडेल अशा भावाने माल देतात. बाजारांत सरसकट सहा आणे डझन या भावाने सामान्य केळीं मिळतात. आठ आणे डझनाप्रमाणे घेतल्यास उत्तम माल मिळतो. बाजारांत मिळणारा आठ आण्यांचा कोणताहि खाद्यपदार्थ घेतला तरी तो वजनांत सोललेल्या डझन केळ्या इतका भरत नाही व इतका पौष्टिक आणि शुद्ध असत नाही.

### केळ्याचे औषधी गुणधर्म

स्त्रियांच्या तांबड्या धुपणीवर केळें व तूप देतात. केळें, लिंबू व साखर यांच्या चाटणानें आव बरी होते. केळीच्या गड्ड्यांचा रस दुधांतून घेणें हें एक क्षयरोगावर गुणकारी औषध आहे. त्याचप्रमाणे याने तांबडी होणारी लघवी बरी होते. "तें नित्य नियमाने सेवन केल्यास मनुष्य पुष्ट होतो. तें तत्काल शुक्रवृद्धि करणारें आहे" असें 'घरगुती औषधें' यांत आप्पाशास्त्री साठे यांनी लिहिलेलें आहे. केळफुलांच्या भाजीने कृमींचा नाश होतो. डॉ. परुळेकर, एम्. डी. हें अॅनिमियावर केळें, लोणी व मध हें मिश्रण घेण्यास सांगत व त्याने अनेकांना गुण आला. मुंबईचे डॉ. नार्वेकरहि हेंच मिश्रण त्या विकारावर सांगतात. मुंबईचे डॉक्टर बापूसाहेब म्हसकर व बार्शीचे सुलाखे वकील यांनीहि आपल्या 'दीर्घायुष्य व आहार' या पुस्तकांत केळ्यांचें महत्त्व वर्णिलें आहे. बौद्धिक काम करणारांनीं भोजनोत्तर रोज दोन केळीं खावीं अशी अनेक डॉक्टर–वैद्य शिफारस करतात. अनशनपोटीं केळीं खाऊं नयेत. केळ्यावर पाणी प्यालें असतां जुलाब होतात असें वैद्य सांगतात.

### मुलांचें मधल्या सुट्टींतील खाद्य

पुण्यांतील कांही प्राथमिक शाळांतून गरीब मुलांना पौष्टिक म्हणून वड्या खाण्यास देतात त्यांत मिल्क पॉवडर, शेंगदाण्याची पावडर, व थोडी साखर असें मिश्रण असतें. तें विनामूल्य देतात पण तें खाद्य शाळेंतील सर्व मुलांना उपलब्ध होत नाहीं.

मिल्क पावडर, मग ती इंग्लंडची, अमेरिकेची, डेन्मार्कची, अथवा अमूलची असो, ती मध्यमवर्गीयांना घेणें परवडत नाही. त्याऐवजीं मुलांना केळ्यांच्या पिठाची लापशी देणें परवडेल व ती मिल्क पावडरची बरोबरी व भरपाई करूं शकेल.

कसलीहि मिठाई, चॉकोलेट्स, लेमनड्रॉप्स, श्रीखंडाच्या वड्या, चिक्की, गुडदाणी वगैरेपैकीं कोणतेंहि खाद्य केळ्याची बरोबरी करूं शकणार नाहीं. अर्धा आण्यांत एक केळ म्हणजे एक आण्यांत दोन केळीं येतात. वर उल्लेखिलेल्यापैकीं कोणतीच वस्तु केळ्याच्या वजनाची व पौष्टिकतेची बरोबरी करूं शकणार नाहीं. १ आण्याला मिळणाऱ्या दोन बिस्किटांचें वजन दीडतोळाहि असत नाही. तें १ आण्यांत मिळणाऱ्या दोन केळ्यांचें वजन किमान सात तोळे तरी असतें.

### केळीच्या बागा कां नष्ट झाल्या

१५।२० वर्षांपूर्वी पुण्याच्या आजूबाजूला केळीच्या शेकडों बागा होत्या. त्या शहरांतील लोकांना पानाचा पुरवठाहि करीत असत. केळीचीं पानें कापलीं म्हणजे तिला अगदी लहान लहान केळीं येतात. म्हणून केळांच्या दृष्टीने त्या बागा निरूपयोगी होत्या. पुण्यात सर्व सोयींनीं युक्त अशीं मंगल कार्यालयें वाढत्या प्रमाणांत होऊं लागलीं. पुणें ही लग्नाची बाजारपेठ झाली. केळीच्या पानांना वाढती मागणी येऊं लागल्यामुळे त्यांचे भाव वाढूं लागले. व ते परवडेनासे झाल्यामुळे त्याजागीं स्टेनलेसस्टीलचीं ताटें आली. केळीच्या पानास कोणी विचारीनासें झालें. किंमत मागणी व पुरवठा या मेळांत ते न बसल्यामुळे केळीच्या बागा नाहींशा झाल्या. आतां मंगलकार्यालयाच्या दारावर केळीचे दोन खुंटहि मिळणें अवघड झालें आहे.

केळीला रंभा म्हणतात. केळीचा खुंट लावल्यापासून १० महिन्यांत त्याला घड येऊं लागतात. एका घडांत २५० पर्यंतहि केळीं असूं शकतात. निदान दीडशेपेक्षा कमी असत नाहीत. केळ दिवसा वीत नाही ती स्वत: निकालांत निघण्यापूर्वी ३–४ पिलांना जन्म देते. कोणतीहि केळ वांझ असत नाहीं. उंच केळी वाऱ्यानें मोडून पडतात. सिंगापुरी केळी ४–५ फूटच उंच असतात. त्याला लागणारे घड जमीनीवर पडलेले दिसतात.

### केळीचा वाख व सोपटांचें पाणी

केळीच्या सोपटाचा वाख चांगला लांब धाग्याचा निघतो. कांही वर्षांपूर्वी अग्रिकल्चरल कॉलेजमध्ये डॉक्टर मॅन साहेब असतांना मी त्यांचेकडून सोपटाचा वाख काढून आणला होता. तसा प्रयत्न पुन: झाल्याचें ऐकिवांत नाही. बागाइतदार केळी तोडल्या की, त्यांचे खुंट बांधावर फेकून देत असतात. त्यांचा कुजवून खत म्हणून कोणीहि उपयोग करीत नाहीं. केळीचा खुंट चरकांत घालून पिळला तर त्यांत ८५ टक्के पाणीच निघतें. हें एक जातीचे रसायन–प्रिझरव्हेटिव्ह–आहे. म्हणून तें उडदाचे पापड टिकविण्यासाठी त्यांत वापरतात. त्याचे कपड्यावर पडलेले डाग निघत नाहीत. त्या रसायनात खाकी कपडे रंगविले तर त्याचा रंग कायम फास्ट टु ब्लीच होऊन अनेक सरकारी खात्यांतील खाकी कपड्यांना उपयोगी पडेल. सन १९१४ सालापूर्वी या रसायनाचीं टिपें भरून जर्मनीला रंगासाठीं जात असत, अशी माहिती मिळते. पण त्यास कागदोपत्रीं पुरावा अद्याप मिळाला नाही.

### सुकेळीं व केळ्यांची पावडर

सुकेळीं हीं फक्त राजाळी केळ्यांचीच होतात असें नसून आत, दुसऱ्या जातीचीं केळींहि सुकेळीं होऊं लागलीं आहेत. आगाशील सुकेळीं मोठ्या प्रमाणांत मुंबईस येऊन खपत आहेत. बटाट्याचे वेफर्स करण्याचा कारखाना आहे. या भागांतून केळ्याचे वेफर्स, कष्ट जास्त, दिसण्यांत नाजूक व वजनांत हलके व फार काल न टिकणारे असे असतात. ते पौष्टिक नाहीतच म्हणून त्याची जागा केळ्यांचे वेफर्स पटकावतील असें दिसतें.

नुकताच 'श्रीछत्रपति सहकारी केळी पावडर कारखाना' य नांवाचा केळ्यांपासून पावडर बनविण्यासाठी एक कारखाना पुणें जिल्ह्यांतील वेल्हे या ठिकाणीं सुरू झालेला आहे.

### रत्नागिरीकरांना सूचना

नुकत्याच झालेल्या वादळानें रत्नागिरी जिल्ह्यांतील नारळी पोफळीच्या बागा उद्‌वस्त झालेल्या आहेत. त्या पुन: तयार होण्यास २५–३० वर्षें व लक्षावधी रुपये लागतील. तें सरकारच्या व लोकांच्या अवाक्याबाहेरचें काम आहे. पण तोपर्यंत केळीच्या बागांची जोपसना त्यांनी केल्यास जीवनकलह थोडाबहुत तरी सुकर होईल. नारळी पोफळीप्रमाणेंच केळींनाहि पाणी लागतें. तें तेथें आहे म्हणून ही सूचना करावीशी वाटते. त्या जिल्ह्यांत मिरी, वेलोदोडे, नागवेलीचीं पानें होण्यासारखीं असलीं तरी या लांबच्या योजना आहेत. तात्काळची गरज भागविण्याच्या दृष्टीने केळीच्या बागांचा प्रयोग करून पहाण्यासारखा आहे.

★ ★ ★

श्रीरामपुरांत कोठे उतराल ? स्टेशनपासून आवघ्या पांच मिनिटांच्या रस्त्यावर !

★ आदर्श लॉजिंग ॲण्ड बोर्डिंग ★

★ जेवणाची व राहण्याची उत्तम सोय ★

गावडे बिल्डिंग, श्रीरामपूर, जि. अहमदनगर

प्रोप्रा.—एस. बी. गावडे

हवेशीर प्रशस्त खोल्या, उत्कृष्ट व रुचकर भोजनासाठी ....

★ पूनम लॉजिंग ॲण्ड बोर्डिंग ★

मासिक मेंबर्स व विद्यार्थ्यांना सवलत

— मेनरोड, श्रीरामपूर —

प्रोप्रा.—देवसी धरमसी ठक्कर

एक भारतीय सण

# संक्रांत

**पं. महादेवशास्त्री जोशी.**

महाराष्ट्राप्रमाणेच भारताच्या इतरहि भागांतून 'संक्रांत' किंवा 'मकरसंक्रमण' हा सण साजरा करण्याची चाल प्रचलित आहे. तामीळ लोकांत या दिवशीं नवीन पिकलेला तांदूळ प्रथमच शिजविला जातो. या भाताला 'पोंगल' अशी संज्ञा आहे. यामुळे संक्रांतहि 'पोंगल' या नांवानेच या भागांत साजरी करण्यांत येते. सूर्यप्रकाशामुळे सर्व सृष्टींत चैतन्य येत असल्याने या सणाला सूर्याची सर्वत्र पूजा केली जाते. पोंगल ( भात ) प्रथमच सूर्याला अर्पण करण्यांत येतो. सूर्यपूजेसाठी घराच्या आवारांत जेथें प्रखर ऊन पडतें अशी जागा निवडण्यांत येतें. ती स्वच्छ करून गाईच्या शेणाने सारवली जाते. घरांतील स्त्रिया तांदुळाच्या पिठाने तेथे एक कमलाकृति काढतात. त्याच्या मध्यभागीं सूर्याची आकृति असते व दोन्ही बाजूस संज्ञा व छाया ह्या त्याच्या स्त्रियांचीं चित्रें असतात. संज्ञा ही विश्वकर्म्याची कन्या व छाया ही तिची प्रतिमाच असते.

ह्या काळांत कावेरीसारख्या पवित्र नदींत स्नान करणे फारच पुण्यप्रद मानलें जातें. त्यामुळे तंजोरजवळ तिरुवादि येथ या दिवशीं मोठी जत्रा भरते. त्याचप्रमाणे तिन्नेवेल्ली जिल्ह्यांतून वाहणाऱ्या ताम्रपर्णी नदींत व वेदारण्य येथे समुद्रांत स्नान करण्यासाठी भाविक लोक गर्दी करतात.

बंगालमध्ये काकवींत तीळ घालून 'तिळुआ' नांवाचा पदार्थ करून तो वाटतात. याशिवाय तांदळाच्या पिठांत तूपसाखर मिसळून 'पिष्टक' नांवाचें खाद्य तयार करून तें वाटायचें असाहि प्रघात आहे. म्हणून बंगालमध्ये या सणाला 'तिळुआ संक्रांती' किंवा 'पिष्टक संक्रांति' अशीं नांवें रूढ आहेत. या दिवशीं गंगास्नानाला महत्व असल्याने प्रयाग येथे लक्षावधि लोकांची स्नानयात्रा भरते.

पौष महिन्यांत सूर्य मकरराशींत प्रवेश करतो. या दिवसापासून उत्तरायणाला प्रारंभ होतो. मेषादि बारा राशींतून सूर्य एका वर्षांत भ्रमण करतो. त्यामुळे वर्षाच्या बारा संक्रांति होत असल्या तरी कर्क व मकर हीं दोन संक्रमणें महत्वाचीं मानलेलीं आहेत. कर्कसंक्रमण आषाढांत येतें. त्या दिवसापासून दक्षिणायन सुरू होतें. कर्कसंक्रातीपासून दिनमान कमीकमी होत जातें आणि मकरसंक्रातीपासून तें वाढत जातें. कित्येक विद्वानांचें मत आहे की, कोणत्यातरी प्राचीन काळीं उत्तरायणाचा आरंभ हाच वर्षारंभ मानून त्या निमित्त हा सण करीत असावेत.

## चांगला श्रोता

कै. अहिताग्नि राजवाडे यांचीं त्यांच्या पुण्याच्या अग्निहोत्र मंडळांत जीं व्याख्यानें नेहमी होत त्याला त्यांच्या पत्नी न-चुकतां हजर असत. घरांत कितीहि कामें असोत, अडचणी असोत, त्या सर्व तात्पुरत्या बाजूस सारून आपल्या पतीच्या व्याख्यानाला हजर राहणें व अगदी शेवटपर्यंत तें लक्षपूर्वक ऐकणें या गोष्टी त्या न चुकतां करीत असत. आहिताग्नि राजवाड्यांना या गोष्टीचें फार कौतुक वाटावयाचें.

एके दिवशीं आपल्या व्याख्यानांत ते श्रोता कसा असावा याबद्दलचें विवेचन करीत होते. गालांतल्या गालांत हंसत ते विनोदाने म्हणाले, "श्रोता कसा असावा हें जाणण्याबद्दल तुम्ही उत्सुक आहांत ना? बघा तिकडे, तिथे तो बसलेला आहे" असे म्हणून त्यांनीं शेजारच्या खोलीकडे बोट दाखविलें. ( त्या खोलीच्या दारांत त्यांच्या पत्नी हें व्याख्यान ऐकत बसलेल्या होत्या. )

. या वेळीं व्याख्यानाला उपस्थित असलेल्या बऱ्याच श्रोतृवर्गाच्या नजरा त्या खोलीकडे वळल्या. तथापि त्यांना कांहीच अर्थबोध झालेला नाही हें लक्षांत येतांच राजवाडे म्हणाले, "अहो, तो श्रोता म्हणजे आमची 'ही'! हिला नीटस वाचतां येत नाही, तिचं शिक्षणदेखील अगदी बेताचंच आहे तरीसुद्धा सर्वसामान्य माणसाला 'क्लिष्ट' वाटणारीं माझीं भाषणें ती फारशी चुळबुळ न करिता एकाग्र चित्ताने ऐकतें. वास्तविक तिला यातलं कितपत कळतं तें तिचं तिलाच माहीत. मला त्याचा उलगडा अजून झालेला नाही."

"तथापि एक गोष्ट मात्र मी अभिमानानें सांगेन की, आमच्या 'हि'च्यासारखा चांगला श्रोता दुसऱ्या कोणत्याहि व्यक्तीस कधीच मिळाला नसेल. आणि असा हा थोर श्रोता मला मिळाला हें मी माझें भाग्यच समजतों."

—रमेश के. सहस्रबुद्धे

### एक ऐतिहासिक सत्य

संक्रांत ज्या दिशेकडून येते त्या दिशेच्या लोकांस सुख, जिकडे जाते व पहाते त्या दिशांना दुःख, ज्या वाहनांवर बसते व ज्या वस्तू स्वीकारते त्यांची महर्घता किंवा नाश या समजुतीच्या मुळाशी एक ऐतिहासिक सत्य दडलेलें आहे. संक्रांत या शब्दाला अरिष्ट, संकट असा जो दुसरा अर्थ आहे तोहि जुना आहे. ध्रुवप्रदेशांत राहणारे आपले पूर्वज सहा महिन्यांनंतर उगवणाऱ्या सूर्याचा उत्सव करीत त्याच वेळीं त्यांना एका निराळ्या 'संक्रातीला'—'संकटाला'—तोंड द्यावें. लागे. ध्रुवप्रदेश प्रकाशमान झाला कीं तेथली पिकें वाढू लागत' अशा वेळीं लुटारू लोक त्यांच्यावर धाडी घालीत, शेतांतले धान्य कापून नेत व घरांतलें लुटून नेत. त्यांच्यापाशी वाघ, सिंह इत्यादि माणसाळलेले हिंस्र पशू असत. या लुटारूंचें आपल्या त्या प्रदेशांतल्या पूर्वजांना फार भय वाटे. त्यावरून संक्रातीचें वाहन, आकार, रूप आणि तिच्यामुळे होणारे अनर्थ या सर्वांच्या देवतास्वरूपांत कल्पना केल्या गेल्या. संक्रातीला ज्या वस्तू देतात त्यांना वाटणें न म्हणतां लुटणें म्हणतात याचाहि गर्भितार्थ हाच आहे.

'भारतीय संस्कृति कोशा

# बुद्धिबळाच्या पटावर

(लेखांक तिसरा)

ले.–श्रीकृष्ण साखळकर

आपण आत्तापर्यंत बुद्धिबळाचा पट कसा मांडावयाचा, पटावर मोहरीं कशीं लावायचीं आणि त्या मोहऱ्यांच्या खेळ्या कशा खेळावयाच्या हें पाहिलें. नंतर त्या खेळाची नोंद कशी करावयाची याचाहि अभ्यास केला. या व्यतिरिक्त जे नियम बुद्धिबळाचा डाव खेळण्यासाठी व चर्चेसाठी जरूर आहेत त्यांचा या लेखांत विचार करावयाचा आहे. त्यानंतर नवशिक्या खेळाडूला डावाची पूर्ण ओळख होईल, आणि आपण बुद्धिबळाचा डाव उत्तम प्रकारें खेळण्यासाठी ज्या तत्त्वांची ओळख करून घ्यायला हवी. त्यांचा अभ्यास करण्यास मोकळे होऊं. केवळ माहितीखातर मी तीं तत्त्वें येथें नमुद करतों. त्यांचा अभ्यास आपल्याला पुढील लेखापासून सुरू करावयाचा आहे.

१) पटाचा मध्य २) रांगेंतला खेळ ३) सातव्या व आठव्या पट्टींतला खेळ ४) मुक्त प्याद्याचा खेळ ५) विरेंतील मोहरें ६) काटशह ७) मोहरामोहरी ८) प्याद्याची साखळी—हीं तीं तत्त्वें होत. नवशिक्यांना या तत्त्वांनीं विचकून जाण्याचें कारण नाहीं. आपण त्यांचा संपूर्ण अभ्यास करणार आहोंत —व मग ते नवशिके रहाणार नाहीत. या तत्त्वांच्या अभ्यासानंतर खेळाडूंची कमींत कमी अखिल भारतीय सामन्यांत खेळण्याची तयारी होईल असा मला विश्वास आहे.

आतां आपण बुद्धिबळाच्या नियमांचा विचार करूं या.

१) बुद्धिबळाचा पट :— अ) एका खेळाडूकडून दुसऱ्या खेळाडूकडे ज्या चौकोनांच्या आठ ओळी येतात त्याला 'रांगा' ( Files ) म्हणतात. आ) रांगाशी काटकोन साधून पटावर ज्या चौकोनांच्या आडव्या ओळी येतात त्यांना 'पट्ट्या' ( Ranks ) म्हणतात. इ) एकाच रंगाचे चौकोन एकाला एक जोडून जी ओळ करतात त्याला कर्णरेषेंतील ( Diagonals ) चौकोन म्हणतात.

२) डाव खेळण्याची पद्धत :–अ) प्रत्येक खेळाडूने एका वेळीं एकच खेळी खळावयाची. ज्या खेळाडूकडे पांढरीं मोहरीं असतील त्याला प्रथम खेळी खेळण्याचा अधिकार आहे. आ) नंतर खेळाडूंनीं आळीपाळीने खेळावयाचे.

३) खेळी: अ) दुर्गाश्रयाची (Castling) खेळी सोडल्यास खेळी मोहरें एका जाग्यावरून दुसऱ्या रिकाम्या किंवा विरुद्ध पक्षाच्या मोहोऱ्याच्या चौकोनांत खेळल्यावर पुरी होते. ( मोहोऱ्यांमध्ये प्याद्यांचाहि समावेश करावयाचा ) आ) दुर्गाश्रयांतील खेळीचा हत्ती वा घोडा याखेरीज दुसरें कोणतेंहि मोहरें दुसऱ्याच्या डोक्यावरून पलीकडे गती घेत नाहीं. ३) विरुद्ध पक्षाचें मोहरें असलेल्या जागीं मोहरें खेळल्यावर विरुद्ध पक्षाचें मोहरें बाद होतें, व तें पटावरून काढून टाकणें जरूर आहे. अशा खेळीला मोहरें मारणें अशी संज्ञा आहे.

४) दुर्गाश्रय ( Castling ) अ) ही खेळी खेळाडूंचा राजा व त्याचा कोणताहि हत्ती यांची आहे. राजा मूळच्या जागेवरून पट्टीवरील एक सोडून दुसऱ्या घरांत खेळावयाचा व ज्या बाजूच्या हत्तीकडे राजा खेळला असेल तो हत्ती राजा ज्या घरावरून खेळला त्या घरांत ठेवायचा. आ) राजा किंवा ज्या हत्तीबरोबर खेळी खेळावयाची तो अगोदर मूळ जागेवरून हलवलेले असतील तर दुर्गाश्रयाची खेळी खेळतां येत नाहीं. इ) राजाचें घर, तो ज्या घरावरून जातो तें घर अगर तो ज्या घरांत जातो तें घर तिपक्षाच्या मोहऱ्याच्या हल्याखाली असेल तर दुर्गाश्रय घेतां येत नाहीं. ई ) जर राजा व हत्ती यांच्यामध्ये मोहरें असेल तर दुर्गाश्रयाची खेळी खेळतां येत नाहीं.

५) प्यादें :–फक्त पुढेंच चालतें. इतर मोहऱ्यांसारखी मागची गति नाहीं. अ) प्याद्याच्या पहिला खेळीला तें एक किंवा दोन घरें व नंतर एक घर सरळ रांगेंत चालतें. प्रतिपक्षाचें मोहरें मारतांना मात्र तिरकें ( Diogonally ) मारतें आ) प्याद्याचा चौकोनावर हल्ला असेल व प्रतिक्षाचें प्यादें दोन घरें खेळल्यामुळे त्या चौकोनावर पलीकडे जात असेल तर प्रतिपक्ष प्यादें एकच घर खेळला असें समजून लगोलग आपल्या खेळीला तें मारतां येतें. या खेळीला 'वाटमारी' चाल म्हणावयाचे. ३) प्यादें आठव्या घरांत पोहोंचल्यावर त्याच्या बदली खेळाडूच्या इच्छेनुसार वजीर, हत्ती, उंट किंवा घोडा, प्यादें पटावरून काढून टाकून त्या ठिकाणीं लगेच ठेवायचा. हें मोहरें इतर मोहऱ्यांचा विचार करून मागण्याची जरूरी नाहीं. म्हणजे खेळाडूला दोन वजीर, तीन हत्ती, उंट वा घोडे पटावर होत असतील तरी फिकर नाहीं.

६) शह अ) राजा ज्या घरांत आहे त्यावर प्रतिपक्षाचा मोहोऱ्याचा हल्ला असेल तर राजा शहांत येतो. आ) शह लगोलग आपल्या खेळीला तोडणें जरूर आहे. शह तोडता येत नसेल तर मात होते. इ) शह तोडण्यासाठी म्हणून वापरलेला मोहरा प्रतिपक्षाच्या राजाला शह देऊं शकतो.

७) खेळाची हार जीत–अ) प्रतिपक्षाच्या राज्यावर मात केल्यावर डाव जिंकला असें समजायचें आ) विरुद्ध पक्षाच्या खेळाडूंनीं शरणागति दिली तर जीत होते.

८) डावाची बरोबरी अ) जर राजावर हल्ला नसेल व दुसरी कोणतीहि खेळी नियमानुसार खेळतां येते तर खुजा वडा होतो. हा डाव बरोबरीचा समजावयाचा आ) दोन्ही खेळाडूंच्या समजुतीने डावाची बरोबरी होते. इ) जेव्हा पटावर तोच तो डाव तिनदां येतो तेव्हा कोणत्याहि एका खेळाडूला बरोबरी मागतां येते. ई) जेव्हा खेळाडू तीच ती खेळी खेळून प्रतिपक्षाला तेंच तें खेळायला लावतो तेव्हा बरोबरी होते. उ) कोणत्याहि डावांत जर पन्नास खेळामध्ये मोहोरामोहोरी झाली नाहीं ( मोहोऱ्यांची मारामारी ) किंवा प्यादी पन्नास खेळयांत हालली नाहीत तर डावाची बरोबरी होते.

९) खेळाडूंची वर्तणूक–खेळ चालू असतांना टिपणें, पुस्तकें किंवा लेखी माहिती वापरण्यास प्रतिबंध आहे. दुसऱ्या पटावर त्या डावाची छाननी करावयाची नाही. दुसऱ्या खेळाडूकडून सल्ला घ्यावयाचा नाहीं प्रतिपक्षाला चीड आणणारें कोणतेंहि वर्तन करायचें नाहीं.

★ ★ ★

# आपलें एंजिन कसें घ्याल ? कसें वापराल ?

आता एंजिनांचा प्रसार खेडोपाडीं भरपूर प्रमाणांत झालेला आहे. परंतु एंजिन वापरणाऱ्या शेतकऱ्याला एंजिन घेतांना कोणत्या अडचणी येतात, पुढे शेतांत एंजिन आल्यावर वरचेवर कोणत्या दुरुस्त्या कराव्या लागतात, निरनिराळया कंपन्यांच्या एंजिनांचीं वैशिष्टयें कोणतीं, ती वापरावीत कशी इत्यादिसंबंधीचें वास्तविक व कामचलाऊ ज्ञान शेतकऱ्याला पुष्कळदा नसतें.

श्री. वाघ हे खानदेशांतील एक पुढारलेले शेतकरी आहेत. अनेक एंजिनें त्यांनी आजवर वापरलीं आहेत, पाहिलीं आहेत. शेतकऱ्याच्या दृष्टीनें उपयुक्त ठरेल व शहरी व्यापाऱ्यांनाहि मार्गदर्शक होईल अशी एंजिनसंबंधीची विविध माहिती 'माणूस' मधून यापुढे चार पांच लेखांच्या द्वारें वाचकांसमोर ठेवण्याचा श्री. वाघ यांचा विचार आहे.

जेव्हा शेतकरी एंजिन खरेदी करायचें ठरवितो तेव्हा एखादा अर्धवट ज्ञान असलेला पण लबाड मेकॅनिक त्याला गाठतो. मुंबई–पुण्यासारख्या ठिकाणीं घेऊन जातो. त्याला दोनचार दुकानांतून फिरवतो आणि शेवटी ज्या कंपनीशी त्याचें कमिशन ठरलें असेल त्या कंपनीच्या दुकानी त्याला घेऊन जातो. अडाणी शेतकऱ्याजवळ एखाद्या फडतुस कंपनीच्या एंजीनचें गुणवर्णन करून त्याला तें एंजिन घेणें भाग पडतो आणि आपला खिसा गरम करून घेतो. यामुळे शेतकऱ्याचें अतोनात नुकसान होतें. शेतकरी एंजीनच्या भरवशावर भरपूर बागाईत लावतो. ऐन वेळीं एंजिन काम देईनासें होतें. पैशापरी पैसा जातोच पण योग्य वेळ टळून गेल्यामुळे कित्येकदा बागईत सुकून जाते व शेवटी शेतकरी सर्व बाजूने कंगाल होतो. एखाद्या मोठ्या कारखानदाराची मशिनरी बंद पडली तर त्याचें त्या काळापुरतेंच नुकसान होतें. पण शेतकऱ्यांची मात्र सबंध वर्षाची कमाई जाते. यासाठी शेतकऱ्याने एंजिन खरेदी करतांना चांगल्या विश्वासू मेकॅनिकचा सल्ला घेणें जरूर आहे.

शेतकऱ्याने एंजिन खरेदी करतांना कांही किमान गोष्टींचा विचार करणें जरूर आहे. ज्या इंजीनची रचना साधी–सोपी व सरळ असेल असेच एंजिन घेणें शेतकऱ्याने पसंत करावे. कारण बारीकसारीक बिघाड ( मायनॉर रिपेअरी, ) दुरुस्त करणें, व्हॉल्व्हज् ग्रॅंड करणें, ऑटोमायझर साफ करणें, तेल पास करणें, तेल बदलणें अशा अनेक किरकोळ बाबी प्रत्यहि कराव्या लागतात. अशा गोष्टींसाठी प्रत्येकवेळी मेकॅनिक बोलावून त्याच्याकडून ह्या गोष्टी करवून घेणें किंवा क्षुल्लक कामासाठी वेळोवेळी १०–२० रुपये देणें परवडत नाहीं. आपल्या अडचणीच्या वेळी नेमकाच तो विशिष्ट ठिकाणी भेटेलच असे नाहीं. त्यामुळे या किरकोळ वाटणाऱ्या पण अत्यंत महत्त्वाच्या अडचणींसाठी एंजिन बंद ठेवण्याची पाळी येते. म्हणून एंजिन खरेदी करतांना त्याची रचना शेतकऱ्याने संपूर्ण लक्षांत घेणें आवश्यक आहे

### दुकानदारांचे गैरव्यवहार

त्याचप्रमाणे दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, इंजिनचे सुटे भाग लवकरांत लवकर मिळतात किंवा नाही, तसेच कंपनीचेच ओरिजनल भाग मिळतात का, या गोष्टी पहाणें जरूर आहे. समजा एखादें एंजिन आपण एक दोन वर्षे वापरलें आणि त्याचा सिलिंडर लायनर व पिस्टन घासला गेला अन् हे भाग नवीन बसविणें आवश्यक झालें अशा वेळी आपण जवळच्याच शहरांतील अगर गांवांतील माशिनरीच्या दुकानांत जातो. तेथे नेमकाच आपणास पाहिजे असलेला भाग मिळतोच असे नाहीं. तेव्हां तीन–चार दिवसांत कंपनीकडून हा भाग मागवून देतो असें आश्वासन दुकानदार देतो, मागणी नोंदविण्यास लावतो व आगाऊ कांही रक्कम घेतो. तीन चार दिवसांनी परत बोलावतो. तीन चार दिवसांनी आपण फेरी मारावी तर अजून मालच आलेला नाही अशी सबब सांगून दुकानदार आपणाला परत पाठवतो. असें पंधरावीस दिवस चालते. आपण आगाऊ कांही रक्कम भरलेली असल्याने आपणांस दुसऱ्या दुकानीं जातां येत नाही. शेवटी आपण खूप त्रागा केल्यावर भरपूर किंमत देऊन मगच माल आपल्या पदरांत पडतो. तशात ते भाग कंपनीकडून मागविलेले नसतातच. आग्रा, मद्रास,दिल्ली,कलकत्ता अशा मोठ्या शहरांतील वर्कशॉप्स्मध्ये ऑर्डर देऊन दुकानदाराने ते भाग स्वस्त किंमतींतलेच मागविलेले असतात. अशा भागांसाठी जें खास पोलाद वापरावें लागतें तें वापरलेलें नसतें. मूळ कंपनीइतका काटेकोरपणा व सफाई त्या भागांची केलेली नसते. मजबुतीच्यादृष्टीने व कमी घर्षण व्हावे म्हणून जे संस्कार करणें इष्ट असते ते केलेले नसतात. असे सुटे भाग एंजिनला जोडतांना

त्रासच होतो. काटेकोरपणा नसल्याने एंजीनचें तंत्रच विघडून जातें. तें व्यवस्थित काम देत नाही. थोडयाच दिवसांत ते भाग निकामी होतात व पुनः नवीन आणणें भाग पडते.

एखाद्या शेतकऱ्याने मुंबई-पुण्यासारख्या प्रमुख शहरांतून व कंपनीनें नियुक्त केलेल्या दुकानांतूनच भाग आणावयाचे ठरविले, तरी अनंत अडचणी येतातच. शेतकरी अशा मोठ्या शहरीं क्वचितच गेलेला असतो. तो असाच एखादा अर्धवट जोडीदार बरोबर घेतो. तिथें त्याला अनेक फसवे लोक भेटतात. हमाल, टांगेवाले, मवाली हे त्यांना हातोहात फसवतात. पुष्कळ वेळा त्याचा खिसाहि कापला जातो आणि त्यास हात हालवीत परत यावे लागते. कित्येक वेळां दुकानदार देखील गोड बोलून त्याची नागवणूक करतात. दुकानांत पुष्कळदां मूळ कंपनीने तयार केलेले सुटे भाग नसतांना देखील त्याच कंपनीनें बनविलेला हा भाग आहे असें सांगून दुसराच निकृष्ट प्रतीचा माल त्यांच्या गळीं बांधतात. आणि हा भाग एंजिनला बसला नाहीं तर आम्ही परत घेऊं असेहि त्यास आश्वासन देतात. शेतकरी विश्वासावरच तो भाग घेऊन जातो. एंजीनला असला भाग बरोबर बसत नाहींच. पुनः दुकानदाराकडे परत करण्यासाठी शेतकरी जातो तेव्हा दुकानदार त्याची योग्य ती दखल न घेता पावतीवरच खालच्या बाजूस छापलेला–एकदा विकलेला माल कोणत्याहि सबबीवर परत घेतला जाणार नाही– हा मजकूर कायदेशीर भाषेंत वाचून दाखवतो. अशा प्रकारे दुकानदार त्याच्या तोंडाला पाने पुसतो. अशा प्रकारे आमच्या पूर्वी अडाणी शेतकऱ्याला अनंत अडचणींस तोंड द्यावे लागते.

आतां प्रत्यक्ष एंजिन खरेदी करण्यास कोणती दक्षता घ्यावी हें आपण पाहूं.

शेतकऱ्याने वापरावयाचें एंजिन हें मुख्यतः कमी फेऱ्यांचें आडवे व कोल्डस्टार्टच असावयास हवें. उभे इंजिन शेतकऱ्यास सोईचे नसते. उभ्या इंजिनांतील भागांची जोडणी बहुधा गुंतागुंतीची असते. तशा-प्रकारची गुंतागुंतीची रचना आडव्या इजिनमध्ये नसते. तसेच आडवे एंजिन मुख्यतः कमी फेऱ्याचें असतें. एंजिन कमी फेऱ्याचे असल्याने दोन प्रकारचा फायदा होतो. कमी फेऱ्यांमुळे भाग विशेष घासले जात नाहीत. दुसरे असे कीं या एंजिनपासून अपघात होण्याचा धोका जवळ जवळ नसतोच आणि झाला तरी फारसें नुकसान होत नाही. एंजिनास वंगणतेलाचा (लुब्रिकेटिंग ऑईल) नियमित व व्यवस्थित पुरवठा होणें फार महत्त्वाचे आहे. त्यामुळे झीज कमी होऊन एंजिन व्यवस्थित चालते व अपघातांची भीति टळते. वंगणतेल योग्य ठिकाणी पुरविले जाण्यासाठी कोणती रचना केली आहे ? पुरवठा होतो किंवा नाही हे समजण्यास मार्ग कोणता ? नियमित पुरवठा होण्यासाठी कोणती सोय केलेली आहे. या गोष्टी पारखणें महत्त्वाचें आहे. त्याचप्रमाणें एंजिनास वापरलेलें पोलाद त्यास लागणारे जळण-तेल, त्याची शक्ति, आकर्षक घडण, त्यास वापरलेली बेअरिंग्ज, एंजिन थंड रहाण्यासाठी केलेली खास सोय (वॉटर सर्क्युलेशन) इत्यादि अनेक बाबींचा विचार करणें इष्ट आहे.

**जयाजी आबाजी वाघ**
**मेहुणबारा**

( पुढील अंकांत :–एंजिनांची किरकोळ दुरुस्ती व तेलपाणी )



**शेती व औद्योगिक विकासाकरितां महाराष्ट्र सरकारनें तगईवर मंजूर केलेलें ५ हॉर्सपावरचें टिकाऊ व उत्कृष्ट**

# ज वा ह र

**● व्हर्टिकल डिझेल एंजिन्स ●**

★ सिंगल सिलींडर ★ १५०० फेरे ★ फोर स्ट्रोक्स्
★ कोल्ड स्टार्ट ★ वॉटर कूल्ड ★ डिझेल अगर कॅमल केरोसिन चालणारें एंजिन ★

**एंजिनचें सुटे भाग स्टँडर्ड साईझचे व सर्वत्र मिळतात.**



★ उत्पादक :– **विजय इंजिनियरिंग ॲण्ड मेकॅनिकल वर्क्स** ★

श्रीरामपूर, जि. अहमदनगर

# दिवाळी अंकांतील व्यक्तिचित्रें

सौ. सरिता पदकी

'व्यक्ति चित्रें' हा वाङ्मय प्रकार यंदाच्या दिवाळी अंकांत विशेष उठून दिसणारा. कांही निवडक व्यक्तिचित्रांचें हें एक सरळ परीक्षण

पावसाळ्याबरोबर जसा पाऊस तसे दिवाळी बरोबर दिवाळी अंक येतात–धो धो! यंदा किती दिवाळी अंक निघाले? कोणी म्हणतात सात विसा, कोणी म्हणतात आठ! खरी संख्या त्यांतल्या त्यांत देवालाच कळलेली असायचा संभव.

ह्या दीडशे–एकशेसाठ अंकांतला एक अंक दुसऱ्या अंकापासून वेगळा काढणें अशक्य नसलें तरी कठीणच–डोळे उघडे ठेवूनहि आलटूनपालटून तेच लेखक, तेच कवि, तेच चित्रकार, तेच रंग. मग रुचिपालटासाठी एखादा लोकांच्या मनाची नाडी ओळखणारा संपादक सिनेमा नटनटयांची सचित्र माहिती छापतो, बिनचेहऱ्याची कादंबरी छापतो, व्यक्तिमात्रांचीं कुलंगडी बाहेर काढतो. अभिरुचिहीन पण उत्तान मुखपृष्ठ काढतो–'घटं भिन्द्यात् पटं छिन्द्यात्'चा वरासचा मामला.

हें लेखकांना जाणवतें. दिवाळीआधीचे दोनचार महिने लेखक म्हणजे एक लिहिण्याचें यंत्रच होऊन बसलेलें असतें! विचक्षण संपादकाला हें जाणवतें—लेखकांना पत्रें, स्मरण पत्रें पाठवीत, चित्रकारांचे उंबरठे झिजवीत, जाहिरातदारांना भुलवीत तोहि त्यांच्या दारांत नंबर लावून बसलेला असतोच्.

मग हें दिवाळी अंकांचें कंगालपण जाणवत, बोचत नाही कुणाला? वाचकाला? कारण त्याच्याच तर पैशाच्या पाठबळावर हें सत्र चालतें, चालायचें असतें. दिवाळीच्या उत्सवी मनोवृत्तींत तो कुठल्याहि दर्जाच्या लेखनाकडे क्षमाशील दृष्टीने पाहतो काय? दोनचार रुपये खर्च करण्याआधी गाजणारीं आणि वाजणारीं नांवें अंकांत आहेत ना एवढेंच पाहून तो अंक विकत घेतो काय?

या प्रश्नाचा सर्वांगीण विचार करायची वेळ येऊन ठेपली आहे. संपादक, लेखक आणि वाचक या तिघांनीहि एकत्र येऊन तोड काढायला हवी आहे.

आजहि एखाददुसऱ्या संपादकाला तरी हें दिवाळीअंकाचें सांचेबंदपण बोचलेलें आहे, त्यांतून बाहेर पडण्याची त्याची कांही धडपड चालू आहे हें आपल्याला स्पष्टपणें जाणवतें. आपल्या दृष्टीने निकष लावून उत्कृष्ट ठरलेलें साहित्यच तो छापतो आणि वाचकांचा कौल आपल्या बाजूने पडण्याची वाट पाहत बसतो.

अशांतला एक अंक 'मौज'चा सगळ्या अंकाचें परीक्षण येथे अस्थानीच ठरेल. पण 'मौज'ने प्रयत्नपूर्वक जीं व्यक्तिचित्रें जमवून छापलीं आहेत त्यामुळे तो अंक खरेंच इतर कित्येक अंकांतून उठून दिसण्याला मदत झाली आहे.

रँ. आप्पासाहेब परांजपे, पं. रविशंकर, बालगंधर्व, अशासारख्या गाजलेल्या व्यक्तींचीं इरावतीबाई कर्वे, पु. ल. देशपांडे, मं. वि. राजाध्यक्ष श्री. ज. जोशी अशांसारख्या मातब्बर लेखकांकडून शब्दचित्रें काढवून मौजेने छापलीं आहेत. व्यक्तिचित्रें हा सध्या कांहीसा उपेक्षित झालेला वाङमयप्रकार या थोरामोठ्यांच्या साह्याने ऊर्जित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

जसा मौजेच्या संपादकांनी तसाच श्री. पु. ल. देशपांडे यांनीहि यंदा व्यक्तिचित्रलेखनावर भर दिलेला दिसतो, मौज, केसरी, साधना, रत्नदीप इत्यादि मासिकांतून त्यांनी व्यक्तिचित्रें लिहिलेलीं आहेत. असा हा एकच वाङमयप्रकार यंदा प्रामुख्याने नजरेसमोर असल्याने त्याच्यावर लिहावयाचें ठरवलें.

एखाद्या व्यक्तीवर कथा लिहिण्यापेक्षा व्यक्तिचित्र लिहिणें सोपें असतें कां? एकाच व्यक्तीला प्रधान ठेवून कथा लिहिली तरी ती व्यक्ति लेखकाला जशी दिसली तशीच त्याला ती रंगवतां येत नाही. कालदृष्टया वास्तव असें एक व्यक्तिमत्त्व निर्माण करण्यासाठी लेखकाला त्या व्यक्तीला कांही कल्पित गुण चिकटवावे लागतात त्या व्यक्तीच्या बाबतींतली लक्षांत रहाण्यासारखी वाटलेली गोष्ट परिणामकारकपणाने वाचकांना सांगायला त्याला कांही घटनाहि नवीन घालायला लागतात. वास्तवांतलें त्याला हवें तेवढेंच तो घेतो आणि तें वास्तव कल्पिताच्या साह्याने परिणामकारकपणाने उभें करतो असें करतांना मग त्या व्यक्तीच्या स्वभावांतील त्याला अवगत असलेल्या साऱ्याच अंगांची तो मांडणी करील असेंहि नाही.

व्यक्तिचित्रच रेखावयाचें झालें म्हणजे मात्र त्या व्यक्तीच्या त्याला समजलेल्या साऱ्याच अंगांचें दर्शन तो वाचकाला घडवील. समजूं शकणाऱ्या आणि न समजूं शकणाऱ्या पैलूंचेंहि तो वर्णन करील. आपल्या मनोविज्ञानाच्या मदतीने तो त्या पैलूंची संगति लावून दाखवील. कांही वेळां तो तें काम वाचकांवरच सोपवील आणि कदाचित् मनोविज्ञानाच्या शास्त्रांत कांही महत्त्वाची भर पडेल!

कथेतील पात्रांच्या स्वभावचित्रणासंबंधी कांही ठोकताळे बसून गेलेले आहेत, कांही संकेत पडलेले आहेत ( अगदी नवकथा, नवकथा म्हणून बऱ्या आणि वाईट अर्थाने गाजली तिच्याहि नशीबीचें हें आवर्त चुकलेलें नाहीं. ) लेखकांच्या आणि वाचकांच्या निरीक्षणावर हे संकेत आधारलेले असतात. एखादा सनातनी, कर्मठ माणूस सर्व नवीन गोष्टींकडे तिरस्काराने पहातो हें जितकें सांकेतिक तितकेंच अशा माणसाला साऱ्याच नव्या गोष्टींबद्दल चोरटें आणि तीव्र आकर्षण वाटतें असें रंगवणेंहि आता सांकेतिक झालें आहे मात्र ह्या दोन्ही प्रकारच्या चित्रणांना आपण 'स्वाभाविक' 'वास्तव' असें समजतों.

पण रँ. परांजप्यांसारखी एकादी भारदस्त आसामी टांग्यांतून सपत्नीक फिरायला जातांना दिव्याच्याभोंवतीं जमलेल्या पांखरांना खायला जमलेल्या पाली मोजत जात असे आणि त्या पालींवर त्या दोघांनी एक खेळहि बसविला होता असें जर एखाद्या कथालेखकाने लिहिलें तर तें अ'वास्तव' मानलें जाईल. वास्तवाच्या कल्पनारम्यतेची ही गंमत म्हणायची ! असें अ'वास्तव' एखाद्या कथालेखकाने लिहिलें तर त्याच्यावर अवास्तवतेचा–कदाचित् विकृतकल्पनाशक्तीचा–आरोप केला जाईल. आणि त्याने जर 'अहो' पण हें असें प्रत्यक्ष झालेलें मीं स्वतः पाहिलेलें आहे, असा डिफेन्स दिला तर तो पोरकट, अग्राह्य, समजला जाईल !

असें हें व्यक्ति चित्राच्या लेखकाला मिळालेलें एका दृष्टीने अबाधित असें स्वातंत्र्य.

पण विशेषतः चारचौघांत प्रसिद्ध असलेल्या व्यक्तीबद्दल जर कां तो लिहिणार असेल तर मग प्रत्यक्ष घटनांच्या बाबतींत तरी त्याला कल्पनाशक्तीची मुळीच मदत घेतां येत नाही. सत्य काय ते त्या व्यक्तीच्या सांनिध्यांत आलेल्या बऱ्याच जणांना माहीत असतें. फक्त त्या व्यक्तिमत्त्वाचीं नानाविध अंगें, त्यांची लेखकाला जाणवलेली संगति–विसंगति याबद्दल लिहिणं आणि तें व्यक्तिमत्त्व आपल्याला जसें जाणवलें तसेंच वाचकालाहि–हाडामांसाचें, ज्ञानाअज्ञानाचें, समजागैरसमजांचें–असें जाणवण्याइतक्या समर्थ शैलीने लिहिणें एवढेंच त्याच्या हातांत असतें. अर्थात् हेंहि सोपें नव्हे, नव्हेच !

## रँ. परांजपे– : इरावती कर्वे

वर ज्यांचा उल्लेख केला ते रँग्लर परांजपे यांचें व्यक्तिचित्र इरावतीबाई कर्वे यांनीं लिहिलेलें. लेखिका आणि तिचा वर्ण्यविषय निदान महाराष्ट्रांतल्या लोकांना अपरिचित नाहीत. रँग्लरसाहेबांचें बालपण, शिक्षण, सामाजिक कार्य इत्यादि तपशील असलेलें चरित्र त्यासंबंधीच्या अभ्यासाने कुणालाहि लिहितां येण्यासारखें आहे. पण जे ' आप्पा ' इरावतीबाईंना जाणवले आहेत ते दुसऱ्या कुणालाच जाणवणें शक्य नाहीत. नुसतें एखाद्या व्यक्तीचें चरित्र माहीत असणें वेगळें आणि त्या व्यक्तीचा नि आपला जिव्हाळ्याचा, ( या ठिकाणीं एका करड्या वात्सल्याचा.) संबंध येऊन तिचे कांही जिवंत रंग आपण टिपणें वेगळें. म्हणूनच रँग्लरसाहेबांविषयींच्या कुठल्याहि चरित्रांत्मक ग्रंथांत दिसूं शकणार नाहीत इतके खरे, चालतेबोलते, दुःखी नि सुखी रँग्लरसाहेब–आप्पा–आपल्याला या व्यक्तिचित्रांत सापडतील. सार्वजनिक जीवनांतले परांजपे या व्यक्तिचित्रांत नाहीत. लेखिकेनेंच आपल्याला सांगितले आहे की रँग्लरसाहेबांचें सार्वजनिक जीवन त्यांच्या घराच्या उंबरठ्याच्या आंत कधीं येत नसे. आणि आप्पांचें व्यक्तिचित्र–इरावतीबाईंना जसें जाणवलें तसें–त्यांना लिहायचें असल्यामुळे ती माहिती त्यांनीं त्याच्यांत कोंबली नाहीं हें योग्यच झालें.

मोठा आवाज, आकडेबाज मिशा, गडगडाट हंसणें, उंच व भव्य देह-अशा भारदस्त व्यक्तिमत्त्वाच्या आप्पांशीं इरावतीबाईंचें नातें त्यांना दुसरे पिताजी मानण्याइतकें जवळचें, जिव्हाळ्याचें आहे. खूप वर्षांचा निकटचा सहवास त्यांना मिळालेला आहे. आप्पांच्या स्वभावांतल्या बऱ्याच बारीकसारीक, मनोरंजक गोष्टी त्या आपल्याला सांगूं शकलेल्या आहेत. त्यांचें तें जेन ऑस्टेनच्या कादंबऱ्यांवरचें प्रेम, घरांतील साऱ्या माणसांवर व स्वतःवरहि तिच्या कादंबरींतील पात्रांचा आरोप करण्याइतकें पराकोटीचें प्रेम, शब्दकोशाचा वापर करण्यावरचा कटाक्ष, " आप्पांचें शब्दज्ञान मोठें अचूक, " एका दिवसाच्या मुलालाहि उचलून घेण्याइतकें मुलांबद्दलचें प्रेम, व्यक्तिपूजेचा दोष त्यांनी कटाक्षानें टाळलेला आहे,इतर माणसांशी वागतांना सहजगत्याच बरोबरीने वागण्याचा त्यांचा स्वभाव, समता किंवा न्यायबुद्धि आणि पराकोटीचें वात्सल्य या दोन परस्परविरोधी गुणांचा त्यांच्या स्वभावांत झालेला मिलाफ-खूप बारकावे दिले आहेत इरावतीबाईंनी आप्पांच्या व्यक्तिमत्त्वाने भारावून किंवा दबून न जातां मोठ्या जिव्हाळ्यानें त्यांचें चित्र त्यांनी काढलें आहे. या सरळ ध्येयवादी माणसाचें चित्र काढतांना त्यांनी त्यांच्या परिसरांतल्या इतर व्यक्तींचेंहि थोडक्यांत पण रसरशीत चित्रण केलें आहे. त्यांचे लेकीशीं, नातीशीं, स्वतः लेखिकेशीं असलेले एका विशिष्ट करड्या वात्सल्याचे संबंधी मोठ्या रंगतीनें सांगितले आहेत.

या परिवारांतहि लक्षांत राहण्याजोगें चित्रण त्यांच्या पत्नीचें सुरेख, प्रेमळ पण अविकसित व्यक्तिमत्त्व असलेल्या या पत्नीशीं आप्पा " प्रेयो मित्रं " या नात्यापर्यंत कधी येऊन पोचलेच नाहीत. पत्नीच्या विकासासाठी त्यांनी जाणूनबुजून प्रयत्न केला नाही. घराबाहेरचें आपलें जीवन त्यांनी तिच्याबाहेरच ठेवलें. वयाने, ज्ञानाने, अनुभवाने कमी असलेल्या माणसाशी जसे वागावें तसे ते पत्नीशी वागले. पुत्रवियोगाने कांहीशा तोल सुटलेल्या या स्त्रीनें नि तिच्या वैवाहिक आयुष्याचें चित्रण स्मरणीय झालें आहे.

"एका दृष्टीने त्यांचा स्वभाव, वागणूक, जीवनाचा प्रवाह सर्व कांही विशिष्ट कालखंडाचें द्योतक वाटतात, पण दुसऱ्या बाजूनें पाहिलें तर त्यांची असाधारण बुद्धि, अपार वात्सल्य व बालसुलभ ऋजुता हा मिलाफ अनन्यसाधारण आहे. त्यामुळे कोठल्याहि रेखीव चौकटींत त्यांचें आयुष्य बसवतांच येत नाही ! " कांहीशा निराश सुरांत लेखिकेने आप्पांबद्दल असें म्हटलें आहे. पण चौकटींत तिनें आप्पांना नाही बसवलें हेंच ठीक झालें. नाहीतर आप्पा जसे त्यांना दिसले तसे बाईंना रंगवतां आले नसते—आणि एका रसरशीत व्यक्तिचित्राला आपण मुकलों असतों !

एखाद्या अबोल, स्वतःचें मत कडेकोट बंदोबस्तांत ठेवणाऱ्या व्यक्तीच्या अंतरंगाच्या विशिष्ट भागांत जितकें जास्त खोलवर जातां येईल तितकी लेखिका गेली आहे. पण त्या व्यक्तींत आणि लेखिकेंत

राहत असलेलें एक अपरिहार्य अंतर आपल्याला सारखें जाणवत रहातें. "आजोबां"शी समरस होऊन लेखिकेनें एक अप्रतिम व्यक्ति-चित्र आपल्याला दिलें होतें. इथे 'आप्पां'च्या स्वभावामुळे समरसता उणी पडली ?

इरावतीबाईंची भाषा समर्थ, आहे. मानवी अंतरंग जाणण्याची शक्ति त्यांच्यावळ आहे. 'आपां'च्या बंद मनोविश्वांतसुद्धा कांही तुटक वाक्यांच्या झरोक्यांतून त्यांनी दिसेल तितकें पहायचा प्रयत्न केला आहे. शब्दांचा प्रपंच न मांडतां त्यांना जें सांगायचें आहे तें त्या स्पष्टपणें, अचूकपणें सांगून जातात—त्यामुळे त्यांचें सारें लिखाण आपण मन लावून वाचत जातों, त्याच्यांत गुंगत जातो. आणि स्वतः त्याहि गुंगून गेल्यामुळेच की, काय या व्यक्तिचित्राच्या शेवटी झालें आहे. तसे बरेचसे अनावश्यक तपशील येऊनहि त्यांच्याकडे त्यांचें लक्ष गेलें नाहीं.

हें सारें व्यक्तिचित्र वाचून झाल्यावर एक शंका मात्र रहाते—आप्पां'चें जीवन जास्त सोपें तर केलें गेलें नाही ना? जी 'सरळ आणि अरुंद वाट' ते चालले तिच्यावर पाऊल टाकतांना नि टिकवतांना त्यांना कांही प्रयास पडलेच नसतील? का 'आप्पां'च्या विशिष्ट स्वभावामुळे ते लेखिकेलाच काय कुणालाहि दिसलेच नसतील, समजलेच नसतील ?

## बाबूराव चित्रे— मं. वि. राजाध्यक्ष

कांही विशिष्ट दर्जा हें ध्येय ठेवून मराठींत काढलेल्या मासिकांचें व्यावहारिक अंकगणित नेहमीच चुकत आलेलें आहे. वाचकांच्या संख्येंत भर पडावी म्हणून त्यांना पसंत पडेल असे सामान्य लेखक व लेखन मिळवून हिशेबाचे ठोकताळे जमवणें किंवा वाचकांशिवायच मासिक चालवायचा अलौकिक व्यवहार शक्ति असेपर्यंत करीत रहाणें, ती शक्ति संपल्यावर त्या आटापिटचाचें "सोनें करणें" असे दोन पर्याय संपादकाला उरतात. पैकी पहिला सोयिस्कर पण विचक्षण मनाला न पटणारा, दुसरा उदात्त पण जीवघेणारा. हा दुसरा पर्याय ज्याने स्वीकारला, 'अभिरुचि' सारखें दर्जेदार मासिक—ज्याच्याबद्दल लेखक आणि वाचक 'ते हि नो दिवसाः' अशा सुरांत बोलतात—ज्याने नऊ वर्षें चालवून दाखवलें अशा एका जिद्दीच्या संपादकाचें हें व्यक्तिचित्र आहे. बाबूराव ऊर्फ पु. आ. चित्र्यांचें लेखक आहेत, प्रा. मं. वि. राजाध्यक्ष,

" काय दिवस गेले ते ! कसला तरी कैफ चढला होता ! " स्वत लेखकाने अभिरुचीच्या कर्तृत्वांत हिरीरीने भाग घेतला असल्याने अभिरुची आणि तिची संपादक पतिपत्नी या दोहोंबद्दल त्याला विलक्षण आत्मीयता आहे.

चित्र्यांचें प्रमुख कर्तृत्व म्हणजे अभिरुचीचें संपादन. त्याबद्दलच अर्थात् लेखकाने बरेंचसें लिहिलेलें आहे. एका मासिकाची हीं पतिपत्नी संपादक असूनहि वर्गणीदारांच्या याद्या, अंकांच्या जावकीच्या नोंदी, मासिकाचें किमान योग्य वेळीं प्रकाशन इ. कारभारी उपचार दोघांच्याहि प्रकृतीला कसे मानवले नाहीत. पण ही गैरसोय खपवून घेऊनहि अभिरुचीवर प्रेम करणारा वाचकवर्ग त्यांनी कसा निर्माण केला आणि टिकवला हें लेखकाने मोठ्या जिव्हाळ्याने सांगितलें आहे.

बाबूराव चित्र्यांचा अव्यवहारीपणा, त्या " वेडबंबू " कारभाराच्या गोंधळांतूनहि उत्तम अंक काढण्याचें कर्तृत्व, त्यांचें मित्रप्रेम, एक संयम पण जबर आत्मविश्वास, सारें वैभव खालसा होत असलेलें डोळे मिटून पहाण्याची व जणू कांही झालेंच नाहीं असें वागण्याची शक्ति, प्रतिकूल परिस्थितींतहि टिकून राहिलेलें अगत्य नि आतिथ्यशीलता चित्र्यांच्या स्वभावांचीं हीं सारींच वैशिष्टचें राजाध्यक्षांनी चित्र्यांच्या स्नेहचांनीं—एका जिव्हाळ्याने टिपलीं आहेत. वरवर अवखळ भासणाऱ्या पण अंतरंगीं स्नेहाने, व्यथेने भिजलेल्या शलीनें वर्णन केलीं आहेत. बाबूरावांचें एकटचाचें आणि मित्रांच्या, पत्नीच्या, मुलांच्या प्रकाशकिरणांत झळकणारे असें निकोप नि प्रसन्न जीवन लेखकाने आपल्याला दाखवलें आहे. आणि हें सारें भावविवश न होतां, स्तुतिपाठकाची भाबडी भूमिका न घेतां केलें आहे. तपशील दिले आहेत. पण जरूर तेवढेंच.

एका कर्तबगार पण अपेशी ठरलेल्या, समृद्ध नि वलोभनीय व्यक्तिमत्वाच्या स्नेहचाचें तितक्याच जाणकार स्नेहचाने काढलेले हें एक जिवंत व्यक्तिचित्र.

आज साहित्याच्या क्षेत्रांत चित्रे दम्पती कांही जाणकारांच्या गप्पांत स्नेहादराने घोळल्या जाणाऱ्या नांवांपुरतीच उरली आहे. अशा वेळीं त्या दम्पतीच्या धडाडीचें, कर्तृत्वाचें नि अपयशाचेंहि महिमा न गाणारें व्यक्तिचित्र त्यांच्यांशीं समरस झालेल्या त्यांच्या स्नेह्यानें लिहिलें हें यथोचितच झालें. यंदाच्या दिवाळी अंकांतलें सर्वांत उठून दिसणारें हें व्यक्तिचित्र.

## पं. रविशंकर — गोपाल कृष्ण भोबे

जशा युद्धाच्या तशाच सिद्ध पुरुषाच्या साधनेच्या कथा रम्य असतात. नटांच्या, साहित्यिकांच्या, नर्तकांच्या, गवयांच्या—साऱ्याच साधकांच्या धडपडीचें, त्यांच्या मार्गांत आलेल्या पण त्यांनीं टाळलेल्या मोहांचें वर्णन मोठेंच रोमहर्षक असतें. सांगणाऱ्याचे नि ऐकणाऱ्यांचेहि पाय रटाळ आयुष्यावरून उचलणारे असतें.

संगीतभक्तांच्या विश्वांत पं. रविशंकरांचें नांव मोठ्या आदरानें घेतलें जातें. " सरस्वतीनें अमृतदृष्टीने जसें बुद्धीकडे तसेंच कार्यकडेहि पाहिलें होतें. अशा या गोड कलावंताच्या प्रथमदर्शनानेच लेख-

संगमनेरची सुप्रसिद्ध
गुलाबपाणी विडी
★ सदैव वापरा ★
मेसर्स :— एम. एम गुलाबपाणी
संगमनेर, जि. अहमदनगर

काच्या मनांत माया उत्पन्न झाली. त्याचें वादन प्रत्यक्ष ऐकल्यावर तर या थोर कलावंताबद्दल त्याला आदर वाटूं लागला. आणि या निर्दंभ कलावंताशी नि त्याच्या कुटुम्बीयांशी लेखकाची दाट मैत्री जुळून आली. या मैत्रीचा परिपाक म्हणजे हें व्यक्तिचित्र.

पण लेखकाच्या मनांत जी या कलावंताबद्दल अपरिमित भक्ति आहे तिच्यामुळे झालें काय की रविशंकरांच्या जीवनांतल्या सर्वच गोष्टी त्याला महत्त्वाच्या वाटल्या. कुठल्याहि सामान्य भारतीय मुलांपेक्षा रविशंकरांचें बालपण फार वेगळ्या विश्वांत गेलें. उदयशंकरांच्या संचांत नृत्य, गायन आणि वादन यांत निमग्न झालेलें, पॅरिससारख्या झगमगाटी शहरांत गेलेलें बाल्य नि कुमारवय या मुलाला लाभलें. पण पुढे खडतर तपश्चर्या करून त्याने आपल्या गुरूंची मर्जी संपादित केली, तो त्यांचा प्रिय शिष्य नि जांवई बनला, आपल्या कलेने त्याने स्वदेशांतल्याच नव्हे तर परदेशांतल्याहि रसिकांना जिंकलें. कलेच्या क्षेत्रांतले सारे मानसन्मान त्यांच्या पायाशी चालून आले.

या साऱ्या घटना रोमहर्षक आहेत. अद्‌भूत वाटाव्या इतक्या असामान्य आहेत. वाचायला मोठ्याच आकर्षक वाटतात. लेखकाने त्या सांगितल्याहि आहेत रंगून, संगीताच्या परिभाषेची एक विशिष्ट डूब घेतलेल्या शैलीत. पण या साऱ्या घटनांच्या पसाऱ्यांत, रविशंकरांचे वडील, बंधु इत्यादिकांच्या आणि खुद्द रविशंकरांच्याहि पूर्वायुष्यांत लेखक इतका बुडाला आहे की रविशंकरांवरचें लक्ष उडून जातें नि या घटनांच्या रोमहर्षकतेंतच अडकून बसतें. बरेंचसें वाचल्यावर त्या साऱ्या मजकुराशी रविशंकरांचा फारच थोडा संबंध असल्याचें लक्षांत येतें आणि असें वाटतें की या साऱ्यापेक्षा रविशंकरांच्या कलाजीवनाशी निकट संबंध असलेलें कांही लेखकाने सांगितलें असतें तर किती बरें झालें असतें. तपशीलाच्या घोळांत आणि विशेषतः अशा रोमहर्षक तपशीलाच्या घोळांत लेखकाने अडकून पडणें स्वाभाविक तरी खरेंच. पण व्यक्तिदर्शनाची ही पद्धत अगदीच बोजड समजली पाहिजे.

"सुरासुरांत मजा, बेहोषी ! कुठे जडता नाही, कुठे घोटीवपणा नाही. आहे ती पक्की जाणीवपूर्वक केलेली तयारी. तपश्चर्येचें सामर्थ्य. आणि म्हणूनच त्यांच्या कलेचें दर्शन विराट् वाटतें !" अशा रसिक, भारावलेल्या शब्दांत लेखकाने रविशंकरांच्या कलेचें मूल्यमापन केलें आहे.

—पण या थोर कलावंताविषयीं वाटलेल्या आत्यंतिक आदरामुळेच, या अत्यासक्तीमुळेच, संगीताबद्दलच्या, कलावंताबद्दलच्या, कलावंताच्या आयुष्यांतील सर्वच घटनांबद्दलच्या या अत्यासक्तीमुळेच लेखकाचें या कलावंताशी व्हावें तितकें तादात्म्य झालें नाही. त्यामुळेच त्याने सांगितलेलें सारें आपण कुतूहलाने वाचतों खरे, पण रविशंकरांच्या जवळ गेल्याचें समाधान मात्र आपल्याला लाभत नाहीं !

## बाबूराव—श्री. ज. जोशी

आत्तापर्यंत ज्यांचा विचार केला त्यांच्यापेक्षा हें व्यक्तिचित्र दोन बाबतींत वेगळें आहे. एक तर ज्या व्यक्तीचें हें चित्र आहे ती कोणीहि प्रसिद्ध व्यक्ति नव्हती. दुसरें म्हणजे लेखकाचें त्या व्यक्तीशीं असलेलें नातें. रक्ताचें नातें दुसऱ्या कुठल्याहि नात्यापेक्षा दृढ असतें म्हणतात. लेखक हा आपल्या वडलांचेंच व्यक्तिचित्र इथे रंगवतो आहे. लेखक आणि त्याचा वर्ण्यविषय यांच्यांत या नात्यापोटीं इतर व्यक्तिचित्रापेक्षा जास्त जिव्हाळा, जास्त आत्मीयता आली असायचा संभव आहे.

बाबूराव हे तसे साधे कारकूनच होते. स्वतःच्या वांट्याला आलेलें लंगडेपणानें डागळलेलें आयुष्य जगण्यापलीकडे त्यांनी विशेष कांही केलें नाही. पण अशा या सामान्य माणसाचें आयुष्यसुद्धा रंगीत होतें. एका नष्टप्राय संस्कृतीचा प्रतिनिधि असलेल्या या माणसाच्या आयुष्यांत लेखक व्हायचें एक अस्पष्टच पण अपुरें स्वप्न होतें. संततिनियमनाचें ज्ञान नसल्याचें दुःख होतें, कादंबरींतल्या का होईना पण प्रणयप्रसंगांचें आकर्षण होतें, दासबोध होता, बडया लाटसाहेबांची वाट या 'लेमपर्सन्स'च्या बैलगाडीनें अडवायची वेळ आली त्या घटनेंतला विनोद कळण्याची आणि ती खुलवून सांगण्याची हातोटी होती, नाटकाचें वेड होतें, मृत्यूची भीति होती-आणि आपल्या सामान्य आयुष्याचा त्यांतल्या लंगडेपणाला उजाळून टाकणारी एक दांडगट, राकट विनोदबुद्धि होती.

लेखकाने हें सारेंच जवळून पाहिलें आहे. वडलांच्या स्वभावांतल्या अनेक छटा त्यांनी उदाहरणें देऊन रंगवाल्या आहेत. त्याबरोबरच वडलांच्या राजवटींतले जुनें पुणेंहि उभें केलें आहे. ज्या पुण्यांत मंडई, करणें, लग्नें जुळवणें आणि स्मशानयात्रेस जाणें याखेरीज दुसऱ्या 'थ्रिलिंग' गोष्टी नव्हत्या ! त्या जीवनाला खाजगीपणाचें, दारें लावून बसण्याचें वावडें होतें. त्याला नव्या टापटिपीच्या संसारांचें कौतुक वाटत होतें. पण त्यांत करमत मात्र नव्हतें.

—हें सारें श्री. ज. नी. सांगितलें खरें. पण एक प्रकारचा दुरावा कोरडेपणा राखून. आपल्या अधू वडलांनीं आपल्या लंगडेपणाचें दुःख कशाच्या बळावर पचवलें ? देवाधर्मावर श्रद्धा नसलेल्या, फारसें शिक्षण न झालेल्या, फारसें श्रीमंत जीवन न लाभलेल्या या गृहस्थानें जीवनावरची रसरशीत श्रद्धा कशी मिळवली आणि टिकवली ?—लंगडेपणामुळे कांही विकलता त्यांच्या स्वभावांत आली होती का ? क्वचित् प्रसंगीं रासवट विनोद करण्याची त्यांची पद्धत ही त्या व्यंगावर मात करायच्या बुद्धींतून उपजली होती का ? शेवटीशेवटी बाबूरावांनी धर्मग्रंथांच्या वाचनाला सुरवात केली होती. असें श्री. ज. सांगतात. या धर्मांतून त्यांच्या वडलांना "आमचा प्लॉट


कोपरगांवांत राहण्याची व जेवणाची
उत्तम सोय असणारें....

★ लकी गेस्ट हाऊस ★

कोपरगांव, जि. अहमदनगर

प्रोप्रा.—डी. पी. कोन्हाळकर

ओंकारेश्वरीं रिझर्व्ह केला आहे" असें विनोदानें सांगण्याइतकें सामर्थ्य आलें होतें का? —

हा शोध घ्य यचा श्री. जं. नीं. कांहीच प्रयत्न केला नाही. बाबूरावांच्या व्यक्तिमहत्वाच्या कडेकडेनेच ते फिरत राहिले—गाभ्यापर्यंत पोचलेच नाहीत, पोचायचा प्रयत्नच त्यांनी केला नाही. कां? हा प्रयत्न त्यांनी कसल्या भीतीनें टाळला? तो न टाळतां बाबूरावांच्या मनाचें धीटपणाने त्यांनी समग्र दर्शन घेतलें असतें तर?

## चितळे मास्तर :— पु. ल. देशपांडे

जशी यंदा 'मौज'ने विशेष लक्ष देऊन व्यक्तिचित्रें मिळवलीं आणि छापलीं तशीं श्री. पु. ल. देशपांडे यांनी या दिवाळींत प्रामुख्याने व्यक्तिचित्रेंच लिहिलीं आहेत. एका खुमासदार शैलींत व्यक्तींच्या सर्व वैशिष्ट्यांचें दर्शन घडवणारी श्री. देशपांडयांची पद्धत आपल्या चांगल्या परिचयाची आहे. 'संगीतचिवडामणी' पासून 'हरितात्या' नि 'अंतू बरवा' पर्यंत अनेक व्यक्तींशी पु. ल. नी आपला परिचय करून दिलेला आहे आणि त्या व्यक्ति आपापल्या सर्व वैशिष्ट्यांनिशी आपल्या चांगल्याच स्मरणांत राहिलेल्या आहेत.

पु. ल. च्या विनोदी शैलीआडून जी एक मानवाबद्दलची सहसंवेदना दिसून येते, जीवनांतल्या अटळ कारुण्याचें जें दर्शन होतें, चांगल्या जीवनांतल्या मूलभूत निष्ठांबद्दल जी दृढ श्रद्धा आढळून येते त्यामुळे त्यांचें लिखाण आपल्याला आवडतें. त्या लिखाणाला किंमत येते. नुसतेच हलकेंफुलकें विनोदी लिहिणें हा त्यांचा स्वभाव नाही.

'नवयुग' मधलें हें चितळे मास्तरांचें व्यक्तिचित्र घ्या. आपल्या तावडींत सापडलेल्या पोरांना घासूनपुसून जगांत पाठवायाचें काम मन लावून करणाऱ्या, पोरांना जीव लावून शिकवणाऱ्या या शिक्षकाचें चित्र मोठ्या रंगतीने पु. ल. नी काढलें आहे. स्वतःच्या वेषाबद्दल अत्यंत गलथान असणाऱ्या या शिक्षकाचें पोरांना शिकवणें हेंच इतिकर्तव्य. भान हरपून शिकवावें—मग तें पोराला शिकवायचें असो, बालवीरकी शिकवायचें असो की "आय् गो वुई गो". असो. एवढेंच हा शिक्षक जाणत आला. याच्या घरांत फक्त बायकोच्या डोळ्यांत मोत्यें पडलीं, गळ्यांत पडूं शकलीं नाहीत! कारण शिकवण्या करून पैसे जमवणें हा विचार कधी त्यांच्या डोक्यांतच आला नाही मॅट्रिकच्या पोरांना पहाटे पांच वाजतां खास शिकवायचें—पण पैशासाठी नव्हे!

असे हे चितळे मास्तर शाळेची गिरण झाली, दोन दोन शिफ्ट्स झाल्या, पोरांच्या खिशांतून पेन नसलें तरी कंगवे हमखास राहूं लागले म्हणून हळहळतात, पण शालेय नाट्यमहोत्सवांत स्वतः नाटक बसवतात—सगळ्या मुलांकडून सगळें नाटक पाठ करून घेतात!— आणि ओपन एअर थिएटरसाठी भिक्षांदेहि करतात! कुठला मुलगा किती सालच्या बॅचमध्ये होता, आता कुठे असतो, कुठल्या विषयांत कुणाला किती साली डिस्टिंक्शन् मिळालें होतें—सारें यांना तोंडपाठ. कारण शाळा आणि पोरें हेंच एक निष्ठेचें कार्यक्षेत्र. त्यांच्या झिजलेल्या टांचांच्या चपला पाहून उगीच नाही पु. ल. गहिवरले!

अर्थात् पु. ल. ची शैली वजा केली तर हेंहि सारें कितीतरी कंटाळवाणें होऊं शकेल. म्हणून मुलांतूनच तें वाचणें अधिक फायद्याचें!

'चितळे मास्तर' त्या खालोखाल मात्र आवडलें तें 'बाय'चें— स्वतःच्या आजीचें—पु. ल. नी काढलेलें व्यक्तिचित्र. घरांतल्या मुलामाणसांवर उदंड प्रेम करणारी, दरिद्री संसारांतहि सहजगत्याच हसतमुख असणारी, नाना युक्त्याप्रयुक्त्यांनी नातवंडांना जेवायला लावणारी, असामान्य विनोदबुद्धि असणारी, घर गातें गाजतें ठेवणारी ही 'बाय' पु. ल. च्या बरोबर वाचकांनाहि लहान होण्याचें भाग्य देतें. "शांताबाईनं किती कापूस पिंजलाय्" (म्हणजे शांताबाई किती लठ्ठ झाली आहे) "पंचा"ला चहा दे, आणि "बँक आली कां" असें बोलते, किंवा माशांना निरनिराळीं सोवळीं नांवें देतें तेव्हा लक्ष्मीबाई टिळकांच्या असल्याच निर्मळ विनोदबुद्धीची आठवण होते. आजाराच्या आणि प्रत्यक्ष मृत्यूच्या सानिध्यांतहि मग या विनोदबुद्धीचा लोप होत नाही. आजारी आजोबा-आजींना मग ती शोभेच्या कुंड्या म्हणते, "वरनं आपल्या नांवाचं पत्र" यायची वाट पहाते, आणि एके दिवशी निघून जाते—तिच्या सहवासांत आलेल्या मुलांच्या मनांत एक कधीच मोठें न होणारें बालपण ठेवून!

आणखीहि कांही व्यक्तिचित्रें पु. ल. देशपांडे यांनी यंदा लिहिलीं आहेत. 'मौज'मध्येच त्यांचें बालगंधर्वांचें व्यक्तिचित्र आहे. पण त्याला व्यक्तिचित्र म्हणण्यापेक्षा बालगंधर्वांच्या गाण्याच्या आणि अभिनयाच्या कांही आठवणी असें म्हणणे जास्त संयुक्तिक होईल. बालगंधर्वांच्या


र. नं. ८१७१] विना सहकार नहि उद्धार [र. ता. ११-३-१९४०

जीवनोपयोगी वस्तू, मिश्रखतें, पत्रा, लोखंड, सिमेंट, व साखर यांची खरेदी-विक्री करणारी

'ब' वर्गांतील. . . .

**कोरेगांव विविध कार्यकारी**

**सहकारी सोसायटी लि.**

जि. उत्तर सातारा

सभासद संख्या २७१ · शेअर भांडवल ३१७७

रिझर्व फंड १३,२०८ · खेळतें भांडवल ४३,३४२

एकूण उलाढाल २,६२,९१५.

| चेअरमन | सेक्रेटरी |
|---|---|
| दत्ताजीराव भाऊराव बर्गे | डी. एस. चव्हाण |

व्यक्तिमत्वांतली सारीं अंगें दाखवावीं असा या लेखाचा उद्देशच नाही. संगीत आणि अभिनय या दोन क्षेत्रांतल्या त्यांच्या असामान्य कर्तृत्वाचें धावतें दर्शन असें या लेखाचें स्वरूप आहे. "शरद् पौर्णिमेचें चांदणें जसें चिकित्सेच्या पलिकडचें तसेंच हें बालगंधर्वांचें गाणें" अशी लेखकाची 'शरणचिठ्ठी' दिलेली भूमिका. बालगंधर्वांच्या व्यक्तिमत्वाचा ठसा आपल्या मनावर उमटण्यापेक्षा पु. ल. देशपांडे यांना त्यांच्या गाण्याबद्दल आणि अभिनयाबद्दल जो असीम आदर, भक्तिभाव वाटतो त्याचेंच दर्शन आपल्याला हा लेख वाचून होतें. अर्थात् हा भक्तिभाव लेखकाला मान्य आहे—किंबहुना तो दाखविण्यासाठी तर त्यानें हा लेख लिहिलेला आहे.

"नाथा कामत" आणि "बापू काणे" हीं त्या त्या व्यक्तीच्या एकेका वैशिष्ट्यावर जादा भर देऊन लिहिलेलीं विनोदी व्यक्तिचित्रें. एकाला बायकांचें वेड, दुसऱ्याला सेक्रेटरी होण्याचें. पराकोटीला पोचलेल्या दोन्ही वेडांवरच प्रामुख्यानें पु. ल. नी लिहिलेलें आहे. तेवढ्यापुरतें त्या दोघांचें वेड आपल्याला पुरतें कळतें, हसवतें. जशी ही वेडी तऱ्हेवाईक तशीच पु. ल. ची तीं रंगवणारी शैलीहि मिस्किल, थट्टेखोर. पण मुख्य हेतु विनोद निर्मितीचा—व्यक्तिदर्शनाचा नव्हेच कीं एक तर ( बापू काणे ) विनोदविशेषांकांतच आहे. दुसऱ्याच्याहि, हेतूबद्दल शंका उरूं नये एवढा भरपूर पुरावा आहे.

विनोदनिर्मितीचा हेतु नसलेलें व्यक्तिचित्र "नंदा प्रधानचें" प—साधना दिवाळी अंकांतलें. अत्यंत अस्थिर बाल्य, त्याहूनहि अस्थिर आणि लागेबांधे नसलेलें तारुण्य वांट्याला आलेला हा एक सामान्य-कारकुनाचा दोस्त. तुटलेल्या पतंगाप्रमाणे भरकटणारा—तरी जीवनतल्या कांही स्मृतींना जपणारा. पाश्चात्य धर्तीच्या बिनबुडाच्या संस्कृतींत वाढलेला नंदा प्रधान, लंडनमध्ये बॉंबहल्ले पाहिलेला, एका ज्यू तरुणीशी विवाहबद्ध झालेला पण तिच्यापासून जर्मनांनीं तोडलेला दोडक्यांत म्हणजे नाना प्रकारचे अनुभव घेऊनहि कुठेच न रुजलेला—आणि आपलें कनिष्ठमध्यमवर्गीय कारकुनी जीवन निष्ठेनें जगणारा—ही भूमिका लेखकानें स्वतःकडे घेतली आहे—त्याचा वर्गमित्र नंदा प्रधानाच्या व्यक्तिचित्राला भूमीच ही अशी नाटकी मिळाली आहे—ोन विरोधी स्वभावाच्या पात्रांना शेजारी ठेवून त्यांना उठाव देणारी. त्यामुळेच की काय नंदा प्रधानच्या बाबतींत लेखकानें सांगितलेल्या सर्व घटना संभाव्यतेच्या कोटींतल्या आहेत हें पटूनहि तो जिवंत, रसरशीत वाटत नाही. 'चितळे मास्तरां' सारखा किंवा 'नाथ' सारखा आपला वाटत नाही! सुंदर पण करुण सांवलीसारखाच तो उरतो!

## हुलकावणी—पंडित शेटे

पंडित शेटे यांनी "हुलकावणींत"त आपल्या वडलांचें व्यक्तिचित्र दिलें आहे आणि शेवटी सिनेमा पहायच्या कार्यक्रमांत अडथळा येऊं नये म्हणून त्यांनी वडिलांना कसें हुकवलें आणि तें हुकवणें कसें भयानक ठरलें—त्यानंतर लगेचच वडिलांना आलेल्या मृत्यूमुळे—तें सांगितलें आहे. कथेच्या सीमेच्या आंत पाऊल टाकूं पहाणारें हें व्यक्तिचित्र वडिलांच्या अंतरंगाचा वेध न घेतां आल्यामुळे असेंच बोजड बाह्यात्कारी राहिलें आहे—आणि कथा म्हणून पाल्हाळिक झालें आहे!

अशीं हीं दिवाळी अंकांतील व्यक्तिचित्रें. एक गोष्ट प्रामुख्यानें मनांत येते ती ही की, नव्या पिढीतल्या एकाहि लेखकानें हा वाङ्मय-प्रकार हाताळायचा प्रयत्न केलेला नाही. एखाद्या विशिष्ट क्षणीं असलेल्या विशिष्ट पात्रांच्या भावस्थितीचें दर्शन, एखाद्या विशिष्ट प्रसंगीं दिसून गेलेलें एखाद्या पात्राचें कांही विलक्षण स्वरूप—नव्या कथेचें स्वरूप बहुतांशी असें झालेलें आहे. या स्वरूपाच्या लेखनांत फारच लौकर हात बसला नव्या लेखकांचा. नवकथा नवी तवी म्हणतां आवर्तांत सापडली. व्यक्तिचित्रें हा वाङ्मयप्रकार लेखकाला वास्तवाच्या भूमीपाशी पोचवणारा आहे. त्याच्यांतून जीवनरस शोषून घेऊन नव्या कथेलाहि समृद्ध करावयाचे प्रयत्न या लेखकांनी कां करूं नयेत? वास्तवाची नव्याच तऱ्हेने ओळख करून घेण्याचा हा प्रयोग, मला वाटते, त्यानी करून पाहण्यासारखा आहे!

★ ★ ★


र.नं. २२०२८ } विना सहकार नहि उद्धार { र.ता. १७-१२-१९५६

शेतकी अवजारें, रासायनिक खतें, बी-बियाणें, माल तारणावर कर्ज देणें इत्यादी कार्यें करणारी 'ब' वर्गांतील. . . .

# अकोले तालुका सहकारी

## ★ खरेदी-विक्री संघ लि. ★

जि. अहमदनगर

★ सभासद संख्या १५० ★ शेअर भांडवल ३७,००० ★ खेळतें भांडवल १,२२,४५० ★ एकूण उलाढाल ४४,५०,५०००


| चेअरमन | सेक्रेटरी |
|---|---|
| भाऊसाहेब हंडे | टी. डी. नवले |

★ किर्लोस्कर ऑईल एंजिन्स मिळतील ★

# ★ स्वरसम्राट कुमार गंधर्व ★

लेखक–सुधीर दामले

★



१९३३ सालांतील गोष्ट. बेळगांवमध्ये गाण्याचा जाहिर जलसा चालू होता. मोठी मोठी जाणकार मंडळी हजर होती त्या जलशाला चार-पांच लोक गाऊन उठले आणि एक नऊ वर्षांचा चिमुरडा पोरगा उठून उभा राहिला. अगदी निर्भयतेने तो मुलगा बैठकीवर जाऊन बसला. लोक पाहातच राहिले. त्यांना वाटले, 'हा पोरगा काय, तारे तोडणार? पण भीति हें नांव देखील त्याला माहीत नव्हतें. मोठ्या आत्मविश्वासाने त्याने गाण्यास प्रारंभ केला आणि लोक स्तंभितच होऊन गेले. त्यांचा स्वतःवर विश्वासच बसेना. ते जें एकत होते तें अलौकिक होते, अद्भुत होतें, अवर्णनिय होतें. त्या मुलाचें नांव शिवपुत्र शिवरुद्राप्पा कोमकलीमठ होतें. या जलशांत संगीताचार्य वझेबुवा हजर होते. ते इतके खूष झाले की, त्यांनी तावडतोब त्या चिमुकल्या गायकाला 'कुमार गंधर्व' म्हणून संबोधलें. त्याचें हें नांव पुढे इतकें मान्यवार झालें की, लोक त्यांना 'कुमार गंधर्व' म्हणूनच ओळखूं लागले. त्यांचें खरें नांव थोडयांना, अगदी फारच थोडयांना माहीत आहे.

बेळगांव जिल्ह्यांतील सुळेभावी खेडयांत कुमारांचा जन्म झाला. वयाच्या पांचव्या-सहाव्या वर्षापासूनच ऐकलेलें गाण्याचे स्वर जसेच्या तसे पुन्हा साकार करण्याचा त्यांना जणू छंदच लागला आणि त्यांची ही नक्कल इतकी यथायोग्य होती की, मुळचे स्वर कोणते आणि नक्कल कोणती हें दूर असलेल्याला ओळखणें कठीण जात असे. या चिमुकल्या मुलामधील हें सुरांचें वेड, सुरांना राबविण्याची त्याची ही ताकद त्याच्या वडिलांच्या–रुद्रप्पांच्या–ताबडतोब लक्षांत आली. कारण ते स्वःहि गात असत. त्यामुळे मुलाला शाळेंत पाठवून रटाळ पुस्तकांचा अभ्यास करण्यास लावण्यापेक्षा सूर आणि स्वर, अलापी आणि अस्ताई यांच्या सहवासांत मनमुराद विहार करण्यास त्यांनी परवानगी दिली. त्याकाळीं खाँसाहेब अब्दुलकरीमखाँ, ओंकारनाथ ठाकूर, वझेबुवा यांच्या शास्त्रीय संगीताच्या लोकप्रिय रेकॉर्डस् कुमारांनी ऐकल्या आणि त्या माधुर्यपूर्ण स्वरांचें सौंदर्य कुमारांनी हुबेहुब उचललें. याशिवाय वडिलांनीहि ठराविक तालमी दिल्या. आपल्या मुलाचे हे गुण सर्वांच्या नजरेस पडावेत या इच्छेने त्यांनी बेळगांवच्या जलशांत कुमारांना प्रथमच गावयास लावले. वयाच्या नवव्या वर्षी वीर अभिमन्यूच्या आवेशांत मैफल जिंकण्यास पुढे सरसावलेल्या कुमारगंधर्वांना आजतागायत मैफलींत अपयश काय तें माहीत नाही. त्यांच्या सुरांना पराभव कसा तो ठाऊकच नाही.

## बारा वर्षांचा साधनाकाल

बेळगांवच्या त्या जलशांत संगीताचार्य वझेबुवांना जसें त्या मुलांत कांही नावीन्य आढळलें तसेंच मुंबईच्या गांधर्व महाविद्यालयाचे प्रमुख बाळकृष्णबुवा देवधर यांनाहि त्या स्वरांत असामान्यत्व दिसलें. या गळ्याच्या सौंदर्याला अधिक खुलावट आणण्याच्या जिद्दीनें त्यांनी शिवरुद्रप्पांकडे कुमारांची मागणी केली. शिवरुद्रप्पांच्यांतील पित्याचा आत्मा दशरथ राजाप्रमाणें तळमळला. त्या कोवळ्या वयांत मुलाला दूर धाडणें त्यांच्या जीवावर आले. परंतु मुलाचें पुढील कल्याण यांतच आहे हें त्यांनी ओळखलें होते. त्यांनी त्या चिमुकल्या सुरांना देवधरबुवांच्या स्वाधीन केले. विश्वामित्रांबरोबर लहानगा राम ज्या हिंमतीने गेला तीच हिम्मत, तीच निष्ठा अन् तेंच मनोधैर्य धरून कुमारगंधर्वहि देवधरबुवांबरोबर गेले. मुंबईला त्यांनी देवधरबुवांकडे बारा वर्षे संगीतसाधना केली.

मुंबईंत देवधरबुवांच्या घरासमोरच अंजनीबाई मालपेकर या प्रसिद्ध गायिका राहत असत. बाईची गाण्याची तयारीहि तशीच जबर. त्यांच्याहि कानावर हे असाधारण स्वर गेले आणि त्यांनीहि मोठ्या प्रेमानें आपल्या जवळील ज्ञान कुमारांना दिलें. आता हळ हळू हिऱ्याला पैलू पडूं लागले अन् त्याची चमक अधिकच वाढली. मुंबईत शिक्षण घेत असतांनाच त्यांना अनेक ठिकाणांहून जलशाचीं बोलावणी येत असत. त्यांचे साऱ्या भारतभर दौरे सुरु झाले. १९३६ सालीं मुंबईंत भरलेल्या एका संगीत परिषदेंत तर कुमारांची मैफल इतकी रंगली की, सर्वांच्या तोंडी एकच नांव 'कुमार गंधर्व'!

कुमार जग जिंकण्यास निघालेल्या सम्राटाच्या आवेशांत मैफलीस जात असत. एक प्रकारचा अद्वितीय आत्मविश्वास त्यांच्या चेहऱ्यावर विलसत असे आणि प्रत्येक खेपेस ते हटकून यशस्वी होऊं लागले.

अशाच तऱ्हेने दहा-बारा वर्षें गेलीं. मध्यन्तरीच्या काळांत त्यांच्याच गायनावर लुब्ध झालेल्या गायिका भानुमती कंस यांच्याशी कुमारांचा विवाह झाला. सूर आणि संगीत एकदिल झालें. मणीकांचनाचा योग म्हणतात तो हाच ! पण कुमारांच्या सुरांचें तें तेज, तो अजिंक्य आवेश दैवाला पाहवला नाही. त्यानें आपली नजर कुमारांवर वळविली अन् कुमारांना एका दुर्धर अशी असाध्य रोगाने पछाडले. त्यांची गाण्याची तालीम-मैफल सारें, सारें कांही बंद पडलें. सुरांना साकार करणारा एक अजोड कलाकार दैवाच्या क्रूरपणाने असहाय्य झाला. डॉक्टरांनी तर त्यांना संपूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला. डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे कुमार मध्यप्रदेशांतील 'देवास' या गांवीं निघून गेले.

### विश्रांतिकालांतील संगीतसाधना

परंतु हजारो रसिकांच्या सदिच्छा, डॉक्टरांचें पराकाष्ठेचे परीश्रम आणि त्यांच्या पत्नी भानुमती यांचें अहर्निश कष्ट यांच्या जोरावर कुमार बरे होतील अशीं चिन्हें दिसूं लागलीं. कोणासहि हार न जाणाऱ्या दैवावरहि अखेर कुमारांनी मात केली आणि १९५२ सालीं कुमारांनी पुन्हा मैफली करण्यास प्रारंभ रसिकांच्या आनंदाला जणू पारावाराच उरला नाही. कुमारांची प्रत्येक मैफल आता पूर्वींच्याच जोसांत रंगू लागली. तेच मधुर स्वर, तीच उत्कटता आणि तीच तन्मयता सारें, सारें कांही पूर्वींचेंच किंबहुना त्याहूनहि जास्त—!

या दीर्घ आजारांत कुमार कांही स्वस्थ बसले नव्हते. संगीताच्या प्रत्यक्ष जलशाला जरी विश्रांति असली तरी त्यांच्या कलावंताच्या मनाला आराम मानवत नव्हता. मनन, चिंतन आणि निदिध्यास त्यांच्या जोरावर त्यांनी संगीताचा शास्त्रशुद्ध अभ्यास करण्यास सुरुवात केली. पण प्रत्येक राग त्यांनी पिंजून पिंजून त्याचा अभ्यास केला आणि स्वतः कांही नवीन रागांची निर्मिती केली. एका अर्थी यांचा हा आजार फायदेशीरच ठरला. त्यांना चिंतन-मनन करायला वेळ मिळाला आणि संगीत क्षेत्रांत चिरस्मरणीय ठरावें असें कांही त्यांनी निर्माण केलें. त्यांनी नव्याने तयार केलेल्या रागांपैकी, मालवती, सहेली आणि लगनगंधार या रागांची खुमारी कांही औरच आहे.


आपण शिर्डीला श्रीसाईबाबांच्या
दर्शनाला आल्यावर आमच्या लोकप्रिय
**एम. देशपांडे खानावळ**
☆ एकवेळ भेट द्या ☆
मालक :—एम. देशपांडे
शिर्डी जि. अहमदनगर


१९५२ सालीं मध्यप्रदेशांत 'मांडुगड' येथे कॉंग्रेसचें अधिवेशन होतें. या अधिवेशनांत केवळ अर्धा तासच कुमार गायले परंतु त्या जलशांत त्यांनी बहारीचा रंग भरला. गायनाच्या जलशाला सहसा संपूर्ण वेळ न बसणाऱ्या पंडित नेहरूंनी कुमारांचा राग पूर्णतया ऐकून घेतला. पंडिजींनी कुमारांची तुलना ४-६ शब्दांतच केली, 'बाजबाद्दूर, रुपमती, कुमार आणि भानुमती" पंडितजींची ही काव्यमय तुलना किती अर्थपूर्ण आहे ! याच अधिवेशनांत कुमारांच्या स्वरांवर लुब्ध झालेली भानुमतीहि या मैफलींत गायली होती. मांडुगडच्या परीसरांत गेल्यावर बाजबहाद्दूराची आठवण झाल्या-खेरीज कशी राहणार ? पंडितजीहि अभिजात रसिकच. म्हणून तर त्यांनी कुमारगंधर्व आणि भानुमती यांना बाजबहाद्दूर आणि रुप-मती यांची उपमा दिली. रुपमतीच्या प्रेमासाठी संगीताच्या साधनेवर नर्मदेचा ओघ वळविणारा संगीताचा बादशहा बाजबहाद्दूर आणि याच्या संगीताच्या वैभवावर लुब्ध होणारी नादलुब्धा रुपमती धन्य होत !

१९५४ सालीं कै. गोविंदराव टेंबे यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यांत कुमारांचा सत्कार करण्यांत आला. तेव्हा कुमारांनी म्हटलेले 'मालवती' आणि 'लगनगंधार' पुणेकरांच्या प्रथम कानावर पडले. पुणेकर संगीताच्या मैफलीवर वेडे झाले. मालवतीचा सुगंध सर्वत्र दरवळला. गांवोगांवाहून त्यांना आमंत्रणें येऊं लागलीं. कुमारांच्या कंठातून निघालेला मालवती राग ऐकण्यासाठीं लोक उत्सुक झाले.


कुमारगंधर्वांनी एकाद्या विशिष्ट घराण्याचा अंगिकार केलेला आहे असें कदापि दिसणार नाही. कुमार हे अखेर कुमारच आहेत. त्यांचें संगीत सर्वांपासून वेगळें असलें तरी तें सर्वांमध्ये मिळून राहणारे आहे. स्वरांमध्ये तें एकरूप होत जातें. मल्लीकार्जुन मन्सूर, बडेगुलामअल्लीखाँ यांच्या तोंडचें संगीत त्यांना बेभान करतें. परंतु एका विशिष्ट घराण्याच्या ठराविक बंधनांत गाणें कुमारांना मुळीच मान्य नाही. कुमारांना फक्त स्वरांमध्ये सौंदर्य भरायचें माहीत आहे.

१९५९ सालीं कुमारांनी 'देवास' येथे 'कुमार संगीत ॲकॅडमी, नांवाची संगीत शाळा काढली आहे. तेथ जाणकारांपासून अनभिज्ञा पर्यंत सर्वांनाच शिक्षण देण्यांत येतें. सध्या या ॲकॅडमीमध्ये सुमारे २५ विद्यार्थी या संधीचा फायदा घेत आहेत. लवकरच परगांवच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उघडण्याचा त्यांचा मानस आहे.

## खटाव तालुक्यांतील एक उपक्रमशील खेडें

# ★ पुसेगांव ★

वि. भ. मोंडकर



खेडेगांवांतील व्यवहार जेव्हा परंपरेच्या ठराविक चाकोरींतून सुरळीत चालू होता तेव्हा गांवचे पंच, पाटील प्रभृति माणसें गांवचें पुढारीपण करीत होती. पण ब्रिटिश अमदानींत गांवगाड्याची ही जुनी पद्धति मोडून गेली. नव्या गरजा उत्पन्न झाल्या तरी नव्या विचारांचे पुढारी गांवांतून निर्माण झाले नाहीत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर खेडेगांवांतील समाजाची आर्थिक स्थिति सुधारणें व त्यांना शिक्षण, आरोग्य इत्यादि गोष्टींचा लाभ देणें यासाठी सरकारकडून प्रयत्न होऊं लागले. समाज विकासयोजना ग्रामसुधाणेसाठी प्रयत्न, शिक्षणाचा प्रसार यांसाठी सरकारी अधिकारी नेमण्यांत आले. निरनिराळ्या राजकीय पक्षांचे पुढारी व सर्वोदयासारख्या आंदोलनांचे पुरस्कर्ते खेड्यांतील लोकांना मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न करूं लागले. या साऱ्या प्रयत्नांमधून एक गोष्ट सर्वांच्या नजरेस आली आहे की, खेडेगांवांतील लोकांतूनच नेतृत्व तयार होण्यावर सारी प्रगति अवलंबून आहे व नेमकी हीच गोष्ट साध्य होतांना आढळत नाही.

प्रस्तुत लेखामध्ये पुसेगांव ( ता.खटाव, जि. सातारा ) या खेड्यांतील लोकांनी बाहेरच्या कोणा व्यक्तीच्या मार्गदर्शनाशिवाय केलेल्या एका यशस्वी उपक्रमाची नोंद आहे. लेखांतील माहितीवरून असें दिसेल की, या खेड्यामधील लोकांतून शिक्षणाबद्दल आस्था बाळगणारे नवे पुढारी निघाले व त्यांनी मोठ्या चिकाटीने, कौशल्याने व एकजुटीने आपल्या गांवीं एका वार्षिक जत्रेची संघटना करून गांवाच्या सुधारणेसाठी लागणारा पैसा या जत्रेतून उभा केला. या गांवांत शहरांतील राजकीय पक्षांचें लोण पोचलें तरीहि गांवांतील लोकांनी या जत्रेची संघटना लोकशाही पद्धतीने व एकजुटीने चालू ठेवण्यांत यश मिळविलें. जत्रेच्या संघटनेचा अनुभव गांवकऱ्यांना आल्यामुळे सहकारी चळवळ, कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम इत्यादि नव्या गोष्टींचा स्वीकारहि त्यांना करतां आलेला आहे, असें प्रस्तुत माहितीवरून दिसतें. ग्रामीण भागांतील जनतेला आज बाहेरच्या मार्गदर्शनाची व मदतीची गरज आहेच, परंतु त्या जनतेमध्ये संघटनेची शक्ति आहे व तिच्यांतूनच नव्या विचारांचे पुढारीहि निर्माण होऊं शकतात, हें या गांवच्या उदाहरणावरून दिसून येईल.

### श्री सेवागिरी महाराज

या गांवच्या लोकांनी सुधारणेच्या दृष्टीने पहिलें पाऊल टाकण्यास एका साधूचें त्या गांवांतील वास्तव्य आणि मृत्यु कारण झाला व

गांवचें श्रद्धास्थान




श्री सेवागिरी महाराज

या घटनेलाहि महत्त्व आहे. परंतु पुढील माहितीवरून असेंहि दिसून येईल की, शिक्षणाच्या प्रसाराची व जत्रेच्या संघटनेची प्रेरणा लोकांना त्या साधूकडून मिळालेली नाही ; ती त्यांच्या नव्या जाणिवेमुळे निर्माण झालेली आहे. लोकांची एकजूट सांधण्यास व ती

राखण्यास मात्र या साधूंच्या संबंधीची आदराची भावना प्रेरक ठरलेली दिसते.

पूर्वीचे जुनागडचे राहणारे सेवागिरी महाराज यांच्याशी त्यांच्या कराचीच्या वास्तव्यांत पुसेगांवचे श्री. **ज्योती जाधव** यांची ओळख झाली. त्यांच्या बरोबर १८९८ सालीं, म्हणजे वयाच्या १६–१७ व्या वर्षी महाराज पुसेगांवास आले व गांवच्या विश्वेश्वराच्या देवळांत उतरले. सुरुवातीला ज्योती जाधव व त्यांच्या मित्र मंडळीपैकीं कांही माणसें सेवागिरी महाराज यांबरोबर गप्पागोष्टी करण्यास देवळांत येत असत. यापेक्षा त्यांचा गांवाशी जास्त संबंध सुरुवातीला तरी आलेला दिसत नाही. गांवांत इतर बैरागी येतात त्यांतलाच एक या दृष्टीने लोक त्यांच्याकडे पाहात होते. दर सोमवारीं गांवांत झोळी फिरवून त्यांत जें कांही जमेल त्यावर उदरनिर्वाह ते करीत असत. आज मठाशेजारी असलेली विहीर सेवागिरी महाराजांनी स्वतः अंगमेहनतीने खोदली व तींतील माती त्यांच्याकडे येणाऱ्या ५–६ लोकांच्या मदतीने वर काढली. सुरुवातीचें स्वयंपाकखोलीचें वगैरे काम देखील सेवागिरींनी स्वतः करून घेतलें. नंतर आसन्नमरण रोग्यांना व वेडसर लोकांना बरें करून दाखविल्यापासून गांवांतील लोकांत सेवागिरी महाराजांबद्दल लौकिक निर्माण झाला व त्या वेळेपासून लोक त्यांच्याकडे पूज्य भावनेने पाहूं लागले. त्याचें प्रत्यंतर म्हणजे १९४५ सालीं सेवागिरींनी दत्ताच्या देवळाच्या बांधकामास सुरुवात केली त्या वेळीं गांवच्या लोकांनी वर्गणी करून मदत दिली हें होय. तेव्हा गांवांतील कांही लोकांचा त्यांच्या कार्यास विरोध होता हें लक्षांत ठेवलें पाहिजे. नंतर १९४७ सालीं सेवागिरी महाराज दम्याच्या विकाराने मरण पावले, त्या वेळीं त्यांच्या शवाची गांवांतून गाडीवरून मिरवणूक काढण्यांत आली; गांवांतील लोकांनी त्यांच्या शवास फुलें व पैसे वाहिले. पहिल्या या एका दिवसांतच २५० रुपये जमा झाले. भविष्यकाळांत व्यापक स्वरूप धारण करणाऱ्या जत्रेची ही नांदीच होती असें म्हणावयास हरकत नाही. नंतर ते शव महाराजांनीच पूर्वी सांगून व्यवस्था करून ठेवलेल्या दत्ताच्या मूर्तीच्या खालील तळघरांत मिठांत घालून पुरण्यांत आलें व त्यावर समाधि बांधण्यांत आली. सेवागिरी महाराजांचा लौकिक आता दूरवर पसरला होता. त्यांच्या दर्शनास येणारा माणूस त्यांच्या समाधीपुढे दक्षणा म्हणून पैसा ठेवीत असतो. तसेंच दर अमावस्येला दीड-दोन हजार लोक त्यांच्या समाधीच्या दर्शनास येतात. तेहि पसे, तांदूळ, वगैरे समाधीपुढे ठेवतात आणि त्यांतूनच आज मठांत असणाऱ्या शिष्यांचा उदरनिर्वाह होत असतो.



यात्रेच्या रुपानें गांव कल्याणाच्या आदर्शाचा पायंडा घालणारी पहिली यात्रा कमिटी

## समाजकल्याणाची प्रेरणा

सेवागिरी महाराज मरण पावले त्या वेळीं त्यांच्याजवळ पैसा असावा असा गांवांतील लोकांचा कयास होता व तो पैसा शिष्यांच्या हातांत जाऊं नये म्हणून गांवच्या प्रमुख व्यक्तींनी मठाच्या कांही भागास कुलपें लावलीं. कुलपें लावण्यामागे पैसा सुरक्षित राहावा येवढीच इच्छा होती. श्रद्धेबरोबर समाजकार्याची जाणीवहि गांवकऱ्यांत होती हें प्रथम प्रत्ययास आलें. कारण कुलपें लावल्याच्या दुसऱ्या दिवशी गांवच्या प्रमुख व्यक्तींनी सेवागिरींच्या सर्व सामानाची शोधाशोध करून दहा हजार रुपये शोधून काढले, आणि त्या पैशाच्या मदतीने त्या वेळची गांवची निकडीची गरज म्हणजे इंग्रजी शाळा बांधावयाची असें ठरविले, कालांतराने ही शाळा बांधून तयार झाली आणि तिला श्री. **सेवागिरी विद्यालय** असें नांवहि देण्यांत आलें. या शाळेसाठी लागणारी जमीन **श्री. श्रीराम कुलकर्णी** यांनी विनामूल्य दिली.

सन १९२० सालीं नारायणगिरी व १९३० सालीं हनुमानगिरी असे दोन शिष्य सेवागिरींकडे राहण्यास आले होते. सेवागिरींमागन नारायणगिरी व्यवस्था पाहत होते. नारायणगिरी १९५० मध्ये मरण पावले, त्यानंतर देवळाची व मठाची व्यवस्था हनुमानगिरी पाहात आहेत. सेवागिरींनंतर त्यांच्या दोन्ही शिष्यांना गांवाकडून पूज्य भावनेने वागविण्यांत आलें.

श्रद्धेने काढलेली शवाची मिरवणूक आणि समाजकल्याणाच्या जाणिवेंतून निर्माण झालेली इंग्रजी शाळा या दोन घटनांनंतर गांवकऱ्यांनी या दोन्ही गोष्टींची सांगड घालणारें पुढचें पाऊल टाकलें. सेवागिरी महाराजांच्या मृत्युनंतर त्यांची पुण्यतिथि कशी साजरी करावी यासंबंधी गांवच्या प्रमुख माणसांत चर्चा होऊं लागली. व शेवटी सेवागिरींच्या पुण्यतिथि निमित्ताने वार्षिक जत्रा भरविण्याचें ठरलें आणि त्याप्रमाणे गांव एकत्र बोलावून त्यांचे समोर जत्रेचा विचार मांडण्यांत आला. जत्रेची योजना सर्वसंमत होऊन अमलांत येण्यास कारण काय असें पाहूं गल्यास तीन गोष्टी ठळकपणें नजरेसमोर येतात. गांवांत असलेला एकोपा, पुढाऱ्यांवरील गांवकऱ्यांचा विश्वास आणि सेवागिरी महाराजांबद्दलची भक्ति. सुरुवातीला जत्रा कमिटीचे अध्यक्ष म्हणून श्री. **बंडू रामजी जाधव** यांची त्यांच्या इतक्याच कर्तृत्ववान असलेल्या त्यांच्या सहकाऱ्यांनीं निवड केली. त्यांनी आपल्या अंगच्या अनेक गुणांमुळे जनतेचा संपूर्ण विश्वास संपादिला होता. त्यांच्या पुढारीपणाबद्दल कोणाच्याहि मनांत किंतु नव्हता. त्यांचें शिक्षण सही करण्याइतपतच झालेलें आहे परंतु आज गांवांतील कार्य करणाऱ्या ८-१० व्यक्ती श्री. बंडू रामजींच्या मार्गदर्शनाखालीच तयार झालेल्या आहेत. तसेंच गांवच्या शाळा, हायस्कूल, या सर्व इमारतींचीं बांधकामें स्वतःच्या देखरेखीखाली त्यांनी पुरीं करून घेतलीं, हीं त्यांच्या कर्तबगारीचीं उदाहरणें आहेत.

## सभासदांचें व चातुर्य व चिकाटी

जत्रेचा हा सर्व व्याप वाढण्यास सेवागिरी महराजांचा लौकिक व त्यांच्या विषयीची पूज्यभावना जितकी कारणीभूत आहे. त्यापेक्षा जत्रा कमिटीच्या सभासदांचें चातुर्य व चिकाटी अधिक महत्त्वाची आहेत, असें आपणास खालील माहितीवरून दिसून येईल. जत्रा भरण्याचें ठरतांच त्यांनी गांवाकडून ५०० रुपये कर्ज घेऊन जत्रेसाठी मे. कलेक्टरांकडून परवानगी मिळविली. शेतकी खात्याकडे खटपट करून १०० रुपये देणगी मिळविली. पहिल्या वर्षीं बाहेरील गुरें येणें अशक्य म्हणून गांवांतील सर्व गुरें १० दिवस जत्रेंत बांधून ठेवून गुरांचा मोठा बाजार भरतो असें आजूबाजूच्या लोकांच्या निदर्शनास आणलें. पहिल्या वर्षीं गुरांसाठी मोठीं बक्षिसें वाटलीं. पहिल्या ३ वर्षांत दुकानदारांकडून कांही घेतलें नाही. गुरांपासून मिळालेल्य शेणखताचा दुरुपयोग न करतां पहिल्या वर्षीं २३५ रुपयांस लिलाव केला व पहिल्या वर्षीं ३०७ रुपये तोटा सोसूनहि जत्रा आदर्श करूं अशी त्यांनी नक्की खूणगाठ बांधली. त्याचबरोबर जत्रेसाठी आलेल्या दुकानदार व इतर धंदेवाईक यांच्या जागेबद्दलच्या अडचणी दूर करून त्यांना अंगमेहनतीने सहाय्य केलें व शिस्तीने सर्व कारभार पाहून आपला आदर्श त्यांनी लोकांस दिला.

१९५४ पावतो जत्रेचा सर्व व्यवहार गांवच्या एकविचाराने चालत होते, परंतु १९५५ पासून संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावरून गांवांत दोन पक्ष निर्माण झाले. जत्रा-कमिटीचा कारभार कोणी पाहावा असा प्रश्न निर्माण झाल्यावर त्यांनी गांवांतील पुरुष वर्गाचें इलेक्शन पद्धतीने दोन पेटया ठेवून मतदान घेतलें व ज्या पक्षाला जास्त मतें मिळतील त्याने जत्रा-कमिटी स्थापून जत्रेचा कार-

( पृष्ठ २९ पहा )

र. नं. ७०४९ ] विना सहकार नहि उद्धार [ र. ता. २८-८-१९३१

रासायनिक खतें, पेंड, बी-बियाणें, माल तारणावर कर्ज देणें इत्यादी कार्यें करणारी 'ब' वर्गीतील....

**पुसेगांव विविध कार्यकारी**

**• सहकारी सोसायटी लि. •**

जि. उत्तर सातारा

★ सभासद संख्या २५६ ★ शेअर भांडवल ६३,६२५ ★ खेळतें भांडवल १,९६,२९३ ★ रिझर्व फंड ११,२८१ ★ एकूण उलाढाल ५,१२,९३५. ★

चेअरमन — जगन्नाथ गोविंद जाधव

सेक्रेटरी — भिकू नाना झिरपे

# ★ थोडं कडू थोडं गोड ★

त्या वेळीं जर आमच्या गांवीं इंग्रजी शाळा नसती तर मला साधें एस्. एस्. सी. सुद्धा होतां आले नसते, ही गोष्ट खरी आहे. जी तऱ्हा माझी तीच गांवांतील अनेक मुलांची. कारण परगांवीं जाऊन शिक्षण घेणें, परवडणारे नव्हतें. अडीच–तीन हजार वसतीच्या गांवीं इंग्रजी शाळा असणें म्हणजे तें गांव फारच सुधारल्याचें लक्षण होतें. आमच्या गांवांतील लोकांनी रयत–शिक्षण संस्थेसारख्या खेडोपाडीं शिक्षणाचा प्रसार करणाऱ्या संस्थेचा हात धरून गांवांत एक इंग्रजी शाळा काढली आणि आपल्या व आसपासच्या दहा–पांच गांवांतील मुलांचा हायस्कूल शिक्षणाचा प्रश्न चुटकीसरशी सोडवला. ही गोष्ट गांवाला अर्थातच भूषणास्पद होती.

मराठी शाळेंत एकाच मास्तरांच्या हाताखाली दिवसाचे सात तास काढण्याची आमची सवय. पण इंग्रजी शाळेंत आल्यावर प्रत्येक विषयाला नवे 'सर' आलेले पाहिल्यावर आम्हाला अचंबा वाटला. शाळा लहान आणि नवीन असल्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याकडे जातीनें लक्ष घालणें शिक्षकाला जमत असे. अभ्यासाप्रमाणेच शाळेंतील इतर कामेहि विद्यार्थ्यांना करावी लागत. विशेषतः नादार विद्यार्थ्यांना तीं फार सांगत. तरीपण कोणी कधीहि त्याविषयी तक्रार केल्याचें आठवत नाही. "आपलीच शाळा, मग आपणच कामें केलीं पाहिजेत." अशी गांवकऱ्यांची व विद्यार्थ्यांची रास्त भावना असे.

पुढे लवकरच गांवकऱ्यांनी गांवाला दरसाल भरणाऱ्या जत्रेच्या उत्पन्नांतून व घरटी वर्गणी गोळा करून शाळेला एक भव्य इमारत बांधून दिली. ही इमारत गांवाबाहेर हवेशीर अशा ठिकाणी असल्याने शाळेला चांगलेंच मूर्त रूप आलें आणि विद्यार्थ्यांची पटहि वाढली. आणि याच शाळेंतून मी चांगल्या मार्कांनी एस्. एस्. सी. पास झालों. आणि पुढल्या शिक्षणासाठी मला माझ्या शाळेप्रमाणेच गांवहि सोडावे लागले.

तसं पाहिलं तर शाळेला अनेक गोष्टींची अवश्यकता होती. अर्थात् त्याची जाणीव मला बाहेरच्या बड्या संस्थांच्या, आणि शहरांतील शाळा पाहून झाली. पण त्या सर्वांची पूर्तता एकदम करता येण्यासारखी नव्हती. तरीपण त्या उणीवा दूर करण्याची उमेद लोकांजवळ होती. 'गांव करील ते राव करणार नाही' ही म्हण आमच्या गांवाने अक्षरशः खरी केली होती.

पण सर्व गोष्टी सुरळीत चालतील तर तो गांवगाडा कसला? त्याला कांहीतरी कारणच हवें होतें. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आली नि गेली, पण तिचें भले बुरे अनुभव गांवाला आले आणि अर्थातच गांवांतून दोन विचार प्रवाह वाहूं लागले. त्याची झळ थोडीफार शाळेलाहि लागली. शाळेच्या गरजा कायम राहिल्या. परवा मे महिन्याच्या सुट्टीत जेव्हा मी घरीं गेलों तेव्हा मला एक नवीनच बातमी समजली. ती म्हणजे आमच्या शाळेंतून पुष्कळसे विद्यार्थी एस्. एस्. सी. ला इंग्रजी विषय न घेताच बसतात. हा एक नवाच पायंडा शाळेंत पडत चालला होता. पण एस्. एस्. सी ला कुणाच्या इच्छेने विषय निवडायचे? शिक्षकांच्या की, विद्यार्थ्यांच्या? मुलांचे इंग्रजी कच्चे आहे हें कबूल. पण त्याला जबाबदार कोण? ज्या इंग्रजी शाळेंत मुलांना इंग्रजी शिकतां येत नाही ती इंग्रजी शाळा? कसली याबद्दल कोणीच कसें बोलत नाही? असे नाना तऱ्हेचे प्रश्न माझ्यापुढे ठाकले, या सर्वांवरहि ताण करणारी दुसरी गोष्ट अशी की, एस्. एस्. सी. सारख्या वर्गाला गणित–सायन्ससारखे महत्त्वाचे विषय शिकवण्यास दोन दोन महिने शिक्षक नाही, ही होय. याचा कुणीच कसा विचार करीत नाही, याचेंच आश्चर्य वाटतें. गांवकारभारांत मतभेद असले म्हणून काय झाले? त्याचा खेळ विद्यार्थ्यांच्या जीवनाशी खेळण्यांत काय अर्थ? हे सर्व प्रश्न मला वारंवार भंडावून सोडतात. त्यांची उत्तरें मला कुठेच सापडत नाहीत.

गेल्या जून महिन्यांतील गोष्ट. आमच्या शाळेंतील एक शिक्षक मला रस्त्यावर भेटले. मला पाहतांच ते जवळ आले आणि म्हणाले, "आपल्या हायस्कूलचा रिझल्ट साठ टक्के लागलाय् यंदा." आमच्या शाळेचा रिझल्ट एवढा चांगला कधीच लागला नव्हता. तेव्हा त्यांना अभिमान वाटणे साहजिकच होते. पण मला त्याबद्दल कांहीच वाटले नाही. मीं उलट त्यांना विचारले, 'ती फार चांगली गोष्ट आहे सर. पण ह्या साठ टक्यांपैकीं कॉलिजला प्रवेश मिळवण्यालायक किती विद्यार्थी आहेत?' माझ्या या प्रश्नाचें उत्तर अद्याप त्या शिक्षकांनीं दिलें नाहीं. त्या साठ टक्क्यांमध्ये पुष्कळसे इंग्रजी न घेताच S. S. C. पास झाले होते. आणि ही माझ्या शाळेची आजची खरी व्यथा आहे.

वर्षातून दोन वेळां वर्तमान पत्रांतून एस्. एस्. सीचा रिझल्ट जाहीर होतो. त्यामध्ये पहिल्या तिसांत येणाऱ्या विद्यार्थ्यांची नांवें वाचलीं कीं, माझ्या मनांत एक प्रश्न येतो. या तिसामध्ये माझ्या हायस्कूलच्या एखाद्या विद्यार्थ्याचें नांव येईल का?"

—कृ. शं तांदळे

★ ★ ★

( पृष्ठ २७ वरून )

भार पाहावा असें ठरलें. त्याप्रमाणे व्यवस्था दरसाल होऊं लागली आणि पुढे-मागे भांडण निर्माण होऊं नगे म्हणून घटना लिहून काढली गेली. अशा रीतीने गांवच्या जत्रेवर राजकारणाचा परीणाम लोकांनी होऊं दिला नाही. जत्रेचा एकूण हिशेब चैत्र शु० प्रतिपदेला संबंध गांवासमोर मांडून त्याला गांवाची मंजुरी घेतली जाते.

या हिशेबाच्या तपशिलावरून आपणास जत्रेची व्यापकता, परिसरांतील खेड्यांशी आणि कांही शहरांशी आलेला गांवचा संबंध आणि त्यायोगें गांवावर होणाऱ्या आर्थिक आणि सामाजिक परिणामांची कांही कल्पना येईल. या जत्रेला मिळणारें उत्पन्न खालील तक्त्यावरून दिसून येईल. त्याचप्रमाणे सेवागिरी महाराजांच्या पुण्यतिथि निमित्ताने निघणाऱ्या मिरवणुकींत रथावर देणगी म्हणून मिळणारी रक्कम सुद्धा बरीच मोठी असते. या दोन अलग अलग जमा होणाऱ्या रकमा होत. पैकी जत्रेपासून मिळणारी रक्कम शिक्षण बाबींवर खर्च होते. व रथावर मिळणारी रक्कम मठ बांधण्यासाठी खर्च होते. आतापावेतो २२००० रुपये किमतीचें मठाचें बांधकाम झालें असून बाकी रक्कम १७,९६७-५० रुपये हनुमानगिरी यांच्या नांवें बँकेंत शिल्लक आहे, समाधीचे पुढयांत ठेवला जाणारा पसा हनुमानगिरी यांचेकडेच असतो. १९६० सालीं रथावर १६,१६७-५० रुपये देणगी लोकांकडून मिळाली व समाधीपुढे ८०० रुपये ठेवण्यांत आले. यावरून सेवागिरी महाराजांबद्दलसुद्धा लोकांच्या मनांत आस्था व पूज्य भावना असल्याचें दिसून येतें.

## तक्ता १ : जत्रेतील जमा

| जमेच्या बाबी | १९४८ | १९४९ ते १९५२ | १९५३ ते १९५६ | १९५७ ते १९६० |
|---|---|---|---|---|
| | कर्ज | वर्गणी | वर्गणी | वर्गणी |
| गांवाकडून | ५०० | १,८२४ | २,०३१ | २,५२५ |
| बाजारवर्गणी | — | — | १,२७५ | १,७७५ |
| | शेतकीखातें | रुरल डे. बोर्ड शेतकी खातें | रुरल डेव्हलपमेंट बोर्ड व शे. खातें | शेतकी खातें |
| सरकारी देणग्या | १०० | १,४५० | २,१०० | ५०० |
| जनावर विक्री पावती | — | १,१९७ | ३,४७८ | ६,९९२ |
| शेणखत लिलाव | २३५ | १,९०० | २,०५५ | ३,५६० |
| दुकान पट्टी | — | ९०० | २,७१२ | ५,१२५ |
| किरकोळ | १९३ | ४४२ | १,१४६ | ७७९ |
| मागील सालची शिल्लक | — | १९३ | ३,३७५ | ४,०९६ |
| एकूण जमा | १,०२८ | ७,९३६ | १८,१७२ | २५,५५२ |

### जत्रेपासून गांवचे फायदे

जत्रा कमिटीकडे जमलेल्या पैशांतून जे पैसे शिल्लक राहिले त्यांचा उपयोग गांवच्या सार्वजनिक बाबींवर कसा झाला तें आपणास दिसून आलेंच. परंतु या गांवीं जत्रा भरूं लागल्यापासून सामान्य शेतकऱ्यापासून तो मोठ्या शेतकऱ्यापर्यंत व लहान व्यापाऱ्यापासून तो मोठ्या व्यापाऱ्यापर्यंत व इतर ग्रामस्थांना सुद्धा या जत्रेपासून पुढील फायदे व करमणूक झाल्याचें दिसून येईल.

बाजारवर्गणी –बाजारापासून जी वर्गणी जमा झाली आहे ती जत्रेमध्ये किरकोळ भाजीपाला व फळफळाव विकली जातात त्यांपासून आहे. म्हणजे जत्रेच्या निमित्ताने गांवांतील शेतकरी भाजीपाला व ऊंस तयार करून जत्रेंत विकतात व त्यापासुन गांवच्या शेतकऱ्यांचा फायदा होतो.

## तक्ता २ : जत्रेचा खर्च

| खर्चाच्या बाबी | १९४८ | १९४९ ते १९५२ | १९५३ ते १९५६ | १९५७ ते १९६० |
|---|---|---|---|---|
| जनावरांना बक्षिसें | ५१० | २,०६५ | २,०७६ | १,५३० |
| कुस्त्यांसाठी बक्षिसें | १५० | ८७० | १,१२५ | २,०५० |
| आरोग्य खातें | ५० | ३६१ | ८०० | १,०५० |
| दिवाबत्तीचा खर्च | १०० | ५४५ | ९४० | १,३२५ |
| जेवण खर्च | — | — | १२५ | ३२५ |
| प्रचार व छपाईचा खर्च | २५ | २२० | ४७० | ९०० |
| एकूण खर्च | ८३५ | ४,०६१ | ५,५३६ | ७,१८० |
| गांव बाबींकडे खर्च | — | गांवचें कर्ज दिलें ५०० | मराठी शाळा व हायस्कूल ८,५४० | मराठी शाळा ३,३६८ |
| तोटा | ३०७ | — | — | — |
| पुढील सालासाठी शिल्लक | १९३ | ३,३७५ | ४,०९६ | १४,८०४ |

**देणग्या**–जत्रा भरूं लागल्यापासूनच्या १३ वर्षांच्या काळामध्ये रूरल डेव्हलपमेंट बोर्डाकडून १९४९ सालीं ८२५ रुपये व १९५३ सालीं १६०० रुपये गुरांच्या प्रदर्शनासाठी देणग्या मिळाल्या आहेत व त्याच सालीं जत्रा कमिटीने चांगल्या गुरांना जास्त बक्षिसें देऊन गुरांची चांगली निपज व वाढ करण्यासाठी गांवच्या लोकांना उत्तेजन दिलें. गांवांतील श्री. दगडू राजाराम दळवी यांचेकडे एक गाय आहे. त्या गाईला पहिलें बक्षीस मिळालें असून ती गाय हैद्राबाद येथील प्रदर्शनांत नेण्यासाठी सरकारकडून त्या मालकास विनंती केली जात होती. अशाप्रकारें गुरांची चांगली निपज होण्यासाठी लोक लक्ष घालूं लागले त्याचें श्रेय जत्रेकडे जातें.

**जनावर–विक्री** :–या गांवीं जत्रा भरण्यापूर्वी बरेच लोक दुसऱ्या गांवीं जनावरें घेण्यासाठी व विकण्यासाठी जात असत. त्यामुळे जाण्यायेण्याचा कमींत कमी ५० रुपये खर्च येत असे. आतां घर बसल्या हवें तें जनावर विकतां व विकत घेतां येऊं लागलें. काही वेळां जत्रा संपल्यावर फिरून जाणारीं जनावरें फारच स्वस्त मिळूं शकतात. त्यामळे सुद्धा गांवच्या शेतकरी लोकांचा फायदा झाल्याचें दिसून यतें.

**शेणखत** :–– हा गांव बागाईत असल्यामुळे व पूर्वीपासून शेणखत पिकास जास्त देण्याची पद्धत असल्यामुळे या गांवीं नेहमी शेणखताचा तुटवडा भासतो. त्यामुळे या गांवचे शेतकरी आजूबाजूच्या गांवांहून शेणखत आणीत असतात. परंतु कांही वेळीं शेणखताची गरज असून-सुद्धा शेणखत मिळत नाही. या गांवी जत्रा भरूं लागल्यामुळे दरसाल १५० ते २०० गाडचा शेणखत गांवास जास्त मिळूं लागलें आहे. १९५७ ते १९६० या चार वर्षांचे जत्रेच्या उत्पन्नाच्या रुपयास दोन आणे इतकें उत्पन्न शेणखतविक्रीपासून झालें आहे. म्हणजे या फुकट जाणाऱ्या शेणखताचा सुद्धा त्यांनी गांवच्या जमिनी सुधारून जत्रेच्या उत्पन्नाच्या वाढीसाठी कसा उपयोग करून घेतला हें पाहण्यासारखे आहे.

**कुस्त्या** :— आजकाल कुस्त्या सर्वच ठिकाणीं होतात. परंतु खेडे-गांवीं मोठी कुस्ती पांचदहा रुपायापर्यंत होणारी असते. परंतु जत्रेचें उत्पन्न वाढल्याने अलीकडे मोठ्या कुस्त्या होऊं लागल्या आहेत. त्यामुळे शहरांतील चांगले कुस्तिगिर इथपावेतों येऊं लागले आहेत. व गांवच्या हौशी कुस्तिगिरांना चांगल्या कुस्त्याचे फड पाहण्याचें सुख लाभलें आहे.

करमणूक :— शेतकरी वर्ग हा नेहमीच काबाडकष्ट करणारा वर्ग. त्याला करमणूक ही बाब जत्रेच्या निमित्ताने गांवच्या गावीं गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत होऊं लागली आहे. अशा प्रकारें जत्रेपासून स्थानिक लोकांचे फायदे होऊं लागले आहेत.

दुकानें :— १९६० च्या जत्रेमध्ये एकूण ३२० दुकानें होतीं. त्यांपैकी खुद्द गांवांतील ५६ दुकानें होतीं. एकूण जत्रेसाठी आलेल्या दुकानांच्या १७॥ टक्के इतकीं गांवचीं होतीं. सर्व दुकानांची विक्री १ लाख रुपये होती. त्यांपैकीं १७ हजार रुपये विक्री स्थानिक दुकानांची होती. जत्रेंत विक्रीसाठी आलेल्या गुरांची किंमत सुमारे ८० ते ९० हजार रुपये इतकी झाली असावी. आता इतर गांवांशी आणि शहरांशी आलेल्या संबंधाविषयीं बोलावयाचें झाल्यास. तक्ता ३ मध्ये दाखविल्याप्रमाणे विशेष करून १० ते २५ मैलांतील गांवांशी या जत्रेमुळे जास्त संबंध जुळून आलेला दिसेल.

## तक्ता ३ : जत्रेंत आलेलीं दुकानें

| गट | दुकानें | स्थानिक | १ ते ५ मैल | ६ ते १० मैल | ११ते२५ मैल | २६ते५० मैल | ५० मैलांवरील | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मिठाई, खाणावळ, हॉटेल पानपट्टी वगैरे | २५ | ६ | १६ | ३४ | १४ | ९ | १०४ |
| २ | कापडविक्री, तयार कपडे, घोंगड्या बांगडी वगैरे | ९ | ११ | १६ | १६ | २६ | ६ | ८४ |
| ३ | लोखंडी सामान, तांबा, पितळ, वगैरे | ८ | ८ | १० | १० | २ | २ | ४० |
| ४ | शिवणकाम, न्हावी, चांभार, सुतार, तांबटकाम वगैरे | १४ | ८ | १० | २६ | १२ | १० | ८० |
| ५ | सिनेमा, तमाशा, बॅंड पाळणावाला, वगैरे | • | ० | १ | ५ | १ | ५ | १२ |
| ५ | | ५६ | ३३ | ५३ | ९१ | ५५ | ३२ | ३२० |

वरील तक्ता ३ मध्ये आलेल्या दुकानांच्या वर्गवारीवरून पहातां मोठें भांडवल लागणारीं जीं दुकानें आलीं होतीं तीं सर्व शहरवजा मोठ्या गांवांतून आलीं होतीं व लहान दुकानें आजूबाजूच्या खेडेगांवच्या लोकांची होतीं. मोठीं आलेलीं दुकानें कोरेगांव, सातारा, वडूज, खटाव, रहिमतपूर, दहिवडी, म्हसवड, या शहर गांवांतील होतीं यावरून या गांवा बरोबर आजूबाजूच्या शहरगांवचा सुद्धा या जत्रेपासून फायदा झाल्याचें दिसून येतें.


तक्ता १ व २ हे बारकाईने पाहतां जत्रा कमिटीने जत्रेचें उत्पन्न जसजसें वाढत गेले त्याचप्रमाणांत इतर खर्च थोड्या प्रमाणांत वाढवून बाकी पैसा शिल्लक ठेवला असें दिसतें. त्यावरून जत्रा कमिटीचा हिशेबीपणा दिसून येतो. शिल्लक राहिलेला पैसा इंग्रजी शाळेची इमारत बांधण्यासाठी अगर मराठी शाळेची इमारत बांधण्यासाठी उपयोगांत आणला जातो. या गांवीं इंग्रजी शाळा झाल्यामुळे आजूबाजूच्या ७–८ मैलांतील मुलांच्या शिक्षणाची या गांवीं सोय होऊं लागली व या गांवांशी आजूबाजूच्या गांवचे संबंध वाढूं लागले आहेत.


येथे तीन सहकारी सोसायट्या आहेत पैकी १९६० सालीं जिल्ह्यांतील पहिल्या प्रतीचें बक्षीस एका सोसायटीस मिळालें आहे. गांवांत असलेल्या सोसायटींपैकी दोन सोसायट्यांनी कोठारें व ऑफिसेस बांधण्यास घेतलीं आहेत. १९५५ सालीं गांवांतील २५ लोकांनी स्वत: पुढाकार घेऊन संततिनियमन प्रतिबंधक ऑपरेशन्स करून घेतलीं आहेत. ग्रामपंचायत, होमगार्डपथक, महिलासमाज यांचें-सुद्धा कार्य चालू आहे. अशा प्रकारें सर्व बाजूंनीं गांवाची प्रगति करून घेण्याकडे लोकांचें लक्ष असल्याचें दिसून येईल.

श्री. मोंडकर गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्था, पुणें, यातर्फे ग्रामीण विभागांत प्रत्यक्ष पाहणीचें काम करीत असतात.


प्रस्तुत या लेख संस्थेतर्फे प्रकाशित होणाऱ्या 'अर्थविज्ञान' या त्रैमासिकावरून येथे पुनर्मुद्रित केला, ( वर्ष तिसरें, अंक चौथा, डिसेंबर १९६१ )

# पुसेगांवचें वैभव






★ शिस्तबद्ध कवाइतीचें नयनमनोहर दृश्य ★



पाहुण्यांना मानवंदना देणाऱ्या कवाइतीचें दृश्य



प्रौढशिक्षणाचें वर्ग, कलापथकें इत्यादी मार्गांनी गांवच्या प्रगतीस हातभार लावणाऱ्या प्राथमिक शाळा शिक्षकांचा गट.

# काव्य-कुंज

★ मधुसूदन घोलप
★ दत्ता कदम
★ विजय सुराणा
★ यशवंत पारखी

## 'वेडा'

लोक म्हणतात मला—
'वेडा'
माझे मला माहीत नाही,
लोकांचे बोल कळत नाहीत
पण....
पण एक शब्द, : एक जहरी बोल—
मनांत सलतो........
मी वेडा—मी वेडा ! !

मी वेडा ?
हो, रसिक वेडा !
सौंदर्याचा...मांगल्याचा.....पावित्र्याचा
गुलाबी गालाचा मी वेडा.....
शराबी ओठांचा मी वेडा......
मी वेडा उच्छृंखलतेचा,
मी वेडा प्रेमाच्या शृंखलेचा !
माझें प्रेम साऱ्या जगावर....
माझी माया साऱ्या धरतीवर;
पण......
पण एकशब्द, एक जहरी बोल—
मी वेडा—मी वेडा ! !

मी वेडा ?
हो, सत्यवेडा !
सत्यासाठी माझा प्राण,
सत्यासाठी माझी तान,
मी सत्याचा पाईक......
मी सत्याचा सैनिक......

मी सत्य बघतो—
पृथ्वीच्या अणुरेणूत,
मी सत्य शोधतो—
मानवांच्या मनामनांत;
पण......
पण एकशब्द, एक जहरी बोल—
मी वेडा—मी वेडा ! !

मी वेडा ?
हो, प्रेमवेडा !
माझें प्रेम अंधाऱ्या आकाशांतील सौदामिनीवर,
माझें प्रेम गहिऱ्या गगनांतील तारांगणावर,
माझें प्रेम तुझ्यावर......
माझें प्रेम माझ्यावर......
माझें प्रेम सगळ्यांवर.....!
पण......
पण एकशब्द, एक जहरी बोल—
मनांत सलतो......
मी वेडा ! मी वेडा ! !

—विजय सुराणा.

## चुकलेला मार्ग सारा

मेघव्याप्त आकाशांत लुकलुके एक तारा,
गर्द काळ्या अंधारांत सुसाटत वाहे वारा
निर्जनशा अरण्यांत, सोबतीला नाही थारा
वेड्यापरी धावतो मी चुकलेला मार्ग सारा !
पोटाचिया आगीसाठी आज येथे आलों नाही,
वित्ताचिया लोभापायी आज वेडा झालों नाही
शरीराची क्षुधा नाही, ईशप्राप्ती नाही नाही
हृदयाची वीणा आज वेगळ्याच तारा छेडी !
कुठल्याशा देवळांत जायचें तें नाही ठावे,
कोणत्या अन् मूर्तीला मी पूजणार जीवेभावें ?
आठवेना कोणते तें भक्तिगीत आळवावें
श्रुती ऐकतात आज, वेगळाच गर्जे नारा !
जीवनाचे सारे छंद तोडियेले मायाबंध
संसाराच्या सुखाचाहि लवंडिला सारा गंध
ऐहिकाच्या व्यापाराला येऊं लागला दुर्गंध
नश्वराच्या वैभवाची तोडावीशी वाटे कारा !
वेड्यापरी धावतो मी चुकलेला मार्ग सारा !

—यशवंत पारखी.

## कुणी करील सजीव

वटवृक्ष मनाचा या
अंतराळीं बहरतो.
कल्पनेच्या पारंब्यांनी
अंतरिक्षा गवसितो.

प्रीत पालवी तयाची
देई गर्द शीतलाई.
स्वप्नांतली स्वप्नें पाही
भाव-देह तया ठायीं.

वंचनेच्या तक्षकाने
केला अवचित डंख.
व्यवहारी जाणीवेंत
मनो-वृक्ष होई खाक.

वेडी आशा ठेवी परी
स्मृति-रक्षा संभाळून.
कुणी करील सजीव
वृक्ष पुन्हा राखेतून !

—मधुसूदन घोलप.

## अशांत शांती

अशांत शांतीचें दीवाणें हास्य
अुठते चित्कारुन देशादेशांतुन
आवरपिढ्यांच्या सुखदुःखाचें लास्य
अुगवतें थडग्यावरच्या कोंबांतुन
अवसेच्या समेला कडाडून आक्रोशतो
वेताळांचा वाली.
घालतो धाक नि मागतो भक्ष...
श्रद्धेची अवलाद करते वायदा अुद्यांचा
आणि विवेकाचा कायदा मरतो फायद्याचा
टिळा लावुन;
मूळामूळांतली क्रांती जाते गाभटून
येशूशिवाय क्रूस होतो अमर
मणक्यामणक्यांत नुरतो समर.....

—दत्ता कदम.

# दिग्दर्शक श्री. अनंत माने



व्ही. जी. नमाडे

तसे मी अनंत मान्यांना गेली एकोणीस वर्षें ओळखतों. १९४२ सालीं मीं प्रभातमध्ये प्रवेश केला तेव्हा माने प्रभातच्या संकलन विभागांत श्री. व्ही. शांताराम यांचे संकलन–मदतनीस म्हणून काम करीत होते. त्या वेळीं प्रभातच्या संकलन–खात्याचे प्रमुख दुसरेच कुणी होते आणि मान्यांची संकलन-खात्यांतील श्रेणी अगदीच दुय्यम दर्जाची होती.परंतु चित्रांचें संकलन करीत असतां श्री. शांतारामांना माने निष्ठेने भक्तिपूर्वक साहाय्य करीत असत. श्री शांताराम हे जसे उत्कृष्ट दिग्दर्शक तसेच उत्कृष्ट संकलक आहेत. किंबहुना शांतारामांच्या चित्रांना अभिजात कलापूर्ण आकार येतो तो संकलन विभागांतच ! अशा महत्त्वाच्या कार्यविभागांत निष्ठेनें आणि भक्तीनें सहाय्य करणारे माने व्ही.शांताराम ह्यांचे आवडते मदतनीस होणें, त्यांनी मान्यांनी श्रद्धेनें केलेल्या सेवेचें कौतुक करणें हे अनायासेच आले !

## एकोणीस वर्षांपूर्वीच्या मान्यांचें चित्र

आजहि माने श्री. व्ही शांताराम यांच्या केवळ आठवणीने नतमस्तक झाल्यासारखे आढळतात. शांतारामबापूंच्या आभिजात निर्मितीबद्दल, त्यांच्या कष्टसाध्य चित्रनिर्मिबद्दल आजहि मान्यांना नितांत आदर वाटतो. किंबहुना चित्रनिर्मितीशी संबंधित जें कांही गुणावगुण मान्यांचें अंगी असल्याचें आढळतात. त्यांवर श्री व्ही. शांताराम यांच्या व्यक्तिमत्वाची, त्यांच्या कार्यपद्धतीची रेखीव अशी छाया पडली असल्याचें स्पष्ट दृष्टोत्पतीस येतें. त्या दृष्टीने पाहिलें तर शांताराम हे मान्यांचे चित्रव्यवसायांतील आद्यगुरु आहेत असें म्हणणें संयुक्तिक ठरेल !

प्रभातमध्ये १९४२ सालीं संकलन–मदनीस म्हणून वावरणाऱ्या मान्यांचें चित्र डोळ्यासमोर उभें राहिलें म्हणजे ‘कालाय तस्मै नमः’ ही उक्ती सहजच मनांत घोळूं लागते. एकतर कुणाचेंहि सूक्ष्म-निरीक्षणात्मक लक्ष वेधावें असें त्या काळच्या मान्यांच्या व्यक्तिमत्त्वांत कांहीच नव्हतें. प्रभातच्या त्या काळच्या चारशे कर्मचाऱ्यांतील कुणीतरी एक एवढेंच त्या वेळीं मान्यांचें स्थान होतें.त्या काळीं मान्यांचा पोषाख एक साधा सदरा आणि दोन काच्याचें नीटस नेसलेलें धोतर असा असे. चित्रांचें संकलन हा नेहमी कंटाळवाणा आणि कामाच्या वेळेचा आणि नियमितपणाचा मोजमाप नसणारा कार्यप्रकार आहे. विशेषकरून चित्रपटांचें शूटिंग संपलें म्हणजे संकलकांचें खरें काम सुरू होतें आणि चित्रप्रकाशित होईपर्यंत अव्याहतपणें अहोरात्र जेवण अथवा झोप गौण समजून संकलकांचें काम सुरू असतें आणि अशा परिस्थितींत जागेपणी संकलकांना वावरतांना पाहिलें म्हणजे बरेच दिवस अंघोळ न केलेले, केस न विंचरलेले, तेच तेच कपडे दिवसानुदिवस घालणारे संकलक पाहतांना त्यांची कींव येते. अशीच किंचितशी कींव मान्यांकडे त्या काळीं पाहतांना मला आल्याची एक पुसट छाया माझ्या स्मृतिपटलावर आहे. त्या काळची मान्यांची बोलभाषा देखील शुद्ध कोल्हापुरीच नव्हे तर त्यांतलीहि अशुद्ध. विशेषकरून ‘ण’ च्या ठिकाणी ‘न’ आणि ‘न’ च्या ठिकाणीं ‘ण त्यांच्या शब्दप्रयोगांत अचूकपणें येई. एक गमतीचा प्रकार होता. श्री. शांतारामांशी प्रभातच्या ‘माणूस’ चित्रपटाच्या संकलनासंबंधीं टेलिफोनवर बोलतांना मान्यांचें संभाषण ऐकून प्रभातनगरमधल्या शुद्ध पुणेरी भाषिकांच्या तोंडून थोडेसें अतिरंजित केलेलें मान्यांच्या तोंडचें विनोदपूर्ण वाक्य “अन्ना मी माणे बोलतोय ! ‘मानूस’च्या णवव्य पार्टाची णिगेटिव्ह कापूण पूर्न झाली” मीं बरेचदा ऐकलेलें आठवतें. आजहि अण्णा माडगूळकर मान्यांबद्दल ‘माणे सुपरिंडेंन्ट, ‘अनंत माणे’ असे केव्हातरी विनोदाने उल्लेख करतांना आढळतात. भाषेप्रमाणेच त्या काळची मान्यांची मन:स्थितीदेखील किंचित् न्यूनगण्डाने पछाडलेली आणि बावळी अशी होती. या पार्श्वभूमीवर आजच्या अद्यावत् विचार करणाऱ्या, शुद्ध मराठी बोलणाऱ्या आणि कलाकारांकडून बोलविणाऱ्या, कथातंत्रांची सयुक्तिक वैचारिक घडण घडविणाऱ्या आणि त्यांचा नाट्यपूर्ण आविष्कार करणाऱ्या आजच्या अद्ययावत् पोषाख करणाऱ्या मान्यांकडे पाहिलें म्हणजे ‘कालाय तस्मै नमः’ म्हणायचें नाहीतर काय ? १९४२ सालचे माने “धाकटी जाऊ” “सांगत्ये ऐका” “मानिनी” सारखी वैचारिक रीत्या भरघोस, भावनात्मक, आणि सुबुद्ध प्रेक्षकांनाहि रुचणारीं चित्रें निर्माण करूं शकतील अशी पुसटशी शंका देखील त्या काळीं

त्यांच्या शारीरिक आणि वैचारिक व्यक्ति-मत्वाकडे पाहून कुणाला तरी आली असती का ?

### आजच्या स्थित्यंतराचें श्रेय

ह्या आमूलाग्र स्थित्यंतराचें श्रेय अर्थातच मान्यांच्या अंगी गाढपणें वसत असलेल्या धैर्य आणि चिकाटी या गुणांनाच आहे १९४२-४३ सालीं मीं पाहिलेले माने त्यानंतर प्रभातमधून अचानकपणें बाहेर पडल्यानंतर माझ्या दृष्टिपथांतून बराच काळ अदृश्य झाले. चित्रव्यवसायांतच ते कुठेतरी अस्पष्टपणें मधूनमधून दिसत होते. ते श्री. दत्तोपंत धर्माधिकाऱ्यांच्या आल्हाद चित्र ह्या संस्थेंत त्यांचे प्रमुख मदतनीस आणि स्वतंत्र दिग्दर्शक म्हणून स्पष्टपणें दृष्टोत्पत्तीस येईपर्यंत ! त्यानंतरच्या काळांत माझी त्यांची नव्याने भेट झाली ती आल्हाद चित्र "सबसे बडा रुपय्या" ह्या चित्राच्या कांही कामानिमित्ताने आणि ते स्वतःच दिग्दर्शन करीत असलेल्या "पायदळी पडलेलीं फुलें" ह्या चित्रपटाच्या निर्मितीच्या निमित्ताने ! त्यांच्या ह्या नव्याने झालेल्या भेटीत मला त्यांची 'आल्हाद चित्र' ह्या संस्थेवरील निस्सीम निष्ठा आणि मराठी चित्रपटव्यवसायाबद्दल वाटणारा प्रगल्भ अभिमान प्रकर्षाने दिसून आला १९४२ सालच्या मान्यांच्या मानाने आता त्यांनी इतरांचें लक्ष वेधावें इतकें स्वतःचें स्वतंत्र व्यक्तिमत्वहि संपादन केलें होतें आणि त्यानंतर त्यांचा माझा प्रत्यक्ष संबंध आला तो मंगल चित्र "धाकटी जाऊ" ह्या चित्राच्या निर्मितीच्या वेळी !

त्यानंतर चेतना चित्र "सांगत्ये ऐका" ह्या चित्राच्या कथाकल्पनेच्या निश्चितीपासून तो चित्राच्या पुण्यांतील १३१ आठवड्यांची पहिली फेरी पूर्ण होईपर्यंत अदमासे चार वर्षे मान्यांच्या व्यक्तिमत्वाचें निरीक्षण मला अगदी जवळ जाऊन करतां आलें अन् माझी खात्री झाली की, १९४२ ते १९६१ अखेर गेल्या १९ वर्षांतील मान्यांच्या व्यक्तिमत्वांतील झालेल्या आमूलाग्र स्थित्यंतराचें श्रेय त्यांच्या मूलतःच अंगी वसत असलेल्या अनेक गुणांना आहे. असें स्थित्यंतर होणें हा योगायोग ठरला तर मान्यांचे गुण निदर्शनास आल्यानंतर त्यांना इतरांकडून अन्तःकरणपूर्वक प्रोत्साहन मिळून माने यशस्वी होण्यापुरताच!

### नाविन्याचा उपासक

तसा माने हा माणूस मोठ्या खुल्या मनाचा आणि प्रांजल असा आहे तसाच प्रसंगवशात् थोडासा परखडहि आहे. परंतु त्यांच्या परखडपणाच्या पार्श्वभागी बरेचदा त्यांचा हेतू केवळ स्पष्टोक्तीचा असतो असें अनुभवान्ती आढळून येते. कथाकल्पनेची रेखाटणी करतांना मान्यांशी वादविवादाचे अनेक प्रसंग उद्भवतात. त्यांचा दृष्टिकोन आपणास पटत नाही अशा वेळी युक्तिवादाने अथवा त्वेषानेहि मांडलेलें आपलें मत "कदाचित् कथाकल्पनेला कलापूर्ण आकार देण्यास बहुमोलाचेंहि ठरेल" अशा भावनेनेच पूर्वग्रहदूषित न होतां अथवा आपल्याच मताला खिळून न बसता माने ऐकतात आणि ग्राह्य वाटताच तशी सपशेल कबूलीहि देतात. कुणाच्याहि कल्पनेंत नाविन्य तरळलें तर माने अशा नाविन्याने प्रभावित होतात आणि त्याचें तोंडभरून कौतुकच करतात. चित्रकथेची उभारणी करतांना तर इतरांच्या कल्पनांना भरपूर वाव देणें आणि त्यांतून चांगलें असे निवडून त्याचा चित्रकथेंत सुयोग्य उपयोग करणें हें मान्यांच्या यशामधील अनेक कारणांतील एक प्रमुख कारण आहे. ही झाली चित्रकथांची गोष्ट ! चित्रकथा प्रगत करतांना कल्पनांची देवाणघेवाण ह्यापलीकडे कांहीच करावे लागत नाही. परंतु प्रत्यक्ष देवघेवीच्या व्यवसायांतहि माने तेवढ्याच खुल्या मनाने वावरतात आणि म्हणूनच ते मनाने प्रांजळ आणि उक्तीने अधिक स्पष्ट असल्याचे अनुभवास येते आणि ह्याच त्यांच्या गुणामुळे चित्रव्यवसायासारख्या जोखमीच्या क्षेत्रांत ते किंचित निडरपणें आणि खेळाडूवृत्तीने वागतांना आणि बोलतांना आढळतात. प्रांजलपणाबरोबरच मान्यांचा मर्यादशीलता हा एक मोठा गुण आहे. मान्यांनी स्वतःभोवती कांही बाबींत स्पष्ट अशा मर्यादा आखून ठेवल्या आहेत. व्यवसायांत अथवा खाजगीरीत्या वागतांना त्या मर्यादेपर्यंत माने आले की, एकदम आडखळतात आणि त्यांचें वागणें आणि बोलणें तेथेच थांबते. अशा तऱ्हेच्या मर्यादा आखतांना मान्यांनी स्वतःच्या अंगी असलेल्या शक्तीचें मोजमाप करून जें आपल्याला पेलणार नाही तें सर्व ह्या मर्यादांच्या बाहेर फेकलेलें आहे आणि त्यावर त्यांचा कटाक्ष एवढा आहे की, ते त्यांना जें पेलणार नाही असे वाटते त्याचा नुसता विचारहि करावयास ते तयार होत नाहीत. उदाहरणार्थ, कथाकल्पनांतील प्रसगांना शब्दांनी फुलविणें ही लहानशी बाब ! कल्पना रेखाटतांना दिग्दर्शक म्हणून प्रेक्षकांच्या दृष्टिकोनांतूनच ते कल्पनेच्या केवळ आकाराकडे बघतात. परंतु प्रसंग शब्दांनी फुलवितांना "तो आपला प्रदेश नाही ज्याचा असेल त्यांनीच करावें" अशा भावनेने ते अगदी निश्चिन्त असतात ते, तोच प्रसंग कलाकारांकडून आवश्यक वातावरणांत प्रभावीपणें वठवीपर्यंत ! तेथे मात्र त्यांच्या सर्व शक्ती मोकाट सुटतात आणि त्यांचें एकंदरीत समाधान होईपर्यंन्त सर्व शक्ती पणाला लावून आकाशपाताळ एक करतात. तीच गोष्ट चित्रपटाच्या व्यावसायिक अंगांची, भांडवलाच्या करारांची, चित्रपटाच्या वितरणाची अथवा प्रदर्शन आणि प्रसिद्धीची ! चित्रपट हातावेगळा झाला म्हणजे जसे कांही मान्यांचें आणि चित्रपटाचें नातें कायमचें तुटतें ! त्यांचे चित्रपट कुठे लागतात ! कोण पाहतात ! त्यांची प्रसिद्धि कशी केली जाते ! त्याबद्दलचे विचार मान्यांच्या मनालाहि शिवत नाहीत.

### काटकसरीच्या चित्रनिर्मितीवर भर

मान्यांची चित्रनिर्मिती आर्थिक दृष्ट्या अत्यंत काटकसरीची असते. त्यांत माने स्वतः उत्तम संकलक आहेत. ह्या अंगाची तर फारच मोठी मदत होते. कथाकल्पना प्रगत

स्वादिष्ट मिठाईके लिये !
शर्मा स्वीट मार्ट
दत्त मंदीरके पास, मार्केट रोड, पूना २.

होतानाच मान्यांच्यांतील संकलक अनावश्यक प्रसंगांची काटछाट करीत असतो. किंबहुना कथेंत महत्त्वाचे प्रसंग कोणते आणि ते चितारावयाचे कसे ह्याची आखणी मान्यांचें अंतर्मन कल्पनेच्या टप्प्यांतच करीत असतें. कथा लिहून पूर्ण झाली म्हणजे माने परत एकदा तिची चित्रणाच्या दृष्टीनें उजळणी करतात आणि आवश्यक भागावर लक्ष केंद्रित करून अनावश्यक भाग कल्पनेंतच कापला जातो. राहिलेल्या आवश्यक भागाच्या चित्रणाची स्थूल आखणीहि ह्याच वेळीं तयार असते आणि उरतें तें फक्त प्रत्यक्ष चित्रण! तें करतांनाहि माने काटकसरीच्या दृष्टीने सुसंगत अशी एक पद्धत अवलंबतात. कथेची नेपथ्याच्या दृष्टीने, वेषभूषेच्या दृष्टीने आणि निर्मितीक्रमाच्या दृष्टीने विश्लेषणात्मक छाननी होते आणि कामाची विभागणी करण्यांत येते. चित्रनिर्मितीच्या प्रत्येक घटकावर त्याचें कार्यक्षेत्र सोपविण्यांत येतें. चित्रनिर्मितीचा कार्यक्रम ठरविला जातो आणि योजनेप्रमाणे अथवा थोड्याफार वेळेच्या आणि खर्चाच्या फरकाने चित्रपट वेगाने पूर्ण होतो. चित्रण सुरू असतांनाहि मान्यांचें सर्व लक्ष कथावस्तूवर केंद्रित झालेलें असतें आणि ती प्रेक्षकमनाला सुबोध व्हावी आणि रुचावी म्हणून माने प्रसंगांना निरनिराळें चित्राकार देण्यांत सदैव मग्न असतात. असें करतांना मूळ कल्पनेच्या चित्रणांत त्यांना सुधारणेच्या दृष्टीने नवीन कांहीं सुचलें तर तें ऐकविण्यासाठी उत्साहाने कुणालाहि शोधत असतात. थोडक्यांत मान्यांची मनःस्थिती कल्पनेच्या आखणीपासून तो चित्रण पूर्ण होईपर्यंत कथाविष्काराने संपूर्णपणें पछाडल्यासारखी वाटते.

ह्या सर्व गोष्टीचा परिणाम म्हणजे मान्यांचीं चित्रें अल्पकाळांत अल्पखर्चात-वेळेची वा खर्चाची कोणतीहि नासाडी न होतां सुडौल आकाराने पूर्ण होण्यांत होतो. मान्यांच्या चित्रांचें संकलन फिल्म कॅमेऱ्यातून चित्रण होऊन बाहेर पडतांनाच होतें. उरतें तें फक्त प्रत्येक शॉटच्या सुरवातीचे आणि शेवटचे अनावश्यक भाग कापून ते एकमेकांना जोडणें! मान्यांच्या अनेक चित्रांच्या बाबतींत तर असें घडलेलें प्रत्यक्ष मीं पाहिलेलें आहे की, रोजच्या होणाऱ्या शूटिंगचे प्रिन्टस् न पाहतां चित्रण संपूर्ण झाल्यावरच निगेटिव्ह कापून संपूर्ण चित्राचें प्रिन्ट इतरांबरोबरच त्यांनी स्वतःहि पाहिलेलें आहेत. चित्रव्यवसायांतील तंत्रज्ञांना हें सांगितलें तर त्यावर त्यांचा विश्वासच बसत नाही, असा माझा प्रत्यक्ष अनुभव आहे. कारण कालचें झालेलें चित्रण आज पडद्यावर प्रत्यक्ष पाहून तें बरोबर असल्याबद्दल खात्री झाल्याशिवाय आजचें चित्रण करण्यास लागणारा मनोविश्वास न वाटणें ही चित्रव्यवसायांतील नेहमीचीच रीत आहे. चित्रपटव्यवसायाला आर्थिक नियम लागू होत नाहीत ह्या सर्वसाधारण प्रचलित गैरसमजुतीला मान्यांच्या चित्रनिर्मितीची पद्धत हें एक यथायोग्य उत्तरच आहे.


## एक कुशल नेतृत्व

मान्यांच्या अंगीं वसत असलेला आणखी एक मोठा गुण म्हणजे त्यांचें नेतृत्व! त्या दृष्टीने पाहिलें तर अनंत माने ही एक संस्था आहे असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाही.


★ शेतीच्या विकासासाठी स्लोस्पीड, कोल्ड स्टार्ट, क्रूड ऑईल एंजिन ★

एजंट
मेसर्स
झंवर
अँड
ब्रदर्स
श्रीरामपूर
जि. अहमदनगर

विजय एंजीनसारखें डिझाईन भारतांतील कोणत्याही एंजीनचें नाही.




६।७ हॉ.पॉ. तसेच १०।११ हॉ.पॉ.ची-
आडवी, स्लोस्पीड, कोल्डस्टार्ट वर्षानुवर्षे बीनतक्रार काम देणारी

भारतांतील सर्व प्रांतांचें सरकारांनी तगाईवर मंजूर केलेली

विजय
क्रूड ऑईल एंजीन्स

उत्पादक
शक्ती विजय इंजिनियरींग वर्क्स
कलोल

अहमदनगर, नाशिक जिल्हा एजंटस्
मे. झंवर अॅण्ड ब्रदर्स.
श्रीरामपूर

वि
ज
य
सदैव वापरा

उत्पादक :—शक्ति विजय इंजिनियरिंग वर्क्स, कलोल. ( उ. गुजराथ )

मान्यांच्या भोंवती त्यांच्या तंत्रज्ञ–कलाकार आणि कर्मचाऱ्यांचा एक समूह आहे. ह्या समूहांतील प्रत्येक व्यक्तीचा मान्यांवर गाढ विश्वास आहे. मान्यांच्या कल्पनांना चित्राकार देण्यासाठी ह्या समूहांतील प्रत्येक व्यक्ती निष्ठेने काम करीत असते. बरेचदा तर असें निदर्शनास येतें की, मान्यांचीं चित्रें यशस्वी होऊन आपण केलेल्या श्रमाचें चीज होतें ह्या एका जाणिवेनेच मान्यांचे सहकारी संतुष्ट असतात. माने स्वतःदेखील त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या सुखसोयींची अहर्निश जाणीव बाळगतात. त्यांच्या चरितार्थ-साधनांत खंड पडूं नये म्हणून इतरांचीं चित्रें निर्माण करीत असतात अथवा स्वतःचीं चित्रें उभारीत असतात. उद्देश एवढाच की, येन केन प्रकारेण चित्रनिर्मिती अव्याहत सुरू राहून मान्यांवर अवलंबणाऱ्या कर्मचाऱ्यांचें केवळ वेतन तरी सुटावें! ही झाली त्यांच्या समूहांतील कर्मचाऱ्यांची गोष्ट! परंतु मान्यांच्या चित्रनिर्मितीसाठी ह्या समूहा-बाहेरील कुणाचेंहि सहकार्य आवश्यक वाटलें तर तें सहसा नाकारलें जाणार नाहीं अशीच मान्यांची बाहेरहि वागण्याची रीत आहे आणि म्हणूनच मान्यांच्या चित्रांना सहसा कांही कमी पडल्याचें आढळत नाही.

परंतु माने जेवढे व्यवहारांत प्रांजळ आणि वागणुकींत कनवाळू आहेत तेवढेच आवश्यक दर्जाचें काम घेण्यांतहि कडक आहेत. काम करून घेण्यांत ते दयामाया मुळीच ठेवीत नाहीत. ते स्वतः अत्यंत वक्तशीर आहेत. कोणत्याहि बाबतींत त्यांनी दिलेली तारीख आणि वेळ सहसा चुकत नाही आणि इतरां-कडूनहि ते तीच अपेक्षा करतात आणि ह्या त्यांच्या अपेक्षेचा केव्हा केव्हा इतका विपर्यास होतो की, त्यांतून स्वयंस्फूर्तीने आणि प्रेरणने शब्दरचना करणारा लेखक अथवा अनिर्बंध-पणें कल्पनाविष्कार करणारा कवीहि सुटत नाही आणि म्हणूनच अण्णा माडगूळकरांसारखे थोर अभिजात कवीहि त्यांना "माणे सुपरिंडेन्ट" असे कौतुकानें संबोधतात.

## चिंतनशील दिग्दर्शक

कथा वस्तूंतील तात्त्विक घडणीच्या बाब-तींत मान्यांची भूमिका "आपणाला त्यांत कांही फारसें कळत नाही" अशी मर्यादित असते किंबहुना कथावस्तूचें तात्त्विक अंग विचारवन्तांनीच ठरवावें अशी ते अपेक्षा करतात आणि त्या दृष्टीनें त्यांना भरपूर वावहि देतात. परंतु प्रत्यक्ष अनुभव असा येतो की, मान्यांच्या तात्विक विचारांनाहि एक रेखीव असा आकार आहे आणि मान्यांवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें झालेल्या संस्कारांची त्यावर सुस्पष्ट अशी छाया आहे. तसा माने हा माणूस सुशिक्षित मुळीच नाही. सहजगम्य वाचन आणि तेहि फक्त मराठीतूनच! हा त्यांचा उरल्या-वेळेतला छंद आहे. प्रदर्शित झालेला प्रत्येक चित्रपट ते कटाक्षाने न चुकतां पाहतात. त्यांची स्मरणशक्ती चांगलीच आहे. चांगल्या काव्यांची, ललितवाङ्मयाची आणि भाषेच्या मांडणीची त्यांना ओढ आहे. त्यांच्या मनाची पकड घेणारें एखादें काव्य,अथवा शब्दाविष्कार ते कौतुकाने पण अचूकपणें घडघडा तोंडपाठ असल्यासारखे सांगत असतात. भोवतालच्या जीवनात घडणारे प्रत्यक्ष प्रसंग त्यांच्या मनाचा सारखा वेध घेत असतात आणि त्याना प्रतिकृत करीत असतात. कुटुंबांतील, माणसामाणसांतील संबंधांचें व्यवहारांचें ते नेहमी सूक्ष्म निरीक्षण करीत असतात आणि त्यावर विचार करीत असतात. आणि हें त्यांचें स्मरण प्रत्यक्ष निरीक्षण-आणि त्यांवरील त्यांच्या व्यक्तिगत प्रतिक्रिया त्यांच्या चित्रकथांतील प्रसंगांना वास्तविकतेचें स्वरूप देण्यांत फार मोठी मदत करतात. आणि ह्या सर्व मंथनांतून जीं तात्विक अनुमानें सहज-रीत्या निघतात तीं मान्यांच्या स्वतःच्या अशा तात्त्विक विचारांना आकार देतात. आपण स्वतः मोठे तत्त्वज्ञ आहोत असा अट्टाहास माने कधीच धरीत नाहीत.

## भारतीय संस्कृतीचे अभिमानी

माने स्वतः पौर्वात्य संस्कृतीचे अभिमानी आहेत. पाश्चिमात्य संस्कृती आपल्या वैचा-रिक पिंडाशी एकतान होऊं शकत नाहींत, त्याचें स्वरूप स्वैराचाचें, बंडखोरीचें आहे असा त्यांचा आक्षेप आहे. त्याच्याच उलट आमच्या संस्कृतींतील संयमाची, प्रेमाची आणि निष्ठेची शिकवण माणसाचें जीवन निर्मल, आनंदी आणि पूर्णपणें सुखी करण्यास समर्थ आहे असा त्यांचा विश्वास आहे. मान्यांनी निवडलेल्या अथवा स्वतःकल्पिलेल्या कथासूत्रांत त्यांतील पात्रांच्या वागण्या-बोल-ण्यांत आणि कथेतून एकंदरीतपणें निघणाऱ्या अनुमानांतून हा त्याचा विश्वास प्रकर्षानें आढळतो. तो इतका की, माने विचारांनी गतानुगतिक आहेत का? अशी त्यांची चित्रें पाहणाऱ्यांच्या मनांत सुस्पष्ट अशी शंका उभी व्हावी! प्रत्यक्ष निरीक्षणान्ती ती नुसती शंकाच ठरते. कारण प्रचलित रूढींत बदल अथवा तिच्या विरुद्ध बंडखोरी करावयासहि माने सहज तयार होतात. अर्थातच असे बदल आमच्या संस्कृतीनीं घातलेल्या विश्व-प्रेमाच्या मर्यादांतच व्हावे, असा मात्र त्यांचा आग्रह असतो.

(पान ४० कॉलम ३ वर)

व्ही. जोशी ॲण्ड को.
ब्लॉक मेकर्स
ॲंड
आर्ट प्रिंटर्स
शनिपार नजीक, शेवडे बोळ, पुणें २

– पांढरे डाग –
अनेक बक्षिसें व हजारो अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किं. ६ रु. पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं
★ नकली वैद्यांपासून सावध राहावें ★
वैद्य– बी. आर. बोरकर
आयुर्वेद भुवन,
मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला (महाराष्ट्र)

# सर्वसामान्य प्रेक्षकाच्या दृष्टिकोनांतून

# ' मानिनी '

— पंडित मांडके

एकदाच वाचल्यानंतर एखादी कथा मनावर कायमचा ठसा उमटवून जाते; मराठी भाषेंत अशा कथा फार थोड्या आहेत. त्यांतली शास्त्रीबुवांची ही एक कथा. त्यामुळे साहजिकच अशा प्रभावी कथेचा रुपेरी पडद्यावरील आविष्कार पाहावयास जातांना अपेक्षा उंचावलेल्या होत्या. डोळ्यासमोर सखारामाचें लग्न दिसत होतें-लाजाहोमाचे वेळीं तो मालतीचें पत्र वाचीत आहे-वाचतां वाचतांच धुरापेक्षाहि अस्वस्थ करणाऱ्या भावनांच्या ऊर्मि उरीं दाटल्या आहेत. त्यामुळे डोळ्यांतून पाण्याच्या धारा लागलेल्या दिसूं लागल्या अन् त्याच वेळीं शेजारी बसलेली नववधू त्याला विचारीत आहे, "ह्या वन्सं लग्नाला कां नाही आल्या ?" पुढचंच दृश्य तरळूं लागलं-सखाराम बायकोला घेऊन मालतीच्या गांवीं निघालेला आहे-व जातां जातां शास्त्रीबुवांच्या कथेंतील हळूवार भावना सुस्पष्ट होत जाताहेत. ह्या एका अवर्णनिय अशा मनाच्या अवस्थेंत मीं चित्रपटगृहांत पाऊल टाकलेलं आहे. पडद्यावरील पहिल्याच प्रसंगाला भयंकर क्रूरतेने सुरुवात झालेली आहे. मध्यमवर्गीय कुटुंबांतील लग्नाचा सोहळा इतक्या भयंकर स्वरूपाचा असूं शकतो हें पाहिल्यावरच पुढच्या साऱ्या प्रकाराची कल्पना आली व मन अस्वस्थ झालें. लग्नाच्या अनेक तऱ्हा आपण पाहिलेल्या असतात; स्वतःच्या कुळापेक्षा कमी दर्जाच्या घरांत (एकट्या नवऱ्याच्या घरांतसुद्धा) आईबापांचा विरोध सोसून तडफेनं निघालेल्या कन्या मीं पाहिल्या आहेत-इच्छेविरुद्ध का होईना-पण लग्नाचा देखावा करणारे आईबापहि पाहिलेलें आहेत-पण हा प्रकार अगदीच अगाऊ वाटला -कृत्रिम वाटला-त्यांत सधन मध्यमवर्गीय कुटुंबाचा वासदेखील कुठं आला नाही. सबंध चित्राचा सूरच मुळी बेसुर झाला.

शास्त्रीबुवांच्या मानसकन्येचा माधव एकाकी आहे, निर्धन आहे पण तो अगतिक खासच नाही. जणू त्याच्या इच्छेविरुद्ध मालती त्याला लग्नाला सवित करीत आहे व तो एखाद्या सुळावर निघालेल्या जन्मठेपेच्या कैद्यासारखा तिच्यामागून चालला आहे व घरांतली, पण एकाच घरांतल्यासारखी न वाटणारी समस्त प्रजा त्याच्यावर दगडफेक करीत आहे ही भावना उगीचच येऊन गेल्यासारखी वाटत होती.

कसाबसा लग्नाचा सोहळा पार पडल्या-नंतरचा तो प्रसंग. माझी आपली एक कल्पना अशी आहे की, इच्छेविरुद्ध लग्न केलेल्या मुलीला घरांतली मंडळी अगोदर जाम विरोध करीत असावीत; अगदीं शेवटच्या क्षणापर्यंत तिचें मन ते वळवीत असावेत पण एकदा लग्न लागल्यानंतर आशीर्वादासाठी आलेल्या लेकीवर व जांवयावर खेकसणारे आईबाप पाहून मी हैराणच झालों.

अशा तऱ्हेनं मालती-माधवाच्या संसाराची सुरुवात तर झालीच. तरीसुद्धा चित्रकथेतील गलका व गोंधळ कांही कमी होण्याचं चिन्ह दिसेना-सबंध चित्र हें असंच Noisy असणार याची खात्री पटली.

स्वप्नांतसुद्धा न कल्पिलेले सारे सोहाळे पाहण्यास मिळाले-कुटुंबसंस्था किती खोटी दाखवितां येते याचें मूर्तिमंत प्रात्यक्षिकच पाहावयास मिळालें.

सदोष पटकथा व कल्पकतेचा संपूर्ण अभाव असणारे दिग्दर्शक या दोन गोष्टींचा संयोग झाल्यानंतर ज्या कथेचें उत्कृष्ट अन् अजरामर चित्रकाव्य होऊं शकलें असतें-अशा कथेचें जास्तींत जास्त किती भातेरें करतां येतें-याचा उत्कृष्ट नमुना म्हणून ह्या चित्रपटाकडे बोट दाखविण्यास मी कधीच कचरणार नाहीं.

इतके सगळे असून ,नदान मुख्य भूमिका-त्यांच्याबद्दल तरी निदान सहानुभूति वाटावी, वेळप्रसंगी आदर वाटावा व शेवटीं शेवटीं रास्त अभिमान वाटावा-अशा मूळ कथेंतल्या दोन तीन व्यक्तिरेखा-ज्यांच्यातून हीं रेखाचित्र साकार व्हावयाचीं त्यांची निवड तरी जरा यापेक्षा चांगली हवी होती-मालती-माधव-सखाराम.

जयश्री गडकर ह्या जाणत्या अभिनेत्री असतीलहि. थोडयाफार अनुभवानंतर त्यांच्या कामांत सहजता आल्यासारखी वाटतेहि-पण मनाला कितीहि पटवून सांगितले तरी ती मालती वाटत नाही व मानिनी तर नाहीच नाही. नववधू म्हणून तिला स्थानिक चित्रपटांत पाहाण्याइतके मन अजून निगरगट्ट होत नाहीं. त्यांना पटकथेंतील मानिनी समजली असेल पण शास्त्रीबुवांची ही मानसकन्या त्यांच्या मनांत सामावली गेल्यासारखी वाटत नाही.

माधव-अर्थात् चंद्रकांत गोखले-अर्थात् एक शाळामास्तर-अर्थात् एक समाजसुधारक अर्थात् एक निरुपद्रवी प्राणी-ह्यांच्याबद्दल काय लिहावे ? लग्नानंतर नववधूशी एकांतांत सलगी करतांनासुद्धा ज्याच्या तोंडावरील आश्रिततेची झांक ठळकपणें दिसून येते-तो हा माधव. शास्त्रीबुवांनी अत्यंत अबोल ठेवूनसुद्धा जी व्यक्तिरेखा मालतीपेक्षाहि मनावर जबरदस्त पगडा ठेवून जाते व ज्याच्या व्यक्तित्वांत मालतीचें मानिनींत रूपांतर होतें-तो हा माधव-पडद्यावरील माधवाने शास्त्रीबुवांच्या कथेचा नव्हे तर चित्रपटाचा कणाच मोडून टाकला आहे. कामासाठी त्याची निवड ज्यांनी केली त्यांच्या कल्पनाशक्तीला त्रिवार वंदन !

आणि या दोहोंपेक्षाहि ज्या सहृदयतेने थोडक्यांतच रंगविलेला पण आपल्यासमोर सदैव रेंगाळत रहाणारा मूळ कथेतला सखाराम.

कथा याच्यापासून सुरू होते–याच्यावरच संपते–व दिसत नसला तरी सुद्धा ज्याचें अस्तित्व सदैव पार्श्वभूमीवर जाणवावे असा हा सखाराम! सबंध घरांत ज्याला एकट्यालाच मालतीबद्दल (व ओघाओघाने माधवाबद्दलहि) सहानुभूति, आपुलकी, जिव्हाळा सारं कांहीं वाटत तो हा सखाराम–की, त्यानेंसुद्धा तोंड टाकल्यावर मालती हृतबुद्धच होते–तो हा सखाराम! रमेश देव नांवाचा एक नट–भूमिकेची समज या माणसाला आतांपर्यंत कोणत्याच चित्रपटांत आल्यासारखी वाटली नाहीं. याच्याबद्दलच्या माझ्या अपेक्षा फक्त एकाच चित्रपटाने खूप वाढल्या होत्या ('देवघर' चित्रपटांत बरें काम केलें होतें बिचाऱ्याने का सगळेंच श्रेय दिग्‌दर्शकाला?) पण नंतरच्या प्रत्येक चित्रांत त्या साफ ढासळल्या गेल्या.

इतरेजनांबद्दल काय लिहावें?

या चित्रपटांतील सर्वांत मोठा दोष म्हणजे सारेच जण बोलतात, फार फार बोलतात. इतके की, पांच मिनिटांच्या शांततेसाठी जीव कासावीस होतो व म्हणूनच प्रथमपासून शेवट-पर्यंत चित्रपट फार खोटा वाटतो. कुणाबद्दलच कणव येत नाहीं. अशा कथा हाताळतांना धीटपणा (boldness) हा एक फार मोठा शाप ठरतो. व हीच एक आमच्या मराठी चित्रपटांत आढळून येणारी उणीव आहे. ज्या भावनांना फक्त हळुवार स्पर्श हवा असतो, ज्या अभिनयाला फक्त मोजकेच शब्द हवे असतात व ज्या प्रसंगांना फक्त वास्तवताच उठाव आणूं शकते. अशांचें दिग्‌दर्शन करणारा समर्थ दिग्दर्शक आमच्यांत नाही ही एक फार मोठी उणीव व जोंपर्यंत ही उणीव भरून येत नाही तोंपर्यंत मराठी चित्रपटांना चांगल्या गोष्टी मिळत नाहीत, हा गहजवहि कुणी करूं नये. निदान यांतले, जरी कांही नसले तरी मध्यमवर्गीय संस्कृतीचें डोळे उघडे ठेवून केलेलें निरीक्षण त्यांच्या भावनांचे स्पष्टास्पष्ट आविष्कार डोळसपणें टिपतां येणें हें सुद्धां पुरे आहे. वाजंत्री, चौघडे, मिरवणुकी, आरडाओरडा, अंत्यविधी त्याचे सोपस्कार (ते सुद्धा पद्धतशीर दाखवितां येत नाहीत.) तो शेवटचा दिवस, ती स्वप्नें, ती भुताटकी या साऱ्या गोष्टींनीं कारुण्याचें हसें होतें–या गोष्टींची जाणीव अजूनहि आमच्या दिग्दर्शकांना झाली नसेल तर नशिब आम्हा प्रेक्षकांचें!

कै. बहिणाबाईंच्या ओव्या व गाणीं व कवि माडगूळकरांचीं गीतें हें एकुलतें एक या चित्रपटाचें आकर्षण! पण त्याचासुद्धा अतिरेक वाटतो. पहिलेंच गाणें. (नव परिणीत वधू वर फिरावयास गेले असतांना ज्याठिकाणी कल्पनेचें दारिद्र्य एक आण्यापर्यंत येऊन पोचलें आहे (तिथले) अप्रासंगिक वाटतें व त्याच गाण्यांतील एके ठिकाणीं कॅमेऱ्याने एक घृणास्पद दृश्य टिपलें आहे. गाणाऱ्या मुलीच्या पार्श्वभूमीवर कॅमेरा रोखून पहात आहे व कोपऱ्यांत मालती माधवी अडगळीसारखें बसविलेले दिसतात. कॅमेऱ्याचा आणखी एक दुरुपयोग जाणवतो तो तर किळसवाणाच आहे. अवघडलेली मालती नवऱ्याच्या डोक्यावर कणसाची टोपली देते तें दृश्य–सामाजिक चित्रपटांत असली अभिरुची निंदनीय आहे. बाह्य दृश्यांचें छायाचित्रण ही एक आल्हाद-दायक बाब! असो. त्यानंतरचे एक मुलाला दूध पाजतानांचें गाणें–अस्थानीं वाटतात. चित्रपटांत किंचित् समाधानाची बाजू ही एवढीच!

मूळ कथेशी प्रामाणिकपणा ठेवून फक्त संप्रग शब्दांनीं भरले असते तरीसुद्धा चित्रपट इतका कंटाळवाणा झाला नसता! अर्थशून्य संवादासाठी प्रसंगांची पेरण केल्यासारखी वाटते "सारखं रडल्यानें माणसं मरतात का हो बाबा?" ही पृछा करणारी ५–६ वर्षांची बेबी इतका निर्बुद्ध संवाद मीं आजपर्यंत ऐकला नाहीं. बालमानस शास्त्रातील नविन अध्याय असल्यास नकळे! ज्या कथेत मोजक्याच व्यक्तींचें अस्तित्व परिणामकारक ठरावें त्याच ठिकाणी ही खोगीरभरती मूळ कथेला हानिकारक ठरते.

......अनंत माने हे ग्रामीण चित्रपटांचे हातखंडा दिग्दर्शक आहेत असा एक बोलबाला आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शनाचा विचार करितांना आपण एक सामाजिक चित्र करीत आहोत याचा विसर पडलेला दिसतो त्यांना. नाहीपेक्षा चित्र जरा सुसह्य झाले असते. कुठेहि कल्पकता नाही, हळुवार हात नाही व मराठीतील एक अत्युत्तम अशी भावस्पर्शी कथा आपण पडद्यावर आणतो आहोत, याची प्रचिती दाखविणारें एखादें जरी दृश्य दिसलें असते तरी या जाणिवेचा स्पर्श त्यांना झाला आहे अशी खात्री वाटली असती.

प्रथमपासून शेवटपर्यंत चित्रपट मनस्वी कंटाळवाणा व खोटा वाटतो. एवढेंच एक वैशिष्ट्य!

निदान 'मानिनी' हें नांव नको होतें व लेखकाचें नांव महादेवशास्त्री जोशी हें तर अजिबातच नको होतें. म्हणजे विचार करण्याचें कारणच नव्हतें.

जातां जातां एक गोष्ट मात्र प्रकर्षानें पटली. ती म्हणजे मराठी भाषेत चांगल्या कथांना वाण नाहीं. आहे फक्त कुशल पटकथा लेखकांची व त्याहिपेक्षा कुशल व समर्थ दिग्दर्शकांचीच!!!

● ●


(पान ३८ वरून)

आविष्कारांतील नाट्यपूर्णतेवर माने त्यांच्या चित्रकथांतून फार अवलंबून असतात. कधीकधी त्यांचा हा नाट्यपूर्ण आविष्कार अतिरंजितपणाचेंहि स्वरूप धारण करतो. एखादा प्रसंग अथवा त्यांतील सूक्ष्म विचार माने त्यांच्या चित्रांतून प्रेक्षकमनांवर खारखा आदळत असतात. त्यांचें असें करणें एखाद्या चित्रपटाच्या सुटसुटीत आणि सुबोध अशा घडणींत अडथळा निर्माण करतें असा त्यांच्या अनेक सहकाऱ्यांचा आक्षेप असतो. परंतु माने तसे बुद्धिपुरःसरपणें आणि अट्टाहासाने सहकाऱ्यांच्या विरोधाला न जुमानतां करीत असल्याचे अनुभवास येते. ह्याला कारण माने असे सांगतात की, चित्रपट हा चार सुबुद्ध प्रेक्षकांकरितांच फक्त निर्माण होत नाही. बहुसंख्य प्रेक्षक कथावस्तूंतील पात्रांच्या चित्रपटांतील संवादातील आणि व्यवहारांतील कथावस्तू सुबोध होण्यासाठी आवश्यक टप्पे अथवा बारकावे सहजासहजी समजून त्यांतून निर्माण होणारा बोध अथवा आनंद चटकन् उचलण्याएवढा प्रबुद्ध नाही. त्यांच्या मतें सर्वसाधारण प्रेक्षक संसाराच्या अडगळींत सदैव अडकलेला असतो आणि विरंगुळा म्हणून चित्रपट पहावयास येतो आणि त्याला विरंगुळा देण्याच्या उद्देशानें त्याच्या मनाची पकड कथावस्तू धरण्यास असमर्थ ठरली तर चित्रपट निर्मितीचे सर्व श्रम फुकट जातात, तसे न होऊं देतां कथावस्तू सुबोध होण्याच्या दृष्टीने आवश्यक असे कांही टप्पे जर थोडासा अतिरंजिततेचा दोष पत्करूनहि प्रेक्षकमनांवर ठसविण्याचा प्रयत्न केला तर प्रेक्षकाला चित्रकथा सहजपणें समजून तो देणाऱ्या मूल्याची भरपूर किंमत त्याला मिळाल्याचें श्रेय घेतां येतें.

अनंत माने हा कलावंतच असल्यामुळे स्वतःच्या कुटुंबाला नेहमी पाहुण्यासारखा वाटतो. कुटुंबप्रमुख असूनहि कलाविष्काराच्या वेडांत त्यांना त्यांच्या घरांतील जबाबदाऱ्यांची जाणीव कधीच नसल्याचे दिसते आणि म्हणूनच की, काय कोण जाणे सौ. माने. कुटुंबप्रमुखाच्या सर्व जबाबदाऱ्या योग्यपणें पार पाडावयास समर्थ झाल्या असाव्यात. कारण माने घरांत असले अथवा नसले तरीहि मान्यांच्या घरांत नेहमी सुख आणि समाधान पुरेपूर वावरतांना आढळते. मान्यांचे घरीं तुम्ही त्यांच्या अपरोक्षहि गेलांत तर तुमची आस्थेने विचारपूस होईल आणि आदरातिथ्यहि होईल. त्यांचा लहानसाच संसार टापटिपीनें मांडलेला पाहून आणि सौ. मान्यांचें आतरातिथ्य अनुभवून कुणालाहि मनस्वी समाधान होईल. ● ●


# बायकोचा भाऊ

'बायकोचा भाऊ' मध्ये राजा परांजपे आणि रंजना



बऱ्याच वर्षां नंतर एका इरसाल भूमिकेंत राजा परांजपे !

सुरेलचित्र ही राष्ट्रपति पदक विजेते माधव शिंदे यांची मान्यवर चित्रसंस्था. श्री. माधव शिंदे यांनी आजवर 'शिकलेली बायको' 'कन्यादान' वगैरेसारखीं सोज्वळ चित्रं सादर करून राजदरबारी आणि लोकदरबारीं मान्यमान्यता मिळविली आहे. याच संस्थेचा 'बायकोचा भाऊ' हें नवीन चित्र असल्यामुळें त्यावद्दल थोडं विशेष कुतूहल वाटत आहे आणि ते योग्यच आहे. या नव्या चित्रपटाचीं तीन वैशिष्टचें प्रामुख्यानं नजरेंत भरण्यासारखीं आहेत. पहिलं म्हणजे 'बायकोचा भाऊ' या चित्रपटाची गोष्ट लिहिली आहे नांवाजलेले नाटककार श्री. बाळ कोल्हटकर यांनी 'दुरिताचें तिमिर जावो' आणि 'वेगळं व्हायचंय मला' 'एखाद्याचं नशीब वगैरे एकापेक्षां एक सरस नाटकं लिहून त्यांनी प्रेक्षकांत वेगळाच अपेक्षा निर्माण केल्या आहेत आणि म्हणूनच त्यांची कथा पटकथा संवाद गीतें हें या चित्रांत एक प्रमुख वैशिष्टच म्हणता येईल. दुसरी गोष्ट म्हणजे या चित्रपटाचं दिग्दर्शन ! या चित्राचे दिग्दर्शन केलं आहे- श्री. माधव भोईटे यांनी. श्री. माधव भोईटे हे या सृष्टींत १९४६ पासून सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम करीत आहेत. त्यांच्या तपश्चर्येचं योग्य चीज श्री. माधव शिंदे यांनी केले म्हणून यांचंहि अभिनंदन करणें भाग आहे. कारण सहाय्यकाला स्वतंत्र संधि देण्याचं धाडस या मराठी चित्रपटसृष्टींत तरी आगळंच म्हणावं लागेल. ही नवीन जबावदारी श्री. भोईटे यांनीं उत्कृष्ट रीतीने पार पाडली आहे असा अभिप्राय नुकत्याच झालेल्या खाजगी ट्रायलनंतर जाणकारांनीं व्यक्त केला आहे.



'बायकोचा भाऊ' मध्ये सूर्यकांत आणि रंजना

तिसरं वैशिष्टच म्हणजे महाराष्ट्राचे ख्यातनाम नट राजाभाऊ परांजपे यांची अगदी वेगळ्या पद्धतीची भूमिका. आजवरच्या आपल्या भूमिकापेक्षां ही विशेष भूमिकां आहे असं स्वतः राजाभाऊंचं मत आहे.

असं हें वैशिष्टचपूर्ण चित्र पुरं झालं असून मुंबईच्या नवचित्र फिल्म एक्श्चेंज या संस्थेंतर्फे महाराष्ट्रांत नवीन वर्षाच्या दुसऱ्या आठवड्यांत प्रकाशित होईल.

( पान ८ वरून )

जागा आहे असें मानलें तरी पंचशील करार धाब्यावर बसवून आणि विवाद्य प्रदेशांत आपलें लष्कर घुसवून लष्कराच्या बळावर चीनने मुलुखगिरी चालविली आहे. ती आक्रमण ह्या संज्ञेस पात्र आहे की नाही ह्याबद्दल निदान कम्युनिस्टांच्या मनांत तरी संदेह अथवा संभ्रम असण्याचें कारण नाही. चीननें भारताचा १०० X १२० इतक्या चौरस मैलांचा प्रदेश व्यापला ह्यापेक्षा चीनने भारताच्या परराष्ट्रीय धोरणाच्या पायावर प्राणघातक हल्ला चढविला हाच चीनच्या आक्रमणाचा व चीनच्या आक्रमक व युद्धखोर धोरणाचा पुरावा होय. दक्षिण व आग्नेय आशियांतील लहानमोठ्या नवस्वतंत्र राष्ट्रांना भारतांपासून अलग करून समाजवादाचा लढा लढविण्याचें चीनने स्वीकारलेलें धोरण हा चीनच्या आक्रमक प्रवृत्तीचा दुसरा पुरावा होय. ज्या तत्वानुसार चीनने नेपाळबरोबरचा सीमावाद मिटविला त्याच तत्त्वानुसार भारत व चीन ह्यांच्यामधील मिटविण्यांत सीमावाद यावा अशी भारताची मागणी असतांना चीनने भारताविरुद्ध मुलुखगिरीचें धोरण चालू ठेवावें ही घटनादेखील चीनच्या युद्धखोर व आक्रमक धोरणाचीच द्योतक होय.

जागतिक राजकारणांतील ज्या दोन निर्णायक समस्यांचा अथवा संघर्षक्षेत्रांचा उल्लेख वर केलेला आहे त्यांच्या संदर्भात हिंदी कम्युनिस्ट नेत्यांनी चीनच्या सीमाविषयक धोरणाचा खोलवर विचार केला असता तर चीनच्या आक्रमणाबाबत त्यांना प्रथमपासून कणखर, स्पष्ट व नि:संदिग्ध भूमिका घेतां आली असती. चीनच्या सीमाविषयक धोरणाचा पाठपुरावा कम्युनिस्ट पक्षांतील रणदिवे गटाने दीर्घकाल करावा यांत आश्चर्य नाही. कारण भारतांतील सत्तेचें वर्गीय स्वरूप, भारत सरकारचें परराष्ट्रीय धोरण ह्याबाबत रणदिवे गटाचा दृष्टिकोन चीनच्या नेत्यांच्या दृष्टिकोनाशी तंतोतंत जुळणारा आहे. त्याच्या उलट अजय घोष आणि डांगे यांच्या गटाने या प्रश्नाबाबत लवचिक म्हणजेच केवळ संधिसाधूपणाची भूमिका प्रथमपासून घेतलेली होती व अजूनहि त्या गटाची तीच भूमिका आहे.

जो भूप्रदेश विवाद्य आहे त्या प्रदेशांतून चीनने आपली सेना काढून घेतल्याशिवाय व सीमाप्रश्नाचा निकाल वाटाघाटींनी व शांततेच्या मार्गांनी लागेपर्यंत त्या भूप्रदेशांत कोणत्याहि प्रकारच्या लष्करी हालचाली न करण्याचें आश्वासन दिल्याशिवाय चीनबरोबर राजकीय पातळीवर वाटाघाटी होणें शक्य नाही अशी स्पष्ट भूमिका हिंदी कम्युनिस्ट पक्षानें आपल्या निवडणूक-जाहिरनाम्यांत अजूनहि घेतलेली नाही.

## गटबाजीला अधिक चेतना

सीमाप्रश्नाबाबत कम्युनिस्ट पक्षांत चीनच्या धोरणाचा मूलगामी दृष्टीने विचार होत नाही तोपर्यंत ह्याबाबत पक्षाचें धोरण रणदिवे गट विरुद्ध डांगे गट असल्या गटबजीच्या दलदलींत रुतून राहील. १९४८–५० कम्युनिस्ट पक्षाची वाताहात झाली त्या वेळीहि पक्षाच्या धोरणाचा मूलभूत दृष्टीने विचार झाला नाही आणि गटबाजीला सरावलेल्या सत्तालोलुप पुढाऱ्यांनी तसें करण्याचें पद्धतशीरपणें टाळलें. जे काल झालें तेंच आज होत आहे.

प्रत्येक वैचारिक संघर्षांतून पक्षाच्या सामर्थ्यांत भर पडत असते आणि पक्षाच्या नेतृत्वांत उपक्रमशील प्रवृत्तींची व विचार प्रवाहांची वाढ होत जाते. पक्षान्तर्गत लढयाच्या यशापयशाचा तोच खरा निकष होय. हा निकष लावल्यास भारत-चीन सीमाप्रश्नाबाबत पक्षांत चालू असलेल्या संघर्षाचें फलित काय ? तें फलित येवढेच की, ह्या संघर्षामुळे पक्षांतील गटबाजीला व सत्तास्पर्धेला अधिक चेतना मिळाली.

● ● ●


र. नं. १०७९८ ] जय सहकार [ र. ता. ५–४–१९४७

माल तारणावर कर्ज देणें, कार्याची भांडी भाड्यानें देणें, शेतीचीं अवजारें पुरविणें व शेतकऱ्यांच्या मालाची विक्री करून देणारी 'अ' वर्गातील ....

**गणोरे विविध कार्यकारी**

**● सहकारी सोसायटी लि. ●**

ता. अकोले जि. अहमदनगर

● सभासद संख्या २७५ ● शेअर भांडवल ७५,०००

● रिझर्व व इतर फंडस् १०,३०३

● खेळतें भांडवल २,३०,०००

★ सोसायटीच्या मालकीचें ऑफिस ★ गोडाऊन

★ गुळ खांडसारी केंद्र ★

चेअरमन
पंढरीनाद जिजाबा आंबरे (पाटील)

सेक्रेटरी
वि. द. साताळकर

# वार्ता-विचार

## क्रीडा वैद्यक शाखा

शर्यतीचे घोडे हे रेस जिंकण्यासाठीच निवडलेले असतात. त्यासाठी त्यांच्या तंदुरुस्तीची विशेष काळजी घेतली जाते. यासाठी एका तज्ञ पशुवैद्याची खास नियुक्ती केलेली असते. शर्यतीसाठी घोडे तयार ठेवणें हें वैद्यकीय दृष्टचा एक शास्त्रच आहे. परंतु वेगवेगळचा क्रीडा-स्पर्धेत भाग घेणाऱ्यांच्या शाररिक व मानसिक तयारीकडे पुरेसें लक्ष दिलें जातें का ? रशियाने वैद्यक शास्त्राची ' स्पोर्टस् मेडिसन ' ही एक नवी शाखाच निर्माण करून इतर देशांवर आघाडी मारली आहे. क्रीडा-स्पर्धकांवर देखरेख, त्यांचें शारीर-संगोपन, मर्दन, जखमांवर उपाययोजना इत्यादींचा विशेष अभ्यास करून रशिया त्याचा प्रत्यक्ष उपयोग करीत आहे.

स्पर्धकांवर व्यायामाचा काय परिणाम होतो, त्यांची सुप्त शक्ती कशी जागृत करतां येईल इत्यादींच्या शास्त्रीय दृष्टिकोनामुळे आंतर-राष्ट्रीय क्रीडा-स्पर्धेत रशिया पुढे गेला तर नवल नाही. स्पर्धेत भाग घेण्याची संधी मिळाली एवढचावरच संतुष्ट न राहतां पहिला अनुक्रम मिळविण्याची प्रत्येकाने धडपड केली पाहिजे आणि त्याला आवश्यक ती सर्वांगीण पात्रता अंगीं आणायला हवी. या योजनेचा प्रारंभ म्हणून प्रत्येकाने स्वतःच डॉक्टर बनून तयारींत राहण्याचा प्र यत्न करायला हरकत नाही. जागरणें, जड जेवण, धूम्रपान, सिनेमा इत्यादींमुळे आपल्या कितीतरी क्रीडा–स्पर्धकांना पराभूत व्हावे लागले आहे. निदान हे दोष तरी सहज टाळतां येण्यासारखे आहेत.

## नोबेल पारितोषिक आणि राजकारण

बेकायदा ठरविण्यांत आलेल्या आफ्रिकन नॅशनल कांग्रेसचा माजी पुढारी आल्बर्ट लुथुली ह्याला दक्षिण आफ्रिकेच्या सरकारनें अखेर ऑस्लो येथे जाऊन नोबेल शांतता पारितोषक घेण्यासाठी पासपोर्ट मंजूर केला. तो सपत्नीक ऑस्लो येथे गेला. ह्या नोबेल पारितोषकाची रक्कम सुमारें २ लक्ष रुपये भरते, त्या पैशाचें आपण काय करणार, हें ठरवायला अजून वेळ मिळाला नाही, असें त्याने ऑस्लो येथें सांगितलें.

लुथुलीच्याच शब्दांत दक्षिण आफ्रिकेचा इतिहास थोडक्यांत असा सांगतां येईल—" बंद केलेलीं दारें ठोठावण्यांत माझीं तीस वर्षें फुकट गेलीं, हे कोण नाकारील ? माझ्या पदरीं अपयशच आलें आहे. संयमाला फळ काय मिळालें, तर आमचे अधिकार कमी करणारे आणि प्रगतीत अडथळा आणणारे असंख्य नवे कायदे गेल्या तीस वर्षांत दक्षिण आफ्रिकन सरकारनें केले आहेत. आता आम्हांला कांहीच अधिकार उरलेले नाहींत, अशी अवस्था झाली आहे."

अशा परिस्थितींतहि लुथुलीनें पुढचें पाऊल, म्हणजे सशस्त्र चळवळीचा अंगीकार, टाळला आहे, म्हणून त्याला १९६० चें नोबेल शांतता पारितोषक बहाल करण्यांत आलें आहे. लुथुलीला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळण्याचा क्षण आता आला आहे, आणि तोहि युरोपांतून. दक्षिण आफ्रिकेंतील इतर लोकांना दम धरवत नाही; ते सशस्त्र बंडाळीचा विचार करीत आहेत, अशा वेळीं त्यांच्यांतल्या टोळीवाल्या पुढाऱ्याला शांतता पारितोषक बहाल केलें जात आहे, ही घटना खासच अर्थपूर्ण आहे. ह्यामुळे लुथुली गोऱ्या लोकांना पाठिंबा देईल, अशी आशा व्यक्त करण्यांत येत आहे. " मी गोऱ्या माणसाचा द्वेष करीत नाहीं. वर्चस्वाच्या जागीं तो असल्यामुळे त्याचा मानसिक दर्जा खालावलेला आहे; त्याच्याबद्दल मला सहानुभूति वाटते " हे लुथुलीचे उद्गार त्याला नोबेल शांतता पारितोषक कां मिळाले, हें सिद्ध करण्यास पुरेसे आहेत !

अल्बर्ट जॉन लुथुलीचें वय सध्या ६२ वर्षांचें आहे. दक्षिण आफ्रिकेच्या तुरुंगांतील कॉंक्रीटच्या फरशीवर दीर्घकाल निजावें लागल्यामुळें त्याच्या प्रकृतीवर कायमचा दुष्परिणाम झालेला आहे. झुलू जमातीचा प्रमुख म्हणून तो निवडला गेला होता. आफ्रिकन नॅशनल कांग्रेसचा पुढारी झाल्यावर हें पद त्याला सरकारनें सोडायला लावलें. १९५९ सालीं ह्या पदभ्रष्ट हद्दपार केलेल्या पुढाऱ्याला तेथील श्वेत वर्णीयांच्या पार्लमेंटचा एक सभासद भेटायला गेला; त्यापूर्वी दुसऱ्या कुणीहि सभासदानें त्याला बघितलेंहि नव्हते, इतका वर्णभेद तेथे अस्तित्वांत आहे.

★ ★ ★




विश्वनाथ बळवंत वैद्य
संगमनेर, जि. अहमदनगर.

# नवें वाचन

## शांति निकेतन

श्री. गोपीनाथ तळवलकर यांनी कविवर्य रवीन्द्रनाथ टागोर यांचें जीवन प्रतिबिंबित करणारें एकशेसव्वीस पानांचें एक पुस्तक लिहलें आहे. 'शांति-निकेतन' हें अन्वर्थक नांव त्यांनी ह्या पुस्तकाला दिलें आहे. रवीन्द्रांच्या शतसांवत्सरिक समारोहांत श्री. तळवलकर यांनी हें पुस्तक प्रसिद्ध करून औचित्य साधलें आहे. 'शांतिनिकेतन' हा रवीन्द्रांचें जीवन, जीवन-समस्या, जीवन-साधना व जीवन-सिद्धी यांचें दर्शन घडविण्याकरतां केलेला अत्यंत यशस्वी प्रयत्न आहे.

अवघ्या एकशेसव्वीस पानांत तळवलकरांनी रवीन्द्रांच्या तत्त्वज्ञानाचा, साहित्य, काव्य, कथा, कादंबरी, चित्रनृत्य, नाटच, निबंध आणि शिशुसृष्टी इत्यादि साहित्यांगांवर सहृदय चर्चा करून मराठी वाङ्मयांत एका उत्तम ग्रंथाची भर घातली आहे. रवीन्द्रांचें लिखाण म्हणजे एक महासागर आहे. सुमारें १०,००० पानें भरतील एवढे त्यांच्या रचनावलीचे २६ भाग आहेत. या क्षीरोदधीचें मंथन करून नवनीत काढण्याचें कार्य श्री. तळवलकरांनी प्रेममय वृत्तीने केलें आहे. रवीन्द्र समजण्यास एका दृष्टीने अवघडच आहेत. त्यांना विश्वाची झालेली आनंदमय अनुभूति व चहूकडे असलेले प्रेमाचे त्यांना प्रतीत झालेले पाझर नुसत्या बौद्धिकदृष्टया आकलन करणें हें पुरेसें नाही. कवीच्या हृदयाशी तादात्म्य पावणें, त्यांच्या विचारांशी तद्रूप होणें व आपल्याला जें समजलें तें इतरांना निवेदन करणें अत्यंत कठिण आहे. गीता, उपनिषदें व ब्रह्मसूत्रें अत्यंत सोपीं आहेत; पण अनेक भाष्यकारांनी त्यावर भाष्यें लिहून आपल्या प्रतिभा उजळल्या व तत्त्वज्ञानाची संपदा पराकोटीला नेली. श्री तळवलकर भाष्यकार नाहीत. त्यांनी आपल्याला समजलेला रवीन्द्र त्यांच्याच शब्दांत साररूपाने आमच्यापुढे ठेवला आहे. असें करतांना ते कवीचे विचार, भावना वगैरेंशी समरस झाले आहेत.

एका संदर्भांत श्री. तळवलकर म्हणतात, " रवीन्द्र आणि त्यांचें साहित्य यांच्यावरील उत्कट प्रेमांत मी कुणाचेंहि आव्हान स्वीकारूं शकेन असा आत्मविश्वास वाटतो " ह्याच उत्कट प्रेमाने लेखकाला स्फूर्ति दिली आणि मराठी वाचकांना एक अत्युत्कृष्ट ग्रंथ उपलब्ध झाला. मराठी वाचक त्यांचे सदैव ऋणी राहतील.

टागोरांच्या साहित्यांतील कांही निवडक वचनांचा उल्लेख करणें हें या पुस्तकाचें महत्त्व समजण्याच्या दृष्टीने मी आवश्यक मानतों. पान ४६ वर रवीन्द्रांच्या तत्त्वज्ञानासंबंधी लेखक म्हणतात, 'रवीन्द्रांचें तत्त्वज्ञान म्हणजे आनंद, भक्ति आणि समता यांचा त्रिवेणी संगम होय. या संगमाच्या दोन्ही तीरांवर कधीहि न कोमजणाऱ्या सौंदर्याची वनश्री आहे.'

रवीन्द्र म्हणतात, " हे जगता, मी गेल्यानंतर माझ्यासाठी एवढेच म्हण की, याने आमरण प्रेम केलें."

रवीन्द्रांच्या साहित्याविषयीं श्री. त वलकर लिहितात' यासाठीच चित्र आणि संगीत याची जोड साहित्याला पाहिजे. साहित्यांतील चित्र हें रंगरेषांचे नव्हें. त्याचप्रमाणे साहित्यांतील संगीत हें राग रागिण्यांचें नव्हे. चित्र शब्दानेच उभें करायचें. संगीत म्हणजे ताल बद्धता. अलिकडील भाषेंत म्हणजे प्रतिभा आणि लय या साधनांनीच साहित्यिक हा आपल्या हृदयांत उसळत असलेलें सौंदर्य वाचकांपर्यंत पोहोचवतो. चित्रामुळे विचाराला, कल्पनेला आकार मिळतो व संगीताने गति मिळते. रवीन्द्रांच्या मतें,' चित्र म्हणजे शरीर व संगीत म्हणजे आत्मा आहे ' (पृष्ठ ५०–५१)

असे कित्येक इतस्ततः विखुरलेले रवीन्द्रांचे विचार एकत्रित करून मांडतां येतील. श्री. तळवलकरांची भूमिका नुसती सहृदयतेने वाचन, चिंतन, मनन व उपन्यास करणाराची नाही. त्यांनी अत्यंत परिश्रम करून रवीन्द्रांच्या वाङ्मयाचा ओझरता परिचयहि करून दिला आहे. भाषासौंदर्य, सुश्लील मांडणी, समयोचित विवरणें व साहित्याचा अभ्यास या सर्वांमुळे हा ग्रंथ आदर्श ग्रंथ झाला आहे. पुस्तक खाली ठेवतांना श्री. तळवलकरांनी लेखणी आवरती कां घेतली याची चुटपुट लागते आणि जिज्ञासा प्रज्वलित होते. श्री. तळवलकरांना सल्ला देणारा मी कोण ? पण रवीन्द्रांचा जो थोडा-फार अभ्यास मीं केला आहे त्यावरुन मी त्यांना विनंती करीन की, यापेक्षा मोठा, चौपट मोठा ग्रंथ लिहिण्याची प्रेरणा त्यांच्या रवीन्द्र–प्रेमावरील उत्कटतेने त्यांना लाभो.

श्री. तळवलकरांचें मी अंतःकरणापासून अभिनंदन करतों.

त्र्यं. र. देवगिरीकर

(लेखकः—गोपीनाथ तळवलकर, प्रकाशक :—कॉंटिनेण्टल प्रकाशन पुणें २. मूल्य २ रुपये. पृ. १२६+८+२)

## जादू संपली

(श्री. दत्ता टोळ, पृष्ठें ४४ किंमत ७५ न. पै.)

महाराष्ट्र सरकारचें बाल-वाङमय पारितोषिकमिळालेलें ' जादू संपली. ' हें एक बाळांना आवडेलच असें पुस्तक. ते प्रसिद्ध झालें आहे. कथा-वाङमयाची आवड आबालवृद्धांना असते. मुलांची तर कितीहि गोष्टी ऐकल्या-वाचल्या तरी तृप्तीच होत नाही. वाचतां येऊं लागेपर्यंत ' आणखी एक सांगा ना ' हें गोष्ट सांगणाऱ्यामागचें टुमणें संपत नाही. वाचतां येऊं लागतांच ' मीं हें पुस्तक वाचलं ' हें सांगण्यांत त्या बाल मंडळींना निरुपम आनंद झालेला लगेच दिसून येतो. सुमारें ६ ते १० वयाच्या बालवाचकांना पशुपक्ष्यांच्या, पऱ्यांच्या राक्षसांच्या अद्भुत नवलकथा फार आवडतात. कारण या वांयत मुलें कल्पनामय वातावरणांत रमून जातात. संस्कृत वाङमयांत पंचतंत्रासारख्या अनेक बालप्रिय गोष्टी आहेत. परंतु पाश्चात्य वाङमयाने आपल्या इकडे परीकथा हा प्रकार मोठ्या प्रमाणांत आणला व तो दृढमूल होत आहे. अनेक लेखकांना या बालवाङमय प्रकाराचें आकर्षण वाटतें व ते हा प्रकार मराठीच्या भांडारांत समृद्ध करीत आहेत.

या प्रकारापैकीच जादू संपली हें एक आहे. भाषा सोपी आहे. मुलांना वेधणारी अद्भुत घटनामालिका यांत आहे. मुलांच्या कोवळ्या, भावमय मनांना आवडणारें सुजनांस आनंद नि दुर्जनांस शासन हें सूत्र आहे. योग्य संदर्भांत चित्रें दिलेलीं आहेत. विस्तार सुटसुटीत नि उत्सुकता कायम ठेवणारा आहे. यामुळे ज्या ज्या मुलांच्या हातीं ही पुस्तिका येईल, तीं तें वाचून पुरें केल्यावरच बाजूला ठेवतील. आणि या पुस्तकांतील आगामी पुस्तिकेची वाट पहातील.

● ● ●

Regd. No. B 9304

# ☆ मासिकें आणि सामाजिक नेतृत्वाचें कार्य ☆

आपल्या 'माणूस' चे कांही अंक मीं चाळले. त्याचें स्वरूप पाहिल्यानंतर त्याच्याविषयी कांही अपेक्षा निर्माण झाल्या. त्या येथे थोडक्यात व्यक्त करतों.

अलीकडे मराठींत पुष्कळच मासिकें निघूं लागलीं आहेत; आणि सर्वसामान्य वाचकांजवळ जाऊन पोहोचत आहेत. या मासिकांनी एक विशिष्ट जबाबदारी उचलणें आज परिस्थितीमुळे क्रमप्राप्त झाले आहे. ही जबाबदारी कोणती ?

आपल्या देशांत आज राजकारणाचा आणि राजकीय नेतृत्वाचा सुकाळ झालेला आहे. सामाजिक नेतृत्वाचा मात्र भयानक अभाव आहे. सामाजिक जीवन नेतृत्वहीन आहे. हें नेतृत्व करूं शकेल अशी प्रभावशाली व्यक्ति वा शक्ति आज तरी दुर्मिळआहे. सामाजिक नेतृत्व करण्याचें कार्य आज अनेकांना करावयाचे आहे. त्याचा कांही वाटा मराठी मासिकांनी उचलणें आवश्यक झालें आहे. अभिरुचीला इष्ट वळण लावणें आणि मानवधर्माच्या अभिवृद्धीला पोषक अशा विचारांचे व भावनांचे संस्कार करणें हें सामाजिक नेतृत्वाचें एक अंशभूत कार्य मराठी मासिकांना करणें शक्य आहे. हें कार्य करण्याला आपलें मासिक निस्संशय समर्थ आहे. आपलें 'माणूस' हे नांवच त्या दृष्टीनें अतिशय अर्थपूर्ण आहे. आपली साहित्याची निवडहि आपल्या नांवाला साजेशी अशीच आहे. सामाजिक नेतृत्वाच्या कार्यांत सहभागी होण्यास लागणारी पात्रता आपण निर्विवाद दाखविली आहे. हें कार्य आपल्या मासिकांतून अधिक योजनाबद्ध रीतीने व सामाजिक जबाबदारीच्या अधिक उत्कट जाणीवेने पार पडेल अशी उमेद आहे.

**डॉ. अ. ना. देशपांडे**

## माणूसचें वैशिष्टयपूर्ण पदार्पण

'माणूस' चे सर्व अंक वाचले. 'माणूस' मधील माणुसकी बघून आनंद झाला. मराठी नियतकालिकांत माणूस आपल्या वैशिष्टयानं चमकेल असा विश्वास वाटतो. आज आपल्या समाजपुढे अनेक महत्त्वाचे प्रश्न आहेत. लोकशाही राज्याला सुरुवात केली असली तरी लोकशाही प्रणाली अस्तिवांत आणावयाची आहे. विज्ञानाच्या प्रगतीबरोबर जग झपाट्यानं बदलत आहे. बदलत्या जगाबरोबर अनेक नवीन नवीन प्रश्न उपस्थित होत आहेत. हे सर्व प्रश्न सोडविण्याची कुवत समाजांत असणं आवश्यक आहे. ह्या कार्यांत साहित्यिक व पत्रकार यांचा वाटा फार मोठा आहे. 'माणूस' ने ज्या पद्धतीनें पत्रसृष्टीत पदार्पण केलें आहे. त्यावरून आपली जबाबदारी तें पार पाडूं शकेल असा विश्वास वाटतो. ज्ञानलालसेबरोबरच समाजांत सेवाभाव व विजिगीषु वृत्ती निर्माण करण्यांत माणूस यशस्वी होवो.

**म. वा. चिंचवडकर (नागपूर)**

## घरगुती परिचयाचा 'माणूस'

'माणूस'चा कोणत्याहि महिन्याचा अंक आपण हातीं घेतला तरी हें मासिक इतर ललित मासिकांपेक्षा अगदी निराळें आहे ह्याची खात्री पटते. छापखान्यास काम हवें म्हणून मासिक, मासिकाच्या योगक्षेमासाठी जाहिरात आणि जाहिरातींना वाचक लाभावेत म्हणून भडक चित्रें, थिल्लर कविता, उत्तान कथा ही आमची व्यवहारिक सोमानपंक्ति येथे नाही. 'माणूस' मासिक ह्यापेक्षा भिन्न आहे. वाङमयाची संस्कारक्षमता 'माणूस'ने ओळखली आहे. म्हणून सुसंस्कार घडविणारें साहित्य, अभिनिवेशरहित मतप्रतिपादन, माणसाच्या उत्थानाची तळमळ, भारतांत महाराष्ट्र अग्रेसर रहावा यासाठी आवश्यक तें दोषाविष्करण, सामान्यांबद्दलचा कळवळा आणि भविष्य काळावरची श्रद्धा ह्यांनी नटलेला प्रत्येक अंक हें 'माणूस'चें वैशिष्ट्य आहे. 'माणूस' मराठी माणसाशी माणुसकीच्या भूमिकेवरून बोलतो म्हणून त्याचे बोल घरगुती वाटतात. घरगुती वातावरणांत घरगुती परिचयाचा वाटणारा हा 'माणूस' आहे. असें सुंदर मासिक काढल्याबद्दल संपादकांचें अभिनंदन करायला हवें. तें मी सहर्ष करीत आहे.

**दि. ब. पंडित (नागपूर)**

संपादक-मुद्रक-प्रकाशक : श्री. ग. माजगांवकर ● प्रकाशन स्थळ : राजहंस प्रकाशन १०१५ सदाशिव, पुणें २.
मुद्रणस्थळ : साधना प्रेस, ४३०-३१ शनिवार, पुणें २